CMYK




सोलापूर
SOLAPUR TARUN BHARAT
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
सोलापूर, धाराशिव, लातूर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहिल्यानगर व सातारा येथून वितरित
सदाफुलीसह

सोलापूर | बुधवार, ३ जून २०२६ । युगाब्द ५१२८ । वर्ष ४२ वे अंक १८५ । पाने १२+८ । किंमत रु. ८/-
|RNI Regd. No. 46878/87 | Postal Regd No.. SLP/32/2024-2026. Posted daily at Medical college, Solapur.P.O. |
ही आमची ई-पेपर आवृत्ती असून ती 'तरुण भारत'च्या छापील आवृत्तीची प्रतिकृती नाही
dainiktarunbharat.com
epaper.dainiktarunbharat.com

## विचारपुष्प



भूतकाळाचा गौरव, वर्तमानकाळाची पीडा व भविष्यकाळाची स्वप्ने ज्या नवयुवकांत आढळतात तो देश प्रगती करतो.

**स्व. कुप्प. सी. सुदर्शनजी**
रा. स्व. संघाचे पाचवे सरसंघचालक

## आयटी शेअर्सच्या जोरावर बाजारात तेजी

**मुंबई** : मंगळवारी भारतीय शेअर बाजारात कमालीचा चढ-उतार पाहायला मिळाला. मात्र, सत्राच्या शेवटी आयटी शेअर्सधील जोरदार खरेदीच्या जोरावर बाजाराने तेजीसह बंद होत गुंतवणूकदारांना दिलासा दिला. राष्ट्रीय शेअर बाजाराचा निर्देशांक 'निफ्टी ५0' सर्वच क्षेत्रांतील चौफेर खरेदीमुळे २३,४५0 च्या पातळीवर यशस्वीरीत्या स्थिरावला. बाजार उघडताना काहीशी घसरण झाली होती. मोसमी पावसाचा प्रतिकूल अंदाज, मध्य पूर्वेतील वाढता तणाव आणि रिझर्व्ह बँकेच्या आगामी पतधोरण निर्णयाच्या पार्श्वभू ीवर गुंतवणूकदारांनी सावध भूमिका घेतल्याने पहिल्या सत्रात बाजार एका मर्यादित कक्षेत व्यवहार करत होता.

# शेतकरी कर्जमाफीला मंजुरी

## ५५ लाखांहून अधिक शेतकऱ्यांना थेट फायदा

## दोन लाखांपर्यंत कर्ज होणार माफ; मंत्रिमंडळाचा निर्णय



◆ **मुंबई, २ जून**

राज्यात निर्माण झालेली पावसाची अनिश्चितता आणि संभाव्य दुष्काळी परिस्थिती लक्षात घेता, महायुती सरकारने राज्यातील शेतकऱ्यांना मोठा दिलासा दिला आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखालील राज्य मंत्रिमंडळाच्या मंगळवारी झालेल्या बैठकीत पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजनेला अधिकृत मंजुरी देण्यात आली आहे. या निर्णयामुळे राज्यातील ५५ लाख ७२ हजार शेतकऱ्यांना थेट लाभ मिळणार असून, यासाठी ३६ हजार ५८५ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे.

विधानसभा निवडणुकीपूर्वी दिलेल्या आश्वासनाची पूर्तता करत, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वातील महायुती सरकारने या निर्णयाद्वारे शेतकऱ्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहिल्याचे या कृतीतून स्पष्ट केले आहे.थकीत असलेल्या २ लाख रुपयांपर्यंतच्या पीक कर्जाची सरसकट माफी दिली जाणार आहे. जे शेतकरी नियमितपणे कर्जाची परतफेड करतात, त्यांना ५० हजार रुपयांचा प्रोत्साहन निधी दिला जाणार आहे.

१ एप्रिल २०१९ ते ३१ मार्च २०२५ या कालावधीत घेतलेल्या अल्पमुदत पीक कर्जांना ही योजना लागू असेल. तसेच, ३० सप्टेंबर २०२५ रोजी थकीत असलेले आणि ३१ मार्च २०२६ पर्यंत न फेडलेले कर्ज या योजनेसाठी पात्र ठरणार आहेत. कर्जात अडकणाऱ्या बळीराजाची या चक्रातून कायमस्वरूपी सुटका व्हावी म्हणून आणि यावर उपाययोजना सुचविण्यासाठी राज्य सरकारने मित्रा संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आणि मुख्यमंत्र्यांचे वित्तीय सल्लागार प्रवीण परदेशी यांच्या अध्यक्षतेत वित्त आणि कृषी विभागाचे सचिव आणि राज्य बँकेचे प्रशासक यांचा समावेश असलेली एक समिती गठीत केली होती. या समितीने नुकताच आपला अहवाल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना सादर केला आहे. (तभा वृत्तसेवा)

### हेक्टर किंवा एकरची मर्यादा नाही

या योजनेत कोणतीही हेक्टरी किंवा एकरची मर्यादा ठेवण्यात आलेली नाही. ज्यांचे कर्ज २ लाखांपेक्षा जास्त आहे, त्यांना २ लाखांवरील अतिरिक्त रक्कम भरल्यानंतर २ लाखांपर्यंतच्या कर्जमाफीचा लाभ मिळेल. यापूर्वीच्या महात्मा ज्योतिराव फुले कर्जमाफी योजनेचा लाभ घेतलेल्या शेतकऱ्यांनाही काही अटींसह या योजनेत समाविष्ट करण्यात आले आहे.

### आचारसंहिता संपताच पैसे खात्यावर

**सध्या राज्यात विधानपरिषदेच्या निवडणुकांमुळे आचारसंहिता लागू आहे. आचारसंहिता शिथिल होताच, म्हणजेच १८ जूननंतर पात्र शेतकऱ्यांच्या बँक खात्यावर कर्जमाफीची रक्कम तात्काळ वर्ग केली जाणार आहे. प्रशासकीय स्तरावर याबाबतची तयारी पूर्ण झाली असून, जून अखेर किंवा जुलैच्या पहिल्या आठवड्यापर्यंत शेतकऱ्यांना या मदतीचा लाभ मिळणे अपेक्षित आहे.**

# 'लाडकी बहीण' झालेले 'पुरुष' अडकणार

## सरकार करणार पैसे वसूल तर महिलांना दिलासा

◆ **मुंबई, २ जून**

'मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण' योजनेच्या अंमलबजावणीत मोठ्या प्रमाणावर पडताळणी करण्यात आली असून, या प्रक्रियेत तब्बल ८० लाख अर्ज विविध कारणांमुळे अपात्र ठरवण्यात आले आहेत. या पार्श्वभूमीवर, अपात्र लाभार्थ्यांकडून निधी वसूल केला जाणार का, या चर्चांना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पूर्णविराम दिला आहे.

फसवणूक करणाऱ्या पुरुषांकडून सक्तीने वसुली केली जाणार असून, तांत्रिक कारणांमुळे अपात्र ठरलेल्या महिलांना मोठा दिलासा देण्यात आला आहे.

योजनेची व्याप्ती वाढवण्यासाठी सुरुवातीच्या काळात सेल्फ सर्टिफिकेशनच्या आधारावर अर्ज स्वीकारले होते. मात्र, सखोल पडताळणीअंती धक्कादायक बाबी समोर आल्या आहेत. यामध्ये १४ हजार पुरुषांनी महिला असल्याचे भासवून योजनेचा लाभ लाटल्याचे स्पष्ट झाले आहे. याशिवाय, १० लाख प्राप्तिकर भरणारे नागरिक, ५ लाख सरकारी कर्मचारी कुटुंबे आणि चारचाकी वाहने असलेल्या व्यक्तींनी नियमांना बगल देत लाभ घेतल्याचे निष्पन्न झाले आहे. अशा सर्व गैरप्रकार करणाऱ्यांकडून आता सक्तीने पैसे वसूल केले जाणार आहेत. (तभा वृत्तसेवा)

### महिलांना मोठा दिलासा

दुसरीकडे, अपात्र ठरलेल्या महिलांच्या बाबतीत मुख्यमंत्र्यांनी मवाळ भूमिका घेतली आहे. तांत्रिक अडचणींमुळे किंवा ई-केवायसी न केल्यामुळे ज्या महिलांचे अर्ज बाद झाले आहेत, त्यांच्याकडून वसुली केली जाणार नाही. त्यांना सरकारकडून माफी देण्यात आली आहे. केवायसी न केल्यामुळे ज्या ६१ लाख महिलांना लाभ मिळालेला नाही, त्यांच्यासाठी सरकार लवकरच पुन्हा केवायसी विंडो उघडणार आहे. यामुळे पात्र असूनही लाभापासून वंचित राहिलेल्या महिलांना पुन्हा १५०० रुपयांचे अनुदान मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

## खाजगी रुग्णालयावर फेकले बॉम्ब

◆ **गुरदासपूर, २ जून**

मंगळवारी पंजाबच्या गुरदासपूरमधील कलानौर येथील खासगी मुलतानी रुग्णालयावर मंगळवारी अज्ञात हल्लेखोरांनी ग्रेनेड फेकले. रुग्णालयाच्या मुख्य प्रवेशद्वारावर झालेल्या भीषण स्फोटात चार सुरक्षा रक्षक जखमी झाले. याच रुग्णालयावर यापूर्वी दोनदा हल्ला झाला होता. स्फोट इतका शक्तिशाली होता की रुग्णालयाच्या खिडक्या आणि दारांच्या काचा फुटल्या. सीसीटीव्हीमध्ये रुग्णालयावर ग्रेनेड फेकताना दोन हल्लेखोर दिसून आल्याची माहिती पोलिस अधीक्षक डी. के. चौधरी यांनी प्रसार माध्यमांशी बोलताना दिली. संशयित हल्लेखोराची ओळख पटवण्याचे काम सुरू आहे. (वृत्तसंस्था)

## मृतांच्या वारसांना 'एमआयडीसी'त नोकरी

### जरांगेंना दिलेल्या आश्वासनाची पूर्तता

◆ **मुंबई, २ जून**



मराठा आरक्षण आंदोलनादरम्यान मृत्यू झालेल्या आंदोलकांच्या कुटुंबीयांना दिलासा देणारा महत्त्वपूर्ण निर्णय राज्य सरकारने घेतला आहे. या आंदोलनातील मृत व्यक्तींच्या पात्र वारसदारांना महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ (एमआयडीसी) मध्ये रोजगाराची संधी उपलब्ध करून देण्याचा निर्णय शासनाने जाहीर केला आहे.

मराठा आरक्षणासंदर्भातील विविध मागण्यांवर सरकार आणि आंदोलनकर्त्यांमध्ये झालेल्या चर्चेदरम्यान देण्यात आलेल्या आश्वासनांच्या पूर्ततेचा हा एक भाग असल्याचे सांगितले जात आहे. मराठा आरक्षण उपसमितीचे अध्यक्ष तथा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी या निर्णयाची माहिती दिली. या निर्णयाच्या अंमलबजावणीसाठी सामान्य प्रशासन विभागाने राज्यातील संबंधित जिल्हाधिकाऱ्यांना आवश्यक सूचना दिल्या आहेत. आंदोलनादरम्यान मृत्यू झालेल्या व्यक्तींच्या वारसदारांची शहानिशा करून पात्र लाभार्थ्यांना प्रमाणपत्रे देण्याची प्रक्रिया तातडीने पूर्ण करण्याचे निर्देश प्रशासनाला देण्यात आले आहेत. मराठा समाजाच्या प्रश्नांबाबत सरकार संवेदनशील असून दिलेली आश्वासने पूर्ण करण्यासाठी कटिबद्ध असल्याचे विखे पाटील यांनी सांगितले. समाजाच्या प्रलंबित प्रश्नांवरही सरकार सकारात्मक पद्धतीने कार्यरत असल्याचा दावा त्यांनी केला. (तभा वृत्तसेवा)

### कुटुंबीयांच्या मागणीचा सकारात्मक विचार

**यापूर्वी संबंधित वारसदारांना राज्य परिवहन महामंडळात रोजगार देण्याचा पर्याय विचाराधीन होता. मात्र, काही कुटुंबीयांनी औद्योगिक विकास महामंडळ किंवा इतर सार्वजनिक उपक्रमांमध्ये नोकरीची मागणी केली होती. त्यानुसार एमआयडीसी प्रशासनाने सकारात्मक भूमिका घेत वारसदारांच्या नियुक्तीला तत्त्वतः मान्यता दिली आहे.**

# सोलापुरातील गोकुळ, भीमा, कुर्मदास कारखान्यांना जप्तीची नोटीस

● **२३,२७९.५४ लाख रुपयांची रक्कम थकली**

● **राज्यातील एकूण ७ साखर कारखान्यांना नोटीस**



**तभा वृत्तसेवा,**
**मुंबई, दि. २ जून-**

राज्यातील सात कारखान्यांनी मे महिनाअखेर शेतकऱ्यांचे २३,२७९.५४ लाख रुपयांचे देणे थकविले आहे. या सात कारखान्यांना साखर आयुक्तालयाने

(पान ३ वर...)

### भाजप खासदार धनंजय महाडिक यांनाही धक्का

भाजप खासदार धनंजय महाडिक यांचा मुलगा विश्वराज महाडिक अध्यक्ष असलेल्या सोलापूर जिल्ह्यातील टाकळी सिकंदर येथील भीमा सहकारी साखर कारखान्याकडे शेतकऱ्यांच्या एफआरपीचे ३0२२२.२६ लाख रुपये थकीत असून, साखर आयुक्तांनी आरआरसीची नोटीस बजावली आहे. कारखाना गेली अनेक वर्षांपासून आर्थिक अडचणीत आहे. विशेष म्हणजे २०२५ मध्येही कारखान्याला नोटीस बजावण्यात आली होती.

### यंदाच्या हंगामातील ६७७ कोटी रुपयांची एफआरपी थकीत

राज्यातील गळीत हंगामात यंदा २१0 कारखान्यांनी १0४५.६३ लाख उसाचे गाळप केले. या कारखान्यांकडे एकूण ४0,४४६ कोटी रुपयांची एफआरपी देय होती. त्यापैकी ३९७६९ कोटी रुपयांची एफआरपी देण्यात आली आहे, तर ६७७ कोटी रुपयांची एफआरपी थकीत आहे. २१0 कारखान्यांपैकी १३९ कारखान्यांनी पूर्ण एफआरपी दिली आहे. ८0 ते ९९.९९ टक्के एफआरपी दिलेल्या कारखान्यांची संख्या ६२ आहे. ६0 ते ७९.९९ टक्के एफआरपी दिलेल्या कारखान्यांची संख्या तीन असून 00.00 ते ५९.९९ टक्के एफआरपी दिलेल्या कारखान्यांची संख्या सहा आहे. एकूण ७१ कारखान्यांकडे ६७७ कोटींची एफआरपी थकीत आहे.

# मान्सून उद्या केरळमध्ये दाखल होणार

◆ **मुंबई, २ जून**

भारतीय हवामान विभागाने केरळमध्ये ४ जूनच्या आसपास नैऋत्य मान्सून दाखल होण्याची शक्यता वर्तवली आहे. मान्सूनच्या पुढील प्रगतीसाठी वातावरण अनुकूल असून लक्षद्वीप, केरळ आणि तामिळनाडूच्या आणखी काही भागांत मान्सूनची आगेकूच अपेक्षित आहे, असे संकेतही हवामान विभागाने दिले आहे.

हवामान विभागनुसार, अरबी समुद्राच्या नैऋत्य व आग्नेय भागात मान्सूनचा प्रवास होणार आहे. तर बंगालच्या उपसागरातील पश्चिम-मध्य, पूर्व-मध्य आणि ईशान्य भागांतही मान्सून पुढे सरकणार असल्याचे सांगण्यात येत आहे. ४ जून रोजी नैऋत्य मान्सूनची पुढील वाटचाल होण्यासाठी अनुकूल परिस्थिती निर्माण झाली आहे. या वाटचालीमुळे मान्सून नैऋत्य आणि आग्नेय अरबी समुद्राच्या काही आणखी भागांमध्ये, लक्षद्वीप बेटांवर, केरळ आणि तामिळनाडूच्या काही भागांमध्ये, तसेच नैऋत्य, पश्चिम-मध्य, पूर्व-मध्य आणि ईशान्य बंगालच्या उपसागराच्या काही आणखी भागांमध्ये आणि आग्नेय बंगालच्या उपसागराच्या उर्वरित भागांमध्ये विस्तारण्याची शक्यता आहे, असेही हवामान विभागाने मंगळवारी स्पष्ट केले. (वृत्तसंस्था)

# सीबीएसई अध्यक्ष, सचिवांची बदली

### अनियमिततेच्या चौकशीसाठी समिती स्थापन

◆ **नवी दिल्ली, २ जून**

ओएसएम (ऑन-स्क्रीन मार्किंग) वादाच्या पृष्ठभूमीवर सीबीएसईचे अध्यक्ष राहुल सिंह आणि सचिव हिमांशू गुप्ता यांची मंगळवारी बदली करण्यात आली. नवीन अध्यक्ष म्हणून कृषी विभागाचे सचिव प्रशांत लोखंडे, तर सचिवपदी वरुण भारद्वाज यांची नियुक्ती करण्यात आली. सीबीएसईने ऑन-स्क्रीन मार्किंग सेवा खरेदी करण्याच्या प्रक्रियेची चौकशी करण्यासाठी चौकशी समिती स्थापन केली आहे.

सीबीएसईच्या ऑन-स्क्रीन मार्किंग प्रणालीतील अनियमिततेच्या आणि पुनर्मूल्यांकन पोर्टलच्या अपयशाच्या व्यापक तक्रारींनंतर, शिक्षण मंत्रालयाने उच्चस्तरीय चौकशी सुरू केली आहे. चौकशी अहवालानंतर, दोषी आढळलेल्यांवर कठोर कारवाई केली जाईल. याशिवाय सीबीएसईचे अध्यक्ष सिंह यांची बदली करून त्यांच्याजागी प्रशांत लोखंडे आणि गुप्ता यांच्याजागेवर भारद्वाज यांची नियुक्ती केली. सीबीएसईने ऑनलाइन मूल्यांकन पोर्टलमध्ये सुरक्षेतील त्रुटी असल्याचे मान्य केल्यानंतर अवघ्या एका दिवसात मंत्रालयाने हे पाऊल उचलले आहे. इयत्ता १२वीच्या उत्तरपत्रिकेचा डेटा सार्वजनिक डोमेनमध्ये असल्याचा दावा खरा असल्याचे सीबीएसईने मान्य केले आहे. (वृत्तसंस्था)

### सीबीएसई पुनर्मूल्यांकन पोर्टलवर सायबर हल्ला

सीबीएसई पुनर्मूल्यांकन पोर्टलवर मंगळवारी सायबर हल्ला करण्याचा प्रयत्न झाला. काही कुरापती घटकांनी पोर्टलच्या सेवांमध्ये व्यत्यय आणण्यासाठी वारंवार सायबर हल्ले केले. असे असूनही हजारो विद्यार्थ्यांनी त्यांची अर्ज प्रक्रिया यशस्वीरीत्या पूर्ण केली. पुनर्मूल्यांकन पोर्टल सध्या एका वेळी ८,००० हून अधिक वापरकर्त्यांना सपोर्ट करत आहे. मंगळवारी दुपारी ३ वाजेपर्यंत १६,००० हून अधिक विद्यार्थ्यांनी त्यांचे अर्ज यशस्वीरीत्या सादर केले होते, असा दावाही सीबीएसईने केला आहे.



# विधानपरिषद निवडणूक काँग्रेसच्या उमेदवाराचा अर्ज फेटाळला

# अण्णामलाई यांचा भाजपाला रामराम

### लवकरच करणार नवीन पक्षाची घोषणा

◆ **नवी दिल्ली, २ जून**

तामिळनाडू भाजपाचे माजी प्रदेशाध्यक्ष के. अण्णामलाई यांनी मंगळवारी नवी दिल्लीत भाजपाचे राष्ट्रीय अध्यक्ष नितीन नवीन आणि पक्षाचे राष्ट्रीय सरचिटणीस बी. एल. संतोष यांची भेट घेऊन आपला पाच पानांचा राजीनामा सुपूर्द केला. अण्णामलाई यांच्या राजकीय भविष्याबाबत सुरू असलेल्या जोरदार चर्चांच्या पृष्ठभूमीवर ही भेट झाली आहे. माजी आयपीएस अधिकारी असलेले अण्णामलाई धर्मनिरपेक्ष आणि तामिळ-प्रथम विचारसरणी असलेला एक नवीन प्रादेशिक राजकीय पक्ष स्थापन करण्याच्या तयारीत आहे. येत्या ६ ते ८ महिन्यांत या नवीन पक्षाची घोषणा होऊ शकते. हा पक्ष तामिळनाडूमध्ये भाजपा आणि द्रमुक-अण्णाद्रमुक यांसारख्या प्रमुख द्राविडी पक्षांना एक सक्षम पर्याय म्हणून समोर आणण्याचा त्यांचा प्रयत्न असेल. (वृत्तसंस्था)

## अर्ज छाननी प्रक्रियेच्या वेळी धक्कादायक ट्विस्ट

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २ जून-**

विधानपरिषद निवडणुकीच्या अनुषंगाने सोलापूर स्थानिक स्वराज्य संस्था मतदार संघातील काँग्रेसचे उमेदवार आदित्य फत्तेपुरकर यांचा उमेदवारी अर्ज फेटाळण्यात आला. दरम्यान, अर्ज छाननी प्रक्रियेच्या वेळी धक्कादायक ट्विस्ट झाल्याचे दिसून आले. या निवडणुकीसाठी आता एकूण सात उमेदवार रिंगणात आहेत. गुरुवार, दि.४ जून २०२६ पर्यंत अर्ज माघारीची मुदत आहे. गुरुवार, दि.१८ जून रोजी मतदान तर सोमवार, दि.२२ जून २०२६ रोजी मतमोजणी होणार आहे.

निवडणूक कार्यालयाकडे प्राप्त झालेल्या अर्जांची छाननी प्रक्रिया सुरु असताना काँग्रेसचे उमेदवार आदित्य फत्तेपूरकर यांच्या उमेदवारी अर्जावर पंढरपूरचे नगरसेवक नागेश भोसले यांनी हरकत घेत अर्जावरील सही माझी नसून ती सही बोगस आहे, अशा आशयाचे प्रतिज्ञापत्रच दाखल केले. सूचकच माघारी घेतल्याने काँग्रेसच्या उमेदवाराचा अर्ज आपोआप बाद झाला. यामुळे काँग्रेस पक्षासह उमेदवाराची चांगलीच गोची झाली होती.



मंगळवार, दि.२ जून २०२६ रोजी अर्जांच्या छाननीवेळी भाजपचे उमेदवार राजेंद्र राऊत, भाजप आमदार सचिन कल्याणशेट्टी, आमदार देवेंद्र कोठे हे जिल्हाधिकारी कार्यालयात ठाण मांडून होते. काँग्रेसच्या खासदार प्रणिती शिंदे ह्यादेखील जिल्हाधिकारी कार्यालयात येऊन जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक निर्णय अधिकारी कार्तिकेयन यांची भेट घेतली. काँग्रेसच्या उमेदवाराच्या अर्ज बाद झाल्याविषयी बोलताना त्यांनी भारतीय जनता पार्टीवर सडकून टीका केली.

सोमवारी उमेदवारी अर्ज भरताना शेतकरी कामगार पक्षाचे आमदार डॉ.बाबासाहेब देशमुख हे उमेदवार राजेंद्र राऊत यांच्यासोबत तर राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरद पवार गटाचे आमदार नारायण पाटील हे जिल्हाधिकारी कक्षामध्ये उपस्थित होते. या निवडणुकीसाठी भाजपाकडे संख्याबळ जास्त आहे. त्यामुळे त्यांचा उमेदवार निवडून येऊ शकतो. मात्र ही निवडणूक बिनविरोध अथवा भाजपाचा उमेदवार जास्तीत जास्त मताने निवडून येण्याकामी पालकमंत्री गोरे यांनी कंबर कसली आहे.

### खासदारांवर गुन्हा दाखल केला पाहिजे : आ. कोठे

सोलापूर विधानपरिषद निवडणुकीसाठी छाननी प्रक्रिया चालू असताना व निकाल देण्यापूर्वी खासदार प्रणिती शिंदे यांनी जिल्हा निवडणूक निर्णय अधिकारी तथा जिल्हाधिकाऱ्यांच्या कक्षात जावून भेटणे चुकीचे आहे. खरं तर खासदार शिंदे याच निकालापूर्वी अधिकाऱ्यांवर दबाव टाकीत असल्याचे चित्र यावरुन स्पष्ट होते. त्यामुळे खासदार शिंदें यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात यावा, अशी मागणी आमदार देवेंद्र कोठे यांनी माध्यमांशी बोलताना केली.



CMYK

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत

https://epaper.dainiktarunbharat.com/



## महत्वाचे...



सांगोला : ते श्री क्षेत्र तुळजापुर पायी दिंडी सोहळ्याचे यंदाचे ४१वे वर्ष असून मंगळवारी प्रस्थान झाले.

### घरातील गॅस सिलेंडरच्या भडक्यात भाजलेल्या वडिलांचा अखेर मृत्यू

**सोलापूर, दि. २ जून-**

घरामध्ये गॅस सिलेंडरच्या भडक्यात भाजून जखमी झालेल्या टेंभुर्णी येथील एका ३५ वर्षीय तरुणाचा उपचारादरम्यान येथील शासकीय रुग्णालयात आज मंगळवारी पहाटे साडेतीन वाजता मृत्यू झाला. दयानंद मोहन कावरे (वय ३५ वर्ष ,रा टेंभुर्णी )असे त्या मयत तरुणाचे नाव असून सोमवार २५ मे रोजी सायंकाळी स्वयंपाक घरात गॅस सिलेंडर चा भडका उडाला होता. यात दयानंद कावरे यासह त्याची मुलगी गौतमी दयानंद कावरे ( वय १३ वर्षे ,दोघे राहणार टेंभुर्णी) भाजून जखमी झाले होते. त्यांना एका खासगी दवाखान्यात प्रथम उपचार करून येथील शासकीय रुग्णालयात रात्री अकरा वाजता मेव्हणा विशाल थोरात यांनी दाखल केले असता दयानंद याचा उपचारा दरम्यान आज पहाटे मृत्यू झाला.




### आदर्श विद्यालयाच्या मुख्याध्यापकपदी विठ्ठलपंत शिंदे

**सांगोला, दि. २ जून-**

कै.वामनराव शिंदे साहेब आदर्श विद्यालयाच्या मुख्याध्यापकपदी विठ्ठलपंत शिंदे यांची सेवा जेष्ठतेनुसार नियुक्ती करण्यात आली. सुरुवातीस संस्थापक वामनराव शिंदे व सरस्वती यांच्या प्रतिमेचे पूजन हरिराम बाबर, उद्धव पाटील, संस्थाध्यक्षा कौशल्यादेवी शिंदे व सदस्य यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी कौशल्यादेवी शिंदे यांच्या हस्ते विठ्ठलपंत शिंदे यांना नियुक्तीपत्र देऊन सत्कार करण्यात आला. याप्रसंगी महेश सुर्वे, दिग्विजय चव्हाण, रामभाऊ शिंदे, ॲड.बबनराव पाटील यांनी मनोगत व्यक्त केले. प्रास्ताविक निलकंठ शिंदे, सूत्रसंचालन भालके यांनी केले. आभार अर्चना गोडसे यांनी मानले.

### श्रीकमला भवानी चरणी भक्ताकडून चांदीचे पैंजण अर्पण

**करमाळा, दि. २ जून-**



श्री कमला देवी चरणी मृणाल गिरिष ताटी (रा. अहिल्यानगर) यांच्याकडून अंदाजे ११ हजार किंमतीचे चांदीचे पैंजण श्रीकमला भवानी चरणी अर्पण करण्यात आले. यावेळी श्रीकमला देवी मंदिर समितीकडून मंदिर पुजारी रामदास सोरटे, वैभव सोरटे यांच्या हस्ते त्यांचा सत्कार करण्यात आला. तसेच मंदिर पुजारी वैभव सोरटे यांच्या आज असणाऱ्या वाढदिवसानिमित्त जतन संवर्धन कामास रोख देणगी रु.५०० प्राप्त झाले आहे. श्री कमलादेवी मंदिर जतन संवर्धन काम प्रगती पथावर असल्याकारणाने भाविकांनी सढळ हाताने देणगी देऊन या कामात सहकार्य करण्याचे आवाहन देखील जगदंबा कमलादेवी देवस्थान ट्रस्ट करमाळा यांच्याकडून करण्यात आलेले आहे. तसेच ऑनलाईन देणगीची सुविधाही उपलब्ध आहे. देणगीसाठी संपर्क अशोक गाठे व्यवस्थापक. मो. नं. ९४०४७०८९२४ / ९५७९९६१७७४ यांच्याशी संपर्क साधावा.



### महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाचा वर्धापन दिन साजरा

**अक्कलकोट, दि. २ जून-**

महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाचा ७८ वा वर्धापन दिन पंचायत समितीचे सभापती सागर कल्याणशेट्टी यांच्या उपस्थितीत साजरा करण्यात आला. अक्कलकोट आवारात झालेल्या वर्धापन दिन कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी आगारप्रमुख सत्यशिल खताळ होते. प्रारंभी अनिल पाटील यांनी स्वागत प्रास्ताविक केले. वर्धापन दिनानिमित्त सागर कल्याणशेट्टी यांच्या हस्ते दीप प्रज्वलन करून आणि केक कापून कार्यक्रमाचा प्रारंभ झाला. आगारप्रमुख सत्यशिल खताळ यांच्या हस्ते सभापती सागर कल्याणशेट्टी यांचा सत्कार करण्यात आला. तर एका बसचे पूजन करण्यात आले. यावेळी वर्षभर विना अपघात बस चालवणाऱ्या १०४ चालकांचा सन्मान रोख १५०० रुपये आणि पुष्पगुच्छ देऊन सभापती सागर कल्याणशेट्टी यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला. याप्रसंगी भाजपा मंडलाध्यक्ष अमोल हिप्परगे, पत्रकार संघाचे अध्यक्ष बाबासाहेब निंबाळकर यांनी मनोगत व्यक्त केले. याप्रसंगी जिल्हा पोलीस पाटील संघटनेचे अध्यक्ष शिवानंद फुलारी, स्थानक प्रमुख नागेश रोडगे, वाहतूक नियंत्रक मदन घाडगे, अनिल पाटील, विशाल दिलपाक, युवराज घुगे, मलकप्पा पाटील, सिद्धाराम चौगुले उपस्थित होते.

# निमगाव टें. परिसरात विजेच्या कडकडाटासह तुफानी पाऊस

## केळी, डाळिंब, द्राक्ष बागा जमीनदोस्त; नुकसान भरपाईची मागणी

**तभा वृत्तसेवा,**
**कुर्डूवाडी, दि. २ जून-**



माढा तालुक्यातील निमगाव टें. परिसरात काल मध्यरात्री अचानक तुफान वादळी वारा व विजेच्या कडकडासह झालेल्या पावसामुळे शेतक-यांच्या केळी, डाळींब, द्राक्ष,पेरू व आंब्याच्या बागेचे अतोनात नुकसान झाले असून डांळींब बागेतील जाडाचे अच्छादन वाऱ्यामुळे उडून गेल्याचे दीसुन आले. वा-याचा वेग एवढा प्रचंड होता की केळीच्या बागा जमिनदोस्त तर डाळींबाची झाडे उखडून पडली आहेत. अंतिम टप्प्यात असलेल्या आंब्याच्या झाडाचे फळही तुटून जमिनीवर पसरली आहेत.

सोमवारी दिवसभर आकाश स्वच्छ होते. रात्री अकरानंतर निसर्गाचे वातावरण बदलत गेले. बारा नंतर वा-याचा जोर वाढत गेला. सुमारे दिड तास वादळी वारे, विजेचा कडकडाटासह जोराचा पाऊस चालू होता. अचानकपणे आलेल्या तुफान पावसाने शेतक-यांना हतबल व्हावे लागले. शेतक-यांच्या हातातोंडाशी आलेल्या घास निसर्गाच्या अवकृपेने हीरावून घेतल्याचे चित्र पहायला मिळाले. शासनाने दिलेले सौरपंपाचे पँनल उपटून पडले. विशेष बाब म्हणजे निमगाव टें मंडळामध्ये पर्जन्यमान मोजण्याचे यंत्रच नसल्याने मंडळात अगर गावात कीती पाऊस पडला याची नोंद उपलब्ध नसल्याची माहीती आहे.

### गावास जोडणारे रस्ते बंद

प्रचंड विजेचा कडकडाट व वा-याचे भयानक असे तांडव निमर्ण झाल्याने निमगाव टें ला जोडणारे पिंपळणेर रोड,बादलेवाडी रोड,शेडसिंगे रोड व उपळवाटे रोड रस्त्यावर वा-याच्या सुसाटाने झाडे मोडून पडल्याने रस्ते बंद पडले होते.परिसरातील दळवळण व्यवस्था विस्कळीत झाली होती.विजेचे खांब व तारा तुटल्याने यात भर पडली.मंगळारच्या रात्रीपर्यंत विज गायप झाली होती. विज मंडळाचे कर्मचारी दुस-या दीवशी विज सुरळीत करण्यासाठी प्रयत्न करत होते.तर निमगाव टें ग्रामपंचायतने पुढाकार घेवून रस्त्यावर उन्मळून पडलेली झाडे काडून दळणवळण सुरळीत केले.



### ४५ हेक्टर नुकसानग्रस्त फळबागेची पहाणी

काल झालेल्या वादळी वा-याने व पावसाने झालेल्या नकसानग्रस्त शेतक-यांच्या फळबागेची पंचेच्याळीस हेक्टरची पहाणी तलाठी प्रिती काळे यांच्या बरोबर प्रत्यक्ष प्लाँटवर जावून केली. सर्व नुकसान हे ३३ टक्क्यापेक्षा जास्त होते. यामध्ये पहाणी करण्याच्या सूचना आम्हाला नव्हत्या परंतु नैसर्गीक मार्गातून झालेल्या नुकसानीची पहाणी करून वरीष्ठाकडे अहवाल पाठवून देणार आहे. उद्यापण उर्वरीत पहाणी करणार आहे. शासन धर्तीवर मदतीचा जो निर्णय होईल त्याप्रमाणे यात शेतक-यांना मदत मिळू शकते. गावात पाऊस कीती पडला याची नोंद सोलापूर येथे समजते.

- **अमर मेहेर,** सहाय्यक कृषि अधिकारी निमगाव टें.

### शेतकऱ्यांचे कोट्यावधींचे नुकसान



काल मध्यरात्री वादळी वारा व विजेच्या कडकडासह झालेला पाऊस अतीशय भयावह होता. निमगांव टें मध्ये प्रथमच एवढ्या प्रचंड वेगाचे वारे आल्याने तांडव निर्माण झाले. शेतक-यांच्या फळबागेचे नुकसान यात झाले आहे. केळींच्या बागा जमिनदोस्त झाल्या आहेत.आंबा तर गळून गेला यासह डाळींबाचे अच्छादन उडून गेले तर कुठे झाडे देखील उपटून पडली आहेत. शासन अनूदानातून ज्या शेतक-यांचे सौर पंपाचे पँनल उपटून पडले आहेत. जे नादुरूस्त झाले ते देखील ठेकेदारांनी दुरूस्त करून देण्यात यावे. प्रशासनाने ताबडतोब या संकटातून शेतक-यांना मुक्त करण्यासाठी कर्तव्याच्या पलीकडे जावून विचार करून मदत करावी.

- **विकास शिंदे,** प्रगतशील शेतकरी, निमगाव टें.

## श्रीपूर परिसरात वादळी वाऱ्याने केळी, ऊस पिके जमिनदोस्त



**तभा वृत्तसेवा,**
**श्रीपूर, दि.२ जून-**

रविवार दि. ३१ मे रोजी उंबरे, नेवरे, जांबूड या भिमा नदी काठच्या गावांना जोरदार वादळी वाऱ्याने झोडपले. यामधे प्रामुख्याने केळी, डाळींब, मका, ऊस या बागांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. त्यामुळे हातातोंडाशी आलेला घास निसर्गाच्या अवकृपेने हिरावला गेला आहे. यात महत्वाची बाब म्हणजे नुकताच केळी पिकाचा दर वाढला असून तो २२ ते २३ रु . चे वर जात असताना अशी परिस्थितीत हे संकट शेतकऱ्यांवर कोसळले आहे.

ऊसाला पर्यायी व हमखास भाव मिळवून देणारे पिक म्हणून केळी पिकाची लागण वाढलेली दिसून येते. यामध्ये जांबूड येथित प्रगतीशिल शेतकरी व बोरगांव ग्रामपंचायतीचे उपसरपंच मदनसिंह पाटील यांची १० एकर केळी बाग या वादळात पूर्ण आडवी झाली असून त्यांचे अंदाजे ४० लाखांचे नुकसान झाले आहे. तर १ जून रोजी श्रीपर परिसराला वादळीवारा व पावसाने झोडपले या मध्ये ही शेती पिकाचे नुकसान झाले यात ऊस पिके जमिनदोस्त झाली आहेत.

यंदाच्या उन्हाळी हंगामा मधे कधी नव्हे तो प्रचंड उकाडा जाणवला यात लोकांचे अंगाची लाही लाही होत असल्याने तसेच अनेकांचे बोअरचे पाणी आटल्याने पावसाची प्रतिक्षा सर्वांनाच लागली होती. परंतु वादळी वाऱ्याने विशेषतः शेतकरी वर्गास जास्तच संकटात टाकल्याने सर्व हवालदिल झाले आहेत. यात शासनाने त्वरीत नुकसानीचे पंचनामे करून आर्थिक मदत करावी अशी नुकसान झालेल्या शेतकऱ्यांची मागणी आहे.

## पंढरपूर येथे संत तुकाराम महाराज व संत नामदेव महाराजांच्या वंशपरंपरांचा भक्तिमय स्नेहमेळावा

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. १ जून-**



पंढरपूर येथील ऐतिहासिक देहूकर वाडा येथे वारकरी संप्रदायातील संत परंपरेचा गौरव करणारा विशेष कार्यक्रम उत्साहात संपन्न झाला. या प्रसंगी ह.भ.प. श्री अभिमन्यू डोंगरे महाराज, पश्चिम महाराष्ट्र प्रांतस्तरीय विश्व हिंदू परिषद प्रांत धर्माचार्य टोळी प्रमुख सदस्य, यांच्या हस्ते जगद्गुरु संत तुकाराम महाराज यांचे विद्यमान वंशज श्री गुरु ज्ञानेश्वर माऊली देहूकर महाराज यांचा छायाचित्रफलक गुरुवर्य बाळासाहेब महाराज देहूकर यांना सप्रेम भेट देण्यात आला.

कार्यक्रमास संतश्रेष्ठ संत नामदेव महाराजांचे विद्यमान वंशज गुरुवर्य श्री केशव महाराज नामदास यांची प्रमुख उपस्थिती लाभली. तसेच नामदास महाराज फड, देहूकर फड यांतील मान्यवर, विविध दिंड्यांचे प्रतिनिधी, कीर्तनकार, भजनकार आणि मोठ्या संख्येने वारकरी भाविक उपस्थित होते. यावेळी संत तुकाराम महाराज, संत नामदेव महाराज व वारकरी संप्रदायाच्या अखंड भक्ती परंपरेचे स्मरण करण्यात आले. संतांनी दिलेला समता, बंधुता, मानवता, राष्ट्रनिष्ठा व हरिनामाचा संदेश समाजाच्या प्रत्येक घटकापर्यंत पोहोचविण्यासाठी सर्वांनी एकत्रितपणे कार्य करण्याचा संकल्प व्यक्त केला.

हभप अभिमन्यू डोंगरे महाराज यांनी आपल्या मनोगतात संत परंपरा ही हिंदू समाजाची आध्यात्मिक शक्ती असल्याचे सांगून संतांच्या विचारांचे जतन व संवर्धन करणे ही काळाची गरज असल्याचे प्रतिपादन केले.

संतांच्या वंशपरंपरा, फड परंपरा आणि वारकरी संप्रदाय यांचे ऐक्य समाजासाठी प्रेरणादायी असल्याचे त्यांनी नमूद केले.

## कुत्रा आडवा आल्याने जखमी झालेल्या दुचाकीस्वाराचा मृत्यू

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२ जून-**



कुत्रा आडवा आल्याने दुचाकी वरून पडून जखमी झालेल्या तरुणाचा उपचारादरम्यान येथील शासकीय रुग्णालयात आज मंगळवारी सकाळी ११ वाजता मृत्यू झाला.

विशाल वसंत जाधव (वय ३४ वर्ष , रा. लिमयेवाडी, सोलापूर) असे त्या मयत तरुणाचे नाव असून मयत विशाल आणि करण शाम भणगे (रा लिमयेवाडी ) हे दोघे १ जून रोजी पहाटे अडीच वाजेच्या सुमारास सोरेगाव कडून लिमये वाडी कडे दुचाकी वरून डबल सीट येत असताना दुचाकी समोर अचानक कुत्रा आडवा आला. त्यामुळे दोघे तरुण दुचाकीवरून पडून जखमी झाले.

हे दोघे तरुण उपचाराकरिता येथील शासकीय रुग्णालयात पहाटे स्वतः दाखल झाले असता उपचारादरम्यान विशाल जाधव याचा आज मंगळवारी सकाळी मृत्यू झाला.

## बार्शीत गुटखा विक्रेत्याविरुद्ध अन्न व औषध प्रशासनाची कारवाई

### पुरवठादार व साठ्यामागील मुख्य सूत्रधारांचा शोध सुरू

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. २ जून-**

बार्शी शहरातील सुभाषनगर परिसरातील एका पान शॉपवर अन्न व औषध प्रशासनाने कारवाई करत प्रतिबंधित गुटखा, पानमसाला आणि सुगंधित तंबाखूचा साठा जप्त केला आहे. या प्रकरणी संबंधित दुकान चालकाविरुद्ध अन्न सुरक्षा व मानके कायदा तसेच भारतीय न्यायसंहितेच्या विविध कलमांन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

बार्शी शहर पोलिसांना मिळालेल्या गोपनीय माहितीनुसार सहायक पोलीस अधीक्षक अंजना कृष्णा व्ही. एस. यांच्या मार्गदर्शनाखाली सुभाषनगर येथील हिरेमठ हॉस्पिटलजवळील 'त्रिमूर्ती पान शॉप' या दुकानावर छापा टाकण्यात आला. कारवाईदरम्यान विविध ब्रँडचा गुटखा, पानमसाला, आरएमडीसह एकूण १५ प्रकारचे प्रतिबंधित पदार्थ आढळून आले.

सदर कारवाईनंतर बार्शी शहर पोलिसांनी जप्त केलेला मुद्देमाल अन्न व औषध प्रशासनाकडे तपासणीसाठी सुपूर्द केला. अन्न सुरक्षा अधिकारी रामानंद उमाशंकर स्वामी यांनी पंचांसमक्ष मुद्देमालाची पाहणी केली असता जप्त करण्यात आलेल्या पाकिटांमध्ये गुटखा, सुगंधित तंबाखू, सुपारी, कात, चुना आणि तत्सम घटकांचे मिश्रण असल्याचे निदर्शनास आले. तपासणीदरम्यान प्रतिबंधित अन्नपदार्थांचा एकूण १३ हजार ३८२ रुपयांचा साठा आढळून आला. महाराष्ट्र शासनाच्या अन्न सुरक्षा आयुक्तांनी जारी केलेल्या अधिसूचना दि. १६ जुलै २०२५ अन्वये राज्यात गुटखा, पानमसाला आणि तत्सम पदार्थांच्या उत्पादन, वाहतूक, साठा व विक्रीवर बंदी असतानाही हा साठा विक्रीसाठी ठेवण्यात आल्याचे तपासात स्पष्ट झाले. याप्रकरणी संकेत भगवान लांडगे (वय ३२, रा. सुभाषनगर, बार्शी) यांच्याविरुद्ध अन्न सुरक्षा व मानके कायदा २००६ मधील विविध कलमे तसेच भारतीय न्यायसंहितेच्या कलम २२३, २७४, २७५ व १२३ अन्वये कायदेशीर कारवाई करण्यात आली आहे. तसेच प्रतिबंधित पदार्थांची विक्री पुन्हा होऊ नये म्हणून संबंधित पान शॉप सील करण्यात आले आहे.

## अवैध हातभट्टी व मद्यविक्रीविरोधात कारवाई; २३ लाखांचा मुद्देमाल जप्त

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. २ जून-**



राज्य उत्पादन शुल्क विभाग, सोलापूर यांनी जिल्ह्यात अवैध हातभट्टी निर्मिती, मद्य विक्री व वाहतुकीविरोधात विशेष मोहीम राबवत मोठी कारवाई केली आहे. या कारवाईत २३ लाख ५६ हजार ८४० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून ६४ गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

विभागीय उपायुक्त पुणे विभाग सागर धोमकर यांच्या निर्देशानुसार तसेच अधीक्षक राज्य उत्पादन शुल्क सोलापूर भाग्यश्री पं. जाधव, आणि उपअधीक्षक सौरभ बा. अदाटे0 यांच्या मार्गदर्शनाखाली दि. २९ मे ते ३१ मे २०२६ या कालावधीत कारवाई करण्यात आली. या कारवाईत ४३ हजार १७५ लिटर रसायन, ३ हजार ७८३ लिटर हातभट्टी दारू, १६.२ बल्क लिटर देशी मद्य, १५.६ बल्क लिटर बिअर आणि १२५ बल्क लिटर ताडी असा मोठा साठा जप्त करण्यात आला. तसेच ४७ जणांवर कारवाई करून ३ वाहनांसह २३.५६ लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. राज्य उत्पादन शुल्क विभागाने हातभट्टी निर्मितीचे समूळ उच्चाटन करण्यावर भर दिला असून पोलीस विभाग व इतर यंत्रणांच्या समन्वयाने संयुक्त कठोर कारवाया करण्यात येणार असल्याचे सांगण्यात आले आहे. अवैध मद्य विक्री, निर्मिती किंवा वाहतुकीसाठी जागा उपलब्ध करून देणाऱ्या मालकांनाही आरोपी करण्यात येत असल्याची माहिती विभागाने दिली.

गुन्हे अन्वेषणाच्या आकडेवारीनुसार, जानेवारी ते मे २०२५ या कालावधीत सोलापूर जिल्ह्यात १,१९७ गुन्हे, १,१०१ वारस, १,१२४ अटक आरोपी आणि ३ कोटी ३३ लाख २७ हजार १४९ रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला होता. तर जानेवारी ते मे २०२६ या कालावधीत १,२९७ गुन्हे, १,२२१ वारस, १,२५४ अटक आरोपी आणि ५ कोटी ७३ लाख ३० हजार २०६ रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. यामध्ये गुन्ह्यांमध्ये ८ टक्के, वारसांमध्ये ११ टक्के, अटक आरोपींमध्ये १२ टक्के आणि मुद्देमालाच्या किमतीत ७२ टक्के वाढ झाल्याचे दिसून आले आहे. अवैध मद्यनिर्मिती, विक्री, वाहतूक किंवा मिथेनॉल, क्लोरेल हायड्रेट यांसारख्या पदार्थांच्या वापराबाबत माहिती असल्यास नागरिकांनी टोल फ्री क्रमांक १८००२३३९९९ किंवा व्हॉट्स ॲप क्रमांक ८४२२००११३३ वर तात्काळ माहिती द्यावी.

CMYK
सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



# अमेरिकेच्या हल्ल्याने इराण चवताळला

## होर्मुझ, बाब-अल-मंदेब जलमार्ग ठप्प करण्याचा इशारा

◆ **तेहरान, २ जून**

इराणवर होणारे अमेरिकेचे हल्ले आणि इस्रायलकडून लेबनॉन, गाझामधील कारवाई तातडीने थांबवावी अन्यथा, होर्मुझ आणि बाब-अल-मंदेब जलमार्ग पूर्णपणे ठप्प करण्याचा इशारा इराणच्या इस्लामिक रिव्होल्युशनरी गार्ड कार्प्सने (आयआरजीसी) दिली आहे. या जलमार्गावरील जहाजांची वाहतूक बंद केली जाईल आणि यासाठी अमेरिका, इराण जबाबदार राहील. हल्ले न थांबल्यास आखाती देशातील ऊर्जा प्रकल्पांवर क्षेपणास्त्राचा मारा करणार असल्याचेही त्यांनी म्हटले आहे.

शांतता करारासाठी अमेरिकेसोबत सुरू असलेल्या सर्व वाटाघाटी बंद करण्याची घोषणा आयआरजीसीने केली आहे. अमेरिकेच्या जाचक अटी अमान्य असून संघर्षविराम आणि करारासाठी सुरू असलेली चर्चा इराणच्या अटी मान्य केल्याशिवाय पुढे जाणार नसल्याचे त्यांनी स्पष्ट केले. इराणच्या इशाऱ्यामुळे आंतरराष्ट्रीय बाजारपेठा आणि व्यापार क्षेत्रात मोठी खळबळ उडाली आहे. इराणच्या रिव्होल्युशनरी गार्डच्या कुद्स फोर्सचे कमांडर इस्माईल कानी यांनी निवेदनात म्हटले की, इस्रायलने लेबनॉन आणि गाझामध्ये सुरू ठेवलेले हल्ले थांबवले नाहीत तर ॲक्सिस ऑफ रेसिस्टन्सकडून कठोर पावले उचलली जातील. यामध्ये बाब-अल-मंदेब जलमार्गावर नियंत्रण ठेवण्याचाही समावेश असेल; याशिवाय होर्मुझ मार्ग पूर्णपणे बंद केला जाईल. इराणने अमेरिकेसोबतच्या संघर्षविरामाची चर्चा तात्पुरत्या स्वरूपात स्थगित केली आहेत. जोपर्यंत लेबनॉनमधील इस्रायली हल्ले थांबत नाहीत, तोपर्यंत मध्यस्थांमार्फत अमेरिकेसोबत कोणतीही चर्चा होणार नाही.



**लेबनॉनमधील कारवाईवर फ्रान्सचा आक्षेप**

लेबनॉनमध्ये इस्रायलच्या वाढत्या लष्करी कारवाईच्या पृष्ठभूमीवर फ्रान्सने संयुक्त राष्ट्र सुरक्षा परिषदेची तातडीची बैठक बोलाविण्याची मागणी केली आहे. दुसरीकडे इराणने म्हटले की, जोपर्यंत त्याचे अधिकार पूर्णपणे सुरक्षित आहेत याची खात्री होत नाही, तोपर्यंत अमेरिकेसोबत कोणत्याही कराराला मंजुरी दिली जाणार नाही. ◀(वृत्तसंस्था)

### बाब-अल-मंदेबचे महत्त्व काय?

बाब-अल-मंदेब हा अरबी भाषेतील शब्द असून त्याचा अर्थ अश्रूंचे दार असा होतो. हा अत्यंत महत्त्वाचा आणि अरुंद समुद्री मार्ग लाल समुद्र आणि एडनच्या आखाताला जोडतो. याच मार्गातून स्वेझ कालव्याद्वारे आशिया आणि युरोप यांच्यातील मोठ्या प्रमाणावरील व्यापार चालतो. येमेन, जिबूती आणि एरिट्रिया यांच्या दरम्यान असलेला हा जलमार्गचे सामरिक महत्त्व प्रचंड आहे. १० ते १२ टक्के मालवाहतूक या मार्गातून होते. हा मार्ग बंद झाल्यास आशिया आणि युरोपमधील पुरवठा साखळीवर परिणाम होऊ शकतो. ■

### संघर्षविरामाच्या अटी मोडल्या

इस्माईल कानी यांनी म्हटले की, लेबनॉनमध्ये शांतता राखणे ही शस्त्रसंधीची एक प्रमुख अट होती. तथापि, आता लेबनॉनसह अनेक आघाड्यांवर या कराराचे उल्लंघन होत आहे. अमेरिकेने मागील आठवड्यात इराणच्या क्षेत्रात हल्ले चढवले. संघर्षविराम असतानाही हल्ले करणे अटींचे उल्लंघन आहे. इस्रायली लष्करी कारवाया तत्काळ थांबावी आणि लेबनॉनच्या भूभागातून इस्रायली सैन्य पूर्णपणे मागे घेण्याची मागणी त्यांनी केली. इराणची बंदरे रोखून आणि लेबनॉनमधील नागरिकांना ठार मारून लष्करी दबाव वाढविणे महागात पडेल, असा इशारा इराणचे संसद अध्यक्ष मोहम्मद बाकेर कालिबाफ यांनी दिला. ■

# माझ्यामुळे तुरुंगवारी टळली

## लेबनॉनवरील हल्ल्याने ट्रम्प भडकले; नेतान्याहू यांना सुनावले

◆ **वॉशिंग्टन, २ जून**



लेबनॉनवर सातत्याने होणारे हल्ले आणि दहशतवादी हिज्बुलाहच्या भूभागावर ताबा मिळविल्याने राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प चांगलेच भडकले. त्यांनी सोमवारी इस्रायलचे पंतप्रधान बेंजामिन नेतान्याहू यांच्याशी दूरध्वनीवरून संवाद साधत लेबनॉनवरील हल्ले तातडीने थांबविण्याचे सांगितले. माझ्यामुळेच तुम्ही तुरुंगात जाण्यापासून वाचला याची आठवण ट्रम्प यांनी करून दिली.

ट्रम्प आणि नेतान्याहू यांच्यातील संवादाची माहिती अमेरिकेच्या एका अधिकाऱ्याने वृत्तसंस्थेला दिली. ट्रम्प यांनी हिजबुल्लाहवर सुरू असलेले हल्ले त्वरित थांबवण्यास सांगितले आहे. यासाठी दबाव टाकताना ट्रम्प यांनी म्हटले की, जर मी नसतो तर नेतान्याहू आता तुरुंगात असते. न्यूयॉर्क टाईम्सने दिलेल्या वृत्तानुसार संभाषणावेळी ट्रम्प फार रागात होते. तू पूर्णपणे वेडा झाला आहे, जर मी नसतो तर तू आता तुरुंगात गेला असतास. मी तुझा जीव वाचवत आहे. या क्षणाला सर्वजण तुझा तिरस्कार करत आहेत. तुझ्या याच कारवायांमुळे आज सर्वजण इस्रायलचा तिरस्कार करत असल्याचे ट्रम्प यांनी नेतान्याहू यांना सुनावले. यावेळी त्यांनी काही अपशब्दांचा देखील वापर केला. ◀(वृत्तसंस्था)

### इस्रायल निर्णयावर ठाम

ट्रम्प यांची नाराजी असली तरी नेतान्याहू यांनी आपल्या निर्णयावर ठाम असल्याचे सांगण्यात येत आहे. या संभाषणानंतर त्यांनी एक्सवरील पोस्टमध्ये म्हटले की, आज रात्री मी ट्रम्प यांच्याशी चर्चा केली. त्यांना मी स्पष्टपणे सांगितले की, जर हिजबुल्लाहने पुन्हा आमच्या शहरांवर किंवा नागरिकांवर हल्ला केला तर इस्रायल बैरूतमधील दहशतवादी ठिकाणे उद्ध्वस्त करेल. या भूमिकेत कोणताही बदल होणार नाही. याचबरोबर इस्रायल सैन्य दक्षिण लेबनानमधील आपली कारवाई सुरू ठेवणार आहे. ■

# तृणमूल काँग्रेस फुटीच्या उंबरठ्यावर?

## हॉटेलमध्ये ५० आमदारांनी बैठक; निवडणूक चिन्ह बळकावण्याचा डाव

◆ **कोलकाता, २ जून**

विधानसभा निवडणुकीतील दारुण पराभवानंतर तृणमूल काँग्रेसमध्ये कमालीची अस्वस्थता पसरली आहे. ईडी -सीबीआयच्या भीतीपोटी अनेक पदाधिकारी आणि कार्यकर्ते पक्षाला रामराम ठोकत आहेत. पक्षविरोधी कारवायांचा ठपका ठेवत तृणमूलने काही लोकप्रतिनिधींना बाहेरचा रस्ता दाखवला आहे. आता, असे असंतुष्ट एकत्र येत पक्षालाच खिंडार पाडण्याच्या प्रयत्नात आहे. दरम्यान, पक्षातून हकालपट्टी केलेले नेते रिजू दत्ता यांनी तृणमूल काँग्रेसच्या फुटीबाबत एक मोठा दावा केला आहे. यासंदर्भात टीएमसीच्या ५० आमदारांनी एका हॉटेलमध्ये बैठक घेतली आहे. पक्षाचे निवडणूक चिन्ह बळकावण्याचा त्यांचा डाव आहे.

रिजू दत्ता यांनी पुढे सांगितले की, तृणमूलचे दोन आमदार ऋतब्रता बॅनर्जी आणि संदीपान साहा यांनी विधानसभा अध्यक्षांना पत्र लिहून आपल्या सह्या बनावट असल्याचा दावा केला आहे. यानंतर तृणमूल काँग्रेसने या दोन आमदारांना पक्षातून काढून टाकले. मी अनेक वर्षे तृणमूल काँग्रेसमध्ये काम केले आहे. त्यामुळे मला माहिती मिळाली होती आणि कुणाल घोष यांनीही प्रसारमाध्यमांना सांगितले की, ऋतब्रता बॅनर्जी यांच्या नेतृत्वात सुमारे ५० टीएमसी आमदार एका हॉटेलमध्ये भेटले. त्यांनी फोनवरही संवाद साधला आणि सायंकाळी आमदार वसतिगृहात अनेक आमदारांसोबत बैठक घेतली.

दत्ता पुढे म्हणाले, आमच्याकडे दोन-तृतीयांश बहुमत आहे. सुमारे ५० आमदार आमच्यासोबत आहेत. आम्हीच खरी तृणमूल काँग्रेस आहोत. आम्ही खरी तृणमूल काँग्रेस असल्यामुळे विरोधी पक्षनेते शोभनदेव चट्टोपाध्याय नव्हे, तर ऋतब्रता बॅनर्जी असतील. आमच्याकडे बहुमत असल्यामुळे पक्षाचे निवडणूक चिन्हही आमचेच असले पाहिजे, असा दावाही त्यांनी केला. रिजू दत्ता पुढे म्हणाले, मला दोन अत्यंत महत्त्वाचे मुद्दे मांडायचे आहेत. पहिले म्हणजे, अभिषेक बॅनर्जी यांनी जबाबदारी स्वीकारलीच पाहिजे.

### भाजपाचे दरवाजे बंदः भट्टाचार्य

**पश्चिम बंगाल भाजपा प्रदेशाध्यक्ष सामिक भट्टाचार्य यांनी एक मोठे विधान केले आहे. तृणमूल काँग्रेसच्या बंडखोर आमदारांना भाजपामध्ये घेतले जाणार नाही. भाजपाचे कधीही तृणमूलीकरण होणार नाही. आमचे दरवाजे तृणमूलसाठी बंद आहेत, असेही त्यांनी स्पष्ट केले.** ■

**दोन आमदारांच्या निलंबनानंतर चर्चेला उधाण**

ममता बॅनर्जी यांनी सोमवार ऋतब्रता बॅनर्जी आणि संदीपान या दोन आमदारांना पक्षातून काढून टाकल्यानंतर तृणमूल काँग्रेसमध्ये फूट पडल्याच्या चर्चेला उधाण आले आहे. सोमवारी सहा आमदार एका हॉटेलमध्ये भेटले. तिथे दोन बंडखोर आमदारही उपस्थित होते. बंडखोर आमदारांची मागणी आहे की, ऋतब्रता बॅनर्जी यांना विधानसभेत विरोधी पक्षनेते बनवावे, तर ममता बॅनर्जी यांनी त्यांचे निकटचे सहकारी शोभनदेव चट्टोपाध्याय यांची विरोधी पक्षनेतेपदी नियुक्ती केली आहे. ◀(वृत्तसंस्था)

### रविना टंडनच्या घरात २५ लाखांची चोरी

**मुंबई** : बॉलिवूड अभिनेत्री रविना टंडन यांच्या कुटुंबाचा विश्वास संपादन करून घरात नियमित वावर असलेल्या महिलेनेच लाखो रुपयांचे दागिने आणि महागडी घड्याळे चोरी केल्याचा प्रकार समोर आला आहे. पोलिसांनी तिला अटक केली आहे.

ही घटना रविना टंडन यांच्या आईच्या घरात घडली. राशी छाबडिया असे अटक करण्यात आलेल्या महिलेचे नाव असून ती मागील काही वर्षांपासून टंडन कुटुंबाच्या संपर्कात होती. विशेषतः रविना टंडन यांच्या आईची देखभाल करण्यासाठी ती नियमितपणे घरी येत असल्याने कुटुंबाचा तिच्यावर पूर्ण विश्वास होता. पोलिसांच्या प्राथमिक तपासात घरातील तिजोरीत ठेवलेले सोने, हिऱ्यांचे दागिने तसेच दोन महागडी घड्याळे चोरीला गेल्याचे निष्पन्न झाले. ■

# अमेरिकेत ३० भारतीय ट्रकचालकांना अटक

◆ **न्यू यॉर्क, २ जून**

अमेरिकेच्या इमिग्रेशन कायद्यांतर्गत राबविण्यात आलेल्या एका विशेष कारवाईत बेकायदेशीरपणे वास्तव्य करणाऱ्या ५२ जणांना अटक करण्यात आली. यात ३६ व्यावसायिक ट्रक चालकांचा समावेश असून त्यातील ३० जण भारतीय आहे. अनेकांचे वर्क परमिट कालबाह्य होऊनही आणि वैध परवाना नसताना ते ट्रक चालवत असल्याचे तपासात निष्पन्न झाले.



कायदेशीर प्रक्रियेनंतर ३० भारतीय ट्रक चालकांना अमेरिकेतून हद्दपार करण्यात येणार असल्याचे एका अधिकाऱ्याने सांगितले. अमेरिकेच्या सीमाशुल्क आणि सीमा संरक्षण विभागाने सोमवारी जारी केलेल्या एका निवेदनात म्हटले की, ११ ते १५ मे दरम्यान ॲरिझोनाच्या युमा सेक्टरमध्ये राबविण्यात आलेल्या ऑपरेशन चेकमेट दरम्यान, बॉर्डर पेट्रोल एजंट्सनी अमेरिकेत बेकायदेशीरपणे वास्तव्य करणाऱ्या ५२ जणांना अटक केली. यापैकी ३० भारतीय नागरिक ट्रक चालक आहे. मेक्सिको, एल साल्वाडोर आणि रशियाच्या सहा नागरिकांचाही यात समावेश आहे. त्यांच्याकडे कॅलिफोर्निया, न्यूयॉर्क, वॉशिंग्टन आणि व्हर्जिनिया यांसारख्या राज्यांनी जारी केलेले व्यावसायिक चालक परवाने होते, तर भारतीय चालकाकडे कोणताही वैध परवाना आढळून आला नाही. ◀(वृत्तसंस्था)

### 'त्या' कागदपत्रांची मुदत संपली

अटक करण्यात आलेल्या काही जणांकडे माजी राष्ट्राध्यक्ष जो. बायडेन यांच्या कार्यकाळात मिळविलेली रोजगार अधिकृतता कागदपत्रे होती, परंतु त्यांची वैधता आता संपली होती. अटक केलेल्या सर्वांवर संघीय कायद्यानुसार खटला चालवण्यात आला आहे आणि त्यांना हद्दपार केले जाईल. ऑपरेशन चेकमेट या अभियानाचा उद्देश स्थलांतर कायद्यांची अंमलबजावणी करणे, देशात व्यावसायिक मोटार वाहने चालवणाऱ्या बेकायदेशीर व्यक्तींना ओळखणे आणि पकडणे तसेच सार्वजनिक सुरक्षा मजबूत करणे हा आहे. ■

## चित्रपट वार्ता


### करिश्मा कपूरची वेब सीरिज होणार प्रदर्शित



**मुंबई** : बॉलिवूड अभिनेत्री करिश्मा कपूर लवकरच 'ब्राउन' या वेब सीरिजमध्ये दिसणार आहे. अभिनय देव दिग्दर्शित ही सीरिज ५ जून रोजी ओटीटी प्लॅटफॉर्मवर प्रदर्शित होणार आहे. या निओ-नोयर क्राईम थ्रिलर सीरिजमध्ये करिश्मासोबत जिस्सू सेनगुप्ता, सूर्या शर्मा, सोनी राजदान आणि अनुभवी अभिनेत्री हेलन यांचा समावेश आहे. याशिवाय परेश पाहुजा, मेघना मलिक, अजिंक्य देव, के.के. रैना आणि गायक शान देखील विशेष भूमिकांमध्ये दिसणार आहेत. कोलकाताच्या न पाहिलेल्या गल्ल्यांमध्ये या वेब सिरीजचे चित्रीकरण झाले आहे. ■

### 'काला हिरन'ला कायदेशीर नोटीस

**मुंबई** : आगामी चित्रपट 'काला हिरन' संदर्भात सलमान खानने त्याच्या निर्मात्यांना कायदेशीर नोटीस पाठवली आहे. सलमानच्या वतीने पाठवलेल्या कायदेशीर नोटीसमध्ये निर्माता आणि दिग्दर्शकाला चित्रपटाचे प्रदर्शन थांबवण्याची, पोस्टर हटवण्याची आणि त्यासंबंधीचे सर्व प्रमोशनल मटेरियल काढून टाकण्याची मागणी केली आहे. या मागण्या मान्य केल्या नाहीत, तर चित्रपटाच्या टीमविरुद्ध पुढील कायदेशीर कारवाई केली जाईल, असे नोटीसमध्ये म्हटले आहे. हा चित्रपट कथितरित्या काळवीट शिकार प्रकरणावर आधारित आहे आणि यामुळे अभिनेत्याच्या प्रतिमेला हानी पोहोचू शकते, असे नोटीसमध्ये म्हटले आहे. ■






११ व्या वर्गातील विद्यार्थी सूर्या चौहान याची गाझियाबाद येथे हत्या झाल्यानंतर सूर्याचा मारेकरी असदचे घर प्रशासनाने जप्त केले आहे. तसेच घराचे बांधकाम नियमानुसार नसल्याने ते पाडण्यासाठी नोटीसही दिली आहे. शहरातील असामाजिक तत्त्वांविरूद्ध पोलिसांनी कारवाई सुरू केली असून मंगळवारी रूटमार्च काढण्यात आला

# गुजरातमध्ये १२ सिंह, मध्य प्रदेशात १० वाघांचा मृत्यू

◆ **अरमेली, २ जून**

एशियाटिक सिंहांसाठी प्रसिद्ध असलेल्या गुजरातच्या पूर्व आणि पश्चिम गिर जंगलात १२ सिंहांच्या मृत्यूचे प्रकरण केंद्र सरकारपर्यंत पोहोचले आहे. वन विभागाने ३० हून अधिक सिंहांना पशू काळजी केंद्रात ठेवले आहे. मात्र, सिंहांचा प्रयोगशाळा अहवाल अद्याप जारी करण्यात आलेला नाही.

अशीच स्थिती मध्य प्रदेशातील वाघांची आहे. कान्हा व्याघ्र प्रकल्पात २ एप्रिलपासून आतापर्यंत १० वाघांचा मृत्यू झाला आहे. वाघांमध्ये कॅनाईन डिस्टेंपर व्हायरसची गंभीर लक्षणे आढळल्यानंतर वन विभागाने अलर्ट मोडमध्ये मोहीम सुरू केली आहे.

गुजरातच्या सिंहांमध्ये कॅनाईन डिस्टेंपर व्हायरसची लक्षणे आढळल्यानंतर वरिष्ठ अधिकारी आणि राज्याचे वनमंत्री अर्जुन मोढवाडिया यांनी जसाधार पशू काळजी केंद्राला भेट दिली. मागील १५ दिवसांत १२ सिंहांचा मृत्यू होऊनही अहवाल जारी न झाल्यामुळे प्रकरण अधिक गंभीर होत आहे. ३० पेक्षा जास्त सिंहांना जसाधार ॲनिमल केअर सेंटरमध्ये ठेवण्यात आले आहे. गुजरातमध्ये सुमारे आठ दिवसांपूर्वी पाच बछडे आणि चार सिंहांचा मृत्यू झाला. त्यांच्या विसरा नमुन्यांच्या तपासणीनंतरही वन विभागाने अद्याप कोणताही अहवाल जारी केलेला नाही. तथापि, विषाणूच्या लक्षणांमुळे वन विभागाने सावधगिरी बाळगत काम सुरू केले आहे. ◀(वृत्तसंस्था)

# विदेशी नागरिकांसाठी बदलले इमिग्रेशनचे नियम

◆ **नवी दिल्ली, २ जून**

केंद्र सरकारने विदेशी नागरिकांच्या नोंदणी आणि अपीलशी संबंधित नियमांमध्ये बदल केले आहेत. गृह मंत्रालयाने इमिग्रेशन अँड फॉरेनर्स नियमची अधिसूचना जारी केली.

नवीन नियमांनुसार, विदेशी नागरिक आता १८० दिवस पूर्ण होण्यापूर्वी कधीही नोंदणी करू शकतील. तसेच, ऑनलाईन अपीलचा पर्यायही देण्यात आला आहे. यापूर्वी भारतात १८० दिवस पूर्ण झाल्यानंतर विदेशी नागरिकांना १४ दिवसांच्या आत नोंदणी करावी लागत होती. आता ते १८० दिवस पूर्ण होण्यापूर्वी कोणत्याही वेळी नोंदणी करू शकतील. निर्धारित वेळ निघून गेल्यानंतर नोंदणी केवळ विशेष परिस्थितीतच केली जाईल, असे सरकारने म्हटले आहे. पहिल्यांदाच ऑनलाईन अपीलची व्यवस्था जोडण्यात आली आहे. कोणत्याही आदेशामुळे प्रभावित झालेली व्यक्ती आता ब्युरो ऑफ इमिग्रेशनच्या आयुक्तांकडे ऑनलाईन अपील करू शकेल. आदेश मिळाल्यापासून ३० दिवसांच्या आत अपील करावे लागेल. आयुक्त संबंधित पक्षाची सुनावणी केल्यानंतर निर्णय देतील.

पालकांपैकी जर कोणी एक भारतीय नागरिक असेल आणि मुलाचे भारतीय नागरिकत्व कायम ठेवू इच्छित असेल, तर मुलावर विदेशी नागरिकांच्या नोंदणीचे नियम लागू होणार नाहीत. तसेच, भारतात राहणारे एखादे मूल दुसऱ्या देशाचे नागरिकत्व मिळवते, तर त्याच्या पालकांना ३० दिवसांच्या आत याची माहिती नोंदणी अधिकाऱ्याला द्यावी लागेल. ◀(वृत्तसंस्था)

(पान १ वरुन...)

### सोलापुरातील गोकुळ, भीमा, कुर्मदास कारखान्यांना जप्तीची नोटीस

अवसायानाची (आरआसरी) नोटीस बजावली आहे. सर्वाधिक तीन कारखाने सोलापूर जिल्ह्यातील आहेत. सात कारखान्यांमध्ये सोलापूर जिल्ह्यातील गोकुळ, भीमा व कुर्मदास या तीन कारखान्यांचा समावेश आहे.

१३०४६.२५ लाख रुपये गोकुळ शुगर्स लि., धोत्री. ३०२२.२६ लाख रुपये भीमा सहकारी साखर कारखाना लि. टाकळी, सिकंदर, १५९७.५६ लाख रुपये श्री संत कुर्मदास सहकारी साखर कारखाना लि., माढा. धाराशिव जिल्ह्यातील भिमाशंकर शुगर मिल्स लि.,पारगाव यांच्याकडे १२२६.५१ लाख रुपये, अहिल्यानगरमधील केदारेश्वर सहकारी साखर कारखाना लि. अहिल्यानगर यांच्याकडे २२४४.६५ लाख रुपये.

नाशिकमधील एस. जे. शुगर डिस्टलरी ॲण्ड पॉवर प्रा. लि., नाशिक यांच्याकडे १९३.०४ लाख रुपये आणि छत्रपती संभाजीनगरमधील सचिन घायाळ शुगर्स प्रा. लि., पैठण या कारखान्यांकडे १९४९.२७ लाख रुपये, असे सात कारखान्यांकडे एकूण २३ हजार २७९ लाख ५३ हजार रुपयांची एफआरपी थकीत आहे. जिल्हाधिकाऱ्यांकडून संबंधित कारखान्यांवर कारवाई करण्यात येणार आहे.

### खंडणीच्या आरोपाखाली तीन बंडखोरांना अटक

**इम्फाळ** : मणिपूरमध्ये खंडणीच्या आरोपाखाली तीन बंडखोरांना अटक करण्यात आली आहे, अशी माहिती पोलिसांनी मंगळवारी दिली. प्रतिबंधित पीपल्स लिबरेशन आर्मीच्या दोन कार्यकर्त्यांना सोमवारी इम्फाळ पूर्व जिल्ह्यातून अटक करण्यात आली, असे त्यांनी सांगितले. संशयितांची ओळख मैबाम अरुण सिंग आणि थांगजाम सुरनकुमार सिंग अशी पटली आहे. कांगलेई यावोल कन्ना लुपच्या एका सदस्याला इम्फाळ पश्चिम जिल्ह्यातील एका कार्यालयीन संकुलातून अटक करण्यात आली. त्याची ओळख ब्रह्मचरिमयुम सना शर्मा उर्फ इबुंगो उर्फ मनिसाना अशी पटली आहे. हे अतिरेकी स्थानिक लोकांना आणि लहान व्यावसायिकांना धमकावून पैशांची मागणी करीत असत. ■

# गुहेत सापडले ६७,८०० वर्षे जुने अमूर्त चित्र

## गिनीज वर्ल्ड रेकॉर्ड्सने केले वर्गीकृत ● जगातील सर्वात जुने चित्र असल्याचा दावा

◆ **जकार्ता, २ जून**

इंडोनेशियातील दक्षिण-पूर्व सुलावेसीमधील मुना बेटावरील लियांग मेटांडुनो गुहेत सापडलेल्या एका हाताच्या ठशाला, जगातील सर्वात जुने ज्ञात अमूर्त चित्र म्हणून अधिकृतपणे प्रमाणित करण्यात आले आहे. ही कलाकृती किमान ६७,८०० वर्षे जुनी असल्याचे निश्चित झाले आहे.

हा शोध पुरातत्त्व आणि पुरातत्त्व मापन तज्ज्ञांनी लावला. यांनी त्या स्थळावरील अनेक पुराश्मयुगीन कलाकृतींचा अभ्यास केला. या शोधाचा तपशील २१ जानेवारी रोजी 'नेचर' या नियतकालिकात प्रकाशित झाला आणि नंतर गिनीज वर्ल्ड रेकॉर्ड्सने अमूर्त कला म्हणून वर्गीकृत



केलेले सर्वात जुने चित्र म्हणून त्याला औपचारिकपणे प्रमाणित केले. या अभ्यासात इंडोनेशियाच्या राष्ट्रीय संशोधन आणि नवोपक्रम संस्थेचे संशोधक आणि पुरातत्त्वमिती तज्ज्ञ डॉ. आधी अगुस ओक्टावियाना तसेच ऑस्ट्रेलियातील ग्रिफिथ विद्यापीठातील पुरातत्त्वशास्त्राचे प्राध्यापक ॲडम ब्रम आणि मॅक्सिम ऑबर्ट यांचा समावेश होता. सुलावेसी गुहा चित्रांचे कालनिर्धारण करण्याच्या उद्देशाने २०१२ मध्ये संशोधन सुरू झाले.

सुरुवातीला बेटाच्या नैर्ऋत्य द्वीपकल्पावरील स्थळांवर लक्ष केंद्रित करण्यात आले. काही वर्षांनंतर, चमूने आपले क्षेत्रीय कार्य आग्नेय द्वीपकल्प आणि जवळच्या मुना बेटापर्यंत विस्तारले. तिथेच संशोधकांनी या प्रदेशात सध्या सापडलेल्या सर्वात जुन्या शैलचित्रांचे कालनिर्धारण केले. डॉ. अधी २०१३ मध्ये प्रमुख क्षेत्रीय शैलकला संशोधक म्हणून या प्रकल्पात सामील झाले. पुढील वर्षांमध्ये, या चमूने भूकालानुक्रमशास्त्रज्ञ रेनॉड जोआनेस-बोयू यांच्यासह इतर तज्ज्ञांच्या सहकार्याने कलाकृतींचे कालनिर्धारण करण्यासाठी एक नवीन आणि अधिक कार्यक्षम पद्धत विकसित केली. संशोधकांनी यापूर्वी सुलावेसीमधील अनेक प्राचीन गुहाचित्रांचा अभ्यास करून त्यावरील निष्कर्ष प्रकाशित केले होते. तथापि, त्यांनी यापूर्वीचा कोणताही शोध नव्याने कालनिश्चिती केलेल्या हाताच्या ठशाच्या वयापर्यंत पोहोचला नव्हता, असे नमूद केले.

**हे होते सर्वात मोठे अडथळे**

संशोधनासाठी निधी मिळविणे आणि शैलचित्रांचे वय निश्चित करण्यासाठी वापरल्या जाणाऱ्या नवीन कालनिर्धारण पद्धतीचा विकास व चाचणी करण्यासाठी आवश्यक असलेले विस्तृत प्रयोगशाळेतील काम पार पाडणे, हे काही सर्वात मोठे अडथळे होते, असे संशोधकांनी स्पष्ट केले. ◀(वृत्तसंस्था)

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/



अग्रलेख...

# मानवी जीव आणि हप्तेखोरी

महाराष्ट्राच्या सांस्कृतिक राजधानीला लागून असलेल्या पिंपरी-चिंचवडमधील फुगेवाडीत आणि पुण्यातील हडपसर येथे बनावट दारू पिऊन २२ जणांचा मृत्यू झाला. अशा घटना घडल्यानंतर काही तास हळहळ व्यक्त होते, काही दिवस चर्चा होतात, थोडे फार राजकीय आरोप-प्रत्यारोप होतात, काही अधिकारी निलंबित केले जातात, काही ठिकाणी छापे पडतात आणि पुन्हा सारे सुरळीत होते. याचे प्रमुख कारण म्हणजे आपली निगरगट्ट आणि असंवेदनशील व्यवस्था. गैरकृत्ये टाळण्यासाठी प्रयत्नच केले जात नाहीत. गल्लीबोळातल्या पोरांना माहिती असलेले अड्डे पोलिसांना कसे दिसत नाहीत? किरकोळ हप्त्याच्या लालसेने राज्यात हजारो जीवांशी खेळ करणाऱ्या पोलिस यंत्रणेला आपण जबाबदार धरणार आहोत की नाही, हा खरा प्रश्न आहे. एखाद्या गावात नवीन चहाची टपरी सुरू झाली तरी दोन दिवसांत सर्वांना माहिती होते. मग अवैध दारूचा व्यवसाय, ज्यात माल येतो, साठवला जातो, विकला जातो, ग्राहकांची रांग लागते, तो नेमका पोलिसांच्या नजरेतून कसा सुटतो, असा प्रश्न विचारण्याची वेळ आली आहे. आणि पोलिसांची नजर त्यावर जातच नसेल तर त्यांची नजर असते कुठे, हेही विचारण्याचा हा प्रसंग आहे. हा प्रश्न आता उद्ध्वस्त झालेल्या २२ कुटुंबांचा आणि याच समस्येमुळे देशोधडीला लागत असलेल्या हजारो कुटुंबांचा आहे. राज्यात आतापर्यंत बनावट दारूमुळे अशा हजारो हत्या करण्यात आल्या आहेत. या हत्येचे गुन्हेगार केवळ बनावट दारू तयार करणारे नाहीत. त्यांना वाढू देणारी, फोफावू देणारी आणि त्यांच्या अवैध साम्राज्याकडे जाणीवपूर्वक डोळेझाक करणारी व्यवस्थाही गुन्हेगार आहे. आज राज्यात हजारो ठिकाणी अवैध दारू, मटका, जुगार, अमली पदार्थ आणि इतर बेकायदेशीर व्यवसाय सुरू आहेत. पोलिसांच्या माहितीशिवाय कोणताही 'अड्डा' चालू शकत नाही, हा अलिखित नियम. पण, डोळेझाक ठरलेली असते. अशा घटना त्या अर्थपूर्ण डोळेझाकीतून घडतात. अशा अड्ड्यांवर घातक रसायने आणली जातात, बनावट कारखाने उभे राहतात, वितरण व्यवस्था तयार होते. या साखळीतल्या प्रत्येक टप्प्यावर शासकीय यंत्रणेला हस्तक्षेप करण्याची संधी असते. पण तो होत नाही. याचे एकमेव कारण म्हणजे हप्तेखोरी. मग ज्यांनी कायद्याचे रक्षण करायचे, तेच कायद्याचे उल्लंघन करणाऱ्यांचे संरक्षण करू लागतात. महाराष्ट्रासारख्या प्रगत राज्यात आजही बनावट दारूचे साम्राज्य टिकून आहे, ही लाजिरवाणी बाब आहे.

तंत्रज्ञानाचा वापर वाढला आहे. सीसीटीव्ही यंत्रणा आहे. मोबाईल लोकेशन ट्रॅकिंग आहे. आर्थिक व्यवहारांवर लक्ष ठेवणाऱ्या यंत्रणा आहेत. तरीही अवैध दारूचे अड्डे उघडपणे चालत असतील, तर समस्या तंत्रज्ञानाची नाही; समस्या इच्छाशक्तीची आहे. प्रश्न केवळ पोलिसांचाच नाही. राज्य उत्पादन शुल्क विभागाची जबाबदारी काय? स्थानिक प्रशासनाची जबाबदारी काय? लोकप्रतिनिधींची जबाबदारी काय? अनेकदा नागरिक तक्रारी करतात, निवेदने देतात, आंदोलन करतात. पण कारवाई होत नाही. तक्रार करणाऱ्यांनाच अडचणींना तोंड द्यावे लागते. कारण अवैध धंद्यांच्या साखळीत अनेक हितसंबंध गुंतलेले असतात. बनावट दारूमुळे मरण पावलेले लोक प्रामुख्याने गरीब असतात. त्यात कष्टकरी मजूर असतात. त्यांच्या मृत्यूबद्दल समाजाचा दृष्टिकोनही संवेदनशील राहत नाही. हे थांबायचे असेल तर सर्वांना सदैव जागे राहावे लागेल. दुर्घटना घडल्यानंतर जागे होणाऱ्या यंत्रणेला आता दुर्घटना होण्यापूर्वी जागे व्हावे लागेल. असे अड्डे उद्ध्वस्त करणे, दोषींना अटक करणे आणि निलंबनाची औपचारिकता पूर्ण करणे पुरेसे नाही. अवैध धंद्यांना संरक्षण देणाऱ्या संपूर्ण साखळीचा शोध घेऊन कठोर कारवाई करावी लागेल. केवळ खालच्या पातळीवरील कर्मचाऱ्यांवर जबाबदारी ढकलून चालणार नाही. वरिष्ठ अधिकाऱ्यांनाही उत्तरदायी ठरवावे लागेल. कायद्याचे रक्षकच गुन्हेगारांचे संरक्षक बनले आहेत असे लोकांना वाटू लागते तेव्हा व्यवस्थेवरील विश्वास ढासळू लागतो. हा विश्वास परत मिळवण्यासाठी ठोस कृती आवश्यक आहे.

फुगेवाडी आणि हडपसरमधील मृत्यू हा राज्यासाठी इशारा आहे. हा इशारा दुर्लक्षित केला, तर उद्या अशाच प्रकारे आणखी शेकडो-हजारो कुटुंबे उद्ध्वस्त होतील. हे दुष्टचक्र थांबवायचे असेल, तर आता प्रश्न थेट विचारावा लागेल. कठोर कारवाई होत नाही, तोपर्यंत बनावट दारूमुळे होणारा प्रत्येक मृत्यू हा केवळ गुन्हेगारांचा नव्हे, तर संपूर्ण व्यवस्थेचा अपराध मानावा लागेल. बनावट दारूचा सर्वाधिक फटका समाजातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकाला, म्हणजेच कष्टकरी, मजूर आणि रोजंदारीवर जगणाऱ्या वर्गाला बसतो. अवघ्या २० ते ३० रुपयांच्या प्लास्टिक पिशव्यांमधून मिळणारी ही दारू म्हणजे प्रत्यक्ष यमदूतच असते. या विषारी दारूमुळे मृत्युमुखी पडणारे बहुतांश लोक हे कुटुंबातील एकमेव कमावते पुरुष असतात. एका रात्रीत त्यांचा मृत्यू झाल्याने अख्खे कुटुंब उघड्यावर पडते. या दारूत नशा वाढवण्यासाठी बेकायदेशीरपणे मिसळले जाणारे मिथेनॉल अत्यंत घातक रसायन शरीरात जाऊन फॉर्मिक ॲसिड तयार करते. जीव वाचला तरी मेंदूवर कायमचा परिणाम होतो किंवा दृष्टी जाते. कुटुंबाचा आधार असणारा माणूस जेव्हा कायमचा परावलंबी होतो, तेव्हा त्या कुटुंबाची परवड सुरू होते. कायदेशीर आणि मान्यताप्राप्त दारू विक्रीवर राज्य शासनाला मोठ्या प्रमाणात राज्य उत्पादन शुल्क कर मिळतो. तो राज्याच्या विकासासाठी वापरला जातो. बनावट दारूच्या समांतर बाजारपेठेमुळे शासनाचा हा महसूल थेट माफियांच्या खिशात जातो. गोव्यासारख्या शेजारील राज्यातून हलक्या दर्जाची दारू आणून, तिच्यावर नामांकित कंपन्यांचे बनावट लेबल लावून ती महाराष्ट्रात विकली जाते. हा कोट्यवधी रुपयांचा काळा पैसा करमुक्त असल्याने सरकारचा महसूल तर बुडतोच, शिवाय हाच पैसा नव्याने इतर बेकायदेशीर धंद्यांकडे वळवला जातो. बनावट दारूचे अड्डे पोलिस आणि उत्पादन शुल्क विभागाच्या डोळ्यांदेखत किंवा त्यांच्या दुर्लक्षामुळे चालतात, हे वेळोवेळी सिद्ध झाले आहे. नुकत्याच पुण्यात झालेल्या घटनेनंतर अनेक पोलिस आणि एक्साईज अधिकाऱ्यांचे झालेले निलंबन हेच दर्शवते. कायद्याचा धाक संपल्यामुळे गुन्हेगारी टोळ्यांची पाळेमुळे घट्ट होतात. त्याच टोळ्या कायद्याला आव्हान देतात. बनावट दारूसाठी वापरल्या जाणाऱ्या औद्योगिक वापराच्या मिथेनॉलच्या किंवा तत्सम रसायनांच्या प्रत्येक थेंबाचा-कणांचा हिशेब ऑनलाईन ट्रॅक झाला पाहिजे. बनावट दारू तयार करणाऱ्या आणि विकणाऱ्यांवर सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल झाला पाहिजे.

महाराष्ट्र हे संतांचे, समाजसुधारकांचे आणि पुरोगामी विचारांचे राज्य म्हणून ओळखले जाते. या राज्याच्या सामाजिक आणि नैतिक पायाभूत मूल्यांमध्ये माणसाच्या जीवाला सर्वोच्च स्थान आहे. हप्त्यांसाठी गरिबांच्या जीवाशी खेळणारे अड्डे उघडपणे चालू दिले जातात तेव्हा प्रश्न केवळ कायदा-सुव्यवस्थेचा राहत नाही; तो राज्याच्या नैतिक अध:पतनाचा बनतो. बनावट दारूमुळे होणारा प्रत्येक मृत्यू हा एकेका कुटुंबाच्या स्वप्नांचा, आशांचा आणि भविष्याचाही अंत असतो. त्यामुळे या घटनेकडे केवळ गुन्हेगारी किंवा महसुली नुकसान म्हणून पाहणे चुकीचे ठरेल. आज गरज आहे ती अशा गुन्ह्यांना खतपाणी घालणाऱ्या संपूर्ण साखळीचा बीमोड करण्याची. कायद्याचा धाक, प्रशासनाची पारदर्शकता आणि समाजाची जागरूकता या तीन गोष्टी एकत्र आल्याशिवाय ही लढाई जिंकता येणार नाही. अन्यथा प्रत्येक दुर्घटनेनंतर शोक व्यक्त करणे, चौकशीचे आदेश देणे आणि काही दिवसांनी सर्व काही विसरून जाणे अशीच परिपाठी सुरू राहील. शेवटी मानवाचा जीव सर्वांत महत्त्वाचा आहे. सारे कायदे आणि सारी व्यवस्था त्यासाठीच तयार केली गेली आहे. त्यासाठीच या व्यवस्थेला कराच्या पैशातून पोसले जाते. त्यासाठीच या व्यवस्थेतील बाशिंद्यांना पगार दिले जातात. परंतु, त्यांची भूक पगारावर भागत नाही. त्यामुळे हप्तेखोरीत त्यांना काही गैर वाटत नाही. सरकारला तरी हे सारे गैर वाटले पाहिजे आणि मानवी जीवनाचे मूल्य हप्त्यांहून मोठे आहे, हे मान्य करून हप्तेखोरीवर पूर्णपणे आळा घालण्यासाठी पावले उचलली गेली पाहिजेत.

तंत्रवेध

डॉ. दीपक शिकारपूर

# एआय आणि सायबर गुन्हेगारी

आजचे जग पूर्णपणे डिजिटल झाले आहे. बँकिंग, शिक्षण, आरोग्य, व्यापार, शासन, संवाद, मनोरंजन, वाहतूक अशा प्रत्येक क्षेत्रात संगणक आणि इंटरनेटचा मोठ्या प्रमाणावर वापर होत आहे. प्रत्येकाच्या हातात स्मार्टफोन आला असून समाजमाध्यमे लोकांच्या दैनंदिन जीवनाचा अविभाज्य भाग बनली आहेत. कृत्रिम बुद्धिमत्ता, यंत्र शिक्षण, क्लाऊड संगणन, इंटरनेट ऑफ थिंग्ज, मोठ्या प्रमाणातील माहिती विश्लेषण यांसारख्या आधुनिक तंत्रज्ञानामुळे मानवाचे जीवन अधिक वेगवान आणि सोयीस्कर झाले आहे. परंतु ज्या तंत्रज्ञानामुळे विकास साधला जात आहे, त्याच तंत्रज्ञानाचा वापर करून सायबर गुन्हेगार अत्यंत धोकादायक आणि चलाख पद्धतीने गुन्हे करीत आहेत. सायबर गुन्हेगारी म्हणजे संगणक, इंटरनेट, मोबाईल, डिजिटल नेटवर्क किंवा इलेक्ट्रॉनिक साधनांचा वापर करून केलेले गैरकृत्य. यामध्ये माहिती चोरी, आर्थिक फसवणूक, हॅकिंग, बनावट संकेतस्थळे, फिशिंग, मालवेअर, रॅन्समवेअर, समाजमाध्यमांवरील छळ, ओळख चोरी, डीपफेक, अश्लील सामग्री प्रसारित करणे, डिजिटल ब्लॅकमेलिंग, सायबर स्टॉकिंग अशा अनेक प्रकारांचा समावेश होतो. आज या सर्व प्रकारांमध्ये कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर मोठ्या प्रमाणावर होत आहे. कृत्रिम बुद्धिमत्ता एआय म्हणजे संगणकाला मानवी विचारसरणीप्रमाणे शिकण्याची, निर्णय घेण्याची आणि विश्लेषण करण्याची क्षमता देणारे तंत्रज्ञान. हे तंत्रज्ञान उद्योग, वैद्यकीय क्षेत्र, शेती, शिक्षण, संशोधन यासाठी अत्यंत उपयुक्त आहे; परंतु सायबर गुन्हेगारांनी त्याचा दुरुपयोग सुरू केला आहे. आज फिशिंग म्हणजेच सावज हेरण्यासाठी केले जाणारे हल्ले अधिक धोकादायक झाले आहेत. कृत्रिम बुद्धिमत्ता वापरून केलेल्या ई-मेल अत्यंत विश्वासार्ह वाटतात. या मेल संबंधित व्यक्तीच्या नावाने, कार्यालयाच्या शैलीत किंवा बँकेच्या अधिकृत भाषेत लिहिलेल्या असतात.

भारतामध्ये अनेक नागरिकांना 'तुमचे बँक खाते बंद होणार आहे', 'केवायसी अपडेट करा', 'तुम्ही लॉटरी जिंकली आहे' किंवा 'तुमच्या खात्यातून पैसे कापले गेले' अशा संदेशांद्वारे फसवले जाते. काही प्रकरणांमध्ये बनावट ग्राहक सेवा क्रमांक तयार करून लोकांकडून दूरध्वनीद्वारे गुप्त माहिती मिळविली जाते. अलिकडील काळात भारतातील अनेक शहरांमध्ये 'डिजिटल अरेस्ट'चे प्रकार समोर आले. पोलिस, अंमलबजावणी अधिकारी किंवा न्यायालयीन अधिकारी असल्याचे भासवून गुन्हेगार नागरिकांना घाबरवतात आणि ऑनलाईन पैसे उकळतात. कृत्रिम बुद्धिमत्तेच्या मदतीने तयार होणारे 'डीपफेक' हे आधुनिक काळातील सर्वात मोठे संकट मानले जात आहे. डीपफेक तंत्रज्ञानाद्वारे एखाद्या व्यक्तीचा चेहरा, आवाज किंवा हालचाली हुबेहूब नक्कल करून बनावट व्हिडीओ किंवा ध्वनिफीत तयार करता येते. काही महिन्यांपूर्वी भारतातील अनेक प्रसिद्ध कलाकार आणि उद्योजक यांच्या नावाने समाजमाध्यमांवर बनावट व्हिडीओ प्रसारित झाले होते. काही गुन्हेगारांनी उद्योगपतींच्या आवाजाची नक्कल करून कर्मचाऱ्यांना आर्थिक व्यवहार करण्याचे आदेश दिले. परदेशात एका कंपनीच्या अधिकाऱ्याला त्याच्या वरिष्ठांचा बनावट आवाज ऐकवून लाखो डॉलर्सची फसवणूक करण्यात आली होती. अशा घटना भारतातही वाढू लागल्या आहेत.



महिलांविरोधातील सायबर गुन्ह्यांमध्येही डीपफेक आणि मॉर्फिंगचा मोठ्या प्रमाणावर वापर होत आहे. समाजमाध्यमांवरील फोटो वापरून बनावट अश्लील चित्रफिती तयार केल्या जातात आणि त्याद्वारे ब्लॅकमेल केले जाते. विद्यार्थिनी, व्यावसायिक महिला, कलाकार आणि सार्वजनिक जीवनातील व्यक्ती या विशेषतः या प्रकाराला बळी पडतात. अशा प्रकारांमुळे मानसिक ताण, सामाजिक अपमान आणि आत्महत्येसारख्या घटना घडण्याचा धोका वाढतो. रॅन्समवेअर हा आणखी एक गंभीर सायबर हल्ला आहे. यामध्ये संगणकातील माहिती हडप केली जाते आणि ती पुन्हा मिळवण्यासाठी खंडणी मागितली जाते. रुग्णालये, बँका, उद्योग, सरकारी कार्यालये यांच्यावर अशा हल्ल्यांचे प्रमाण वाढले आहे. भारतातील काही मोठ्या रुग्णालयांच्या संगणक प्रणालींवर हल्ले झाल्याने रुग्णसेवा विस्कळीत झाली होती. काही वर्षांपूर्वी देशातील एका प्रमुख वैद्यकीय संस्थेची माहिती प्रणाली ठप्प होऊन हजारो रुग्णांची माहिती धोक्यात आली होती. अशा घटनांमुळे राष्ट्रीय सुरक्षेलाही धोका निर्माण होतो. कृत्रिम बुद्धिमत्तेमुळे पासवर्ड फोडण्याची प्रक्रिया शक्य आणि वेगवान झाली आहे. अनेक लोक जन्मतारीख, मोबाईल क्रमांक किंवा साधे शब्द पासवर्ड म्हणून वापरतात. कृत्रिम बुद्धिमत्ता काही क्षणांमध्ये लाखो संभाव्य संयोजनांचा अभ्यास करून योग्य पासवर्ड शोधू शकते. त्यामुळे दुबळे पासवर्ड वापरणारे खाते सहज हॅक होते.

समाजमाध्यमे ही सायबर गुन्हेगारांसाठी मोठी शस्त्रे बनली आहेत. गुन्हेगार या माहितीचा वापर करून भावनिक किंवा आर्थिक फसवणूक करतात. काही जण खोट्या प्रोफाईलद्वारे मैत्री करतात, विश्वास संपादन करतात आणि नंतर पैशांची मागणी करतात. 'ऑनलाईन प्रेमसंबंध' आणि 'गुंतवणूक सल्ला' या नावाखाली मोठ्या प्रमाणावर फसवणूक होत आहे. क्रिप्टोकरन्सी आणि ऑनलाईन गुंतवणूक योजनांमुळेही नवीन प्रकारची सायबर गुन्हेगारी वाढली आहे. कृत्रिम बुद्धिमत्तेच्या सहाय्याने बनावट गुंतवणूक संकेतस्थळे, बनावट नफा दाखवणारे आकडे आणि खोटे ग्राहक अभिप्राय तयार केले जातात. लोकांना अल्पावधीत मोठा नफा मिळेल असे सांगून पैसे गुंतवायला भाग पाडले जाते. एकदा पैसे जमा झाले की संकेतस्थळ गायब होते. इंटरनेट ऑफ थिंग्जमुळे घरातील अनेक उपकरणे इंटरनेटशी जोडली गेली आहेत. स्मार्ट दूरचित्रवाणी, सुरक्षा कॅमेरे, स्मार्ट कुलपे, रेफ्रिजरेटर, आवाजावर चालणारी उपकरणे यांमध्ये पुरेशी सुरक्षा नसल्यास गैरवापर होऊ शकतो. गुन्हेगार या उपकरणांमध्ये प्रवेश मिळवून घरातील हालचालींची माहिती मिळवून मोठ्या प्रमाणावर सायबर हल्ले करण्यासाठी त्यांचा वापर करू शकतात. कृत्रिम बुद्धिमत्ता वापरून दिशाभूल करणारी माहितीही मोठ्या प्रमाणावर पसरवली जाते. निवडणुका, धार्मिक प्रश्न किंवा राष्ट्रीय सुरक्षेशी संबंधित संवेदनशील मुद्द्यांवर बनावट संदेश आणि व्हिडीओ प्रसारित करुन समाजात भीती, द्वेष आणि अस्थिरता निर्माण केली जाऊ शकते.

सायबर गुन्ह्यांविरोधात कायदे असले तरी तंत्रज्ञानाचा वेग खूप मोठा आहे. गुन्हेगार अनेकदा परदेशातून काम करतात. तेव्हा ओळख लपवण्यासाठी व्हर्च्युअल नेटवर्क, बनावट उपकरणे आणि गुप्त तंत्रांचा वापर केला जातो. त्यामुळे तपास यंत्रणांसमोर मोठे आव्हान उभे राहते. या परिस्थितीत केवळ सरकार किंवा पोलिस यंत्रणा पुरेशा नाहीत. प्रत्येक नागरिकाने सायबर सुरक्षेबाबत जागरूक होणे आवश्यक आहे. कोणत्याही अनोळखी दुव्यावर क्लिक करू नये, बँक माहिती किंवा संकेतशब्द कोणालाही सांगू नयेत, समाजमाध्यमांवर अतिवैयक्तिक माहिती शेअर करू नये, मजबूत संकेतशब्द वापरावेत. शैक्षणिक संस्था, उद्योग आणि शासन यांनीही आधुनिक सुरक्षाप्रणाली वापरणे गरजेचे आहे. कृत्रिम बुद्धिमत्ता आधारित सुरक्षा साधने, माहिती सांकेतिकीकरण, नियमित बॅकअप, सुरक्षा तपासणी आणि कर्मचारी प्रशिक्षण यामुळे धोका कमी करता येतो. भारत सरकारने राष्ट्रीय सायबर सुरक्षा धोरण, सायबर गुन्हे तक्रार पोर्टल आणि डिजिटल सुरक्षा मोहिमा सुरू केल्या आहेत. तरीही सतत बदलणाऱ्या तंत्रज्ञानामुळे कायम सतर्कता ठेवावी लागणार आहे. कृत्रिम बुद्धिमत्ता ही मानवजातीसाठी अत्यंत शक्तिशाली आणि उपयुक्त निर्मिती आहे.

परंतु या तंत्रज्ञानाचा विकास ज्या वेगाने होत आहे, त्याच वेगाने सायबर गुन्हेगारही चलाख आणि धोकादायक होत आहेत. त्यामुळे तंत्रज्ञानाचा जबाबदारीने वापर, डिजिटल साक्षरता, मजबूत कायदे आणि जागतिक सहकार्य ही काळाची सर्वात मोठी गरज बनली आहे. सायबर सुरक्षितता ही आता केवळ तांत्रिक बाब राहिलेली नाही; तर प्रत्येक नागरिकाच्या जीवनाशी, प्रतिष्ठेशी आणि देशाच्या सुरक्षेशी जोडलेली आहे. म्हणूनच तंत्रज्ञानाचा सुरक्षित वापर करणे आवश्यक आहे.

(लेखक उद्योजक व संगणक साक्षरता प्रसारक आहेत.)

वेध

गिरीश शेरेकर

# एक व्यक्ती एक झाड आता अत्यावश्यक

दिवसेंदिवस तापमानात वाढ होत आहे. अलिकडच्या काही वर्षांमध्ये सरासरी तापमानात ०.५ ते १ अंश सेल्सियसपर्यंत दरवर्षी वाढ आहे. त्याचे विपरीत परिणाम सजीवांवर पाहायला मिळत आहेत. तापमान वाढीच्या काही प्रमुख कारणांपैकी विकासाच्या नावावर कमी होणारे ग्रीन झोन हे एक कारण आहे. विकासाचा कोणताही प्रकल्प हाती घेतला तर झाडांची कत्तल मोठ्या प्रमाणात होते. नियमानुसार जेवढी झाडे कापली, तेवढी लावणे बंधनकारक आहे. ती लावली पण जातात. पुढे त्या झाडांचे शंभर टक्के संगोपन होत नाही, हे वास्तव आहे. विविध शहरांमध्ये होणारे रस्ते म्हणा किंवा शहराच्या बाहेरून जाणारे बायपास मार्ग, महामार्ग आणि प्रकल्प तयार करताना जुनी झाडे तोडली जातात. देशभरात अशी अनेक उदाहरणे आहेत. त्यातील एक उदाहरण अमरावती-परतवाडा मार्गावरचे आहे. चिखलदऱ्याला जाण्यासाठी या मार्गावर इंग्रजांनी शंभर वर्षांपूर्वी लावलेली कुडूनिंबाची शेकडो झाडे रस्ता रुंदीकरणासाठी आता तोडण्यात येत आहेत. वाढत्या वाहतुकीचे नियोजन करण्यासाठी नवे रस्तेही तेवढेच आवश्यक आहेत. रस्ते तयार झाल्यावर दोन्ही बाजूने नवी झाडे लावली जातात. पण, त्यातील किती जिवंत राहतात हा प्रश्नच असून जी झाडे जगतात त्यांच्याकडून अपेक्षित परिणाम मिळायला वेळ लागतो. परिणामस्वरूप त्या भागातल्या वातावरणावर विपरीत परिणाम दिसायला लागतो.



गेल्या वर्षीच्या तुलनेत यंदाच्या उन्हाळ्याची तीव्रता जास्त होती. विदर्भातले बहुतांश जिल्हे होरपळले. राज्यातल्या अन्य जिल्ह्यांमध्येही तापमान वाढले. बाहेर फिरताना होणारी अंगाची लाहीलाही झाडांचे महत्त्व विशद करणारी होती. गत काही वर्षांपासून दरवर्षी पावसाळा आला की, झाडांबद्दचे प्रेम ओसंडून वाहते. दोन झाडे लावायची आणि हातभर प्रसिद्धी करायची, हा अनेकांचा धंदा झाला आहे. काळजीपूर्वक झाडे लावून ती जगविणारे मोजकेच आहेत. शासकीय यंत्रणा नेहमीप्रमाणे गाजावाजा करते. वेगवेगळे अभियान व योजना राबविते. त्याचे अपेक्षित परिणाम अजूनही मिळालेले नाहीत. पंतप्रधान, मुख्यमंत्री व पर्यावरण विभागाने आवाहन केले की, फोटो काढण्यापुरती झाडे लावली जातात. मागे किती तरी कोटी वृक्ष लावण्यात आली, त्यातील किती जगली याचा हिशेब कोणाकडेच नाही. त्यातील पंचवीस टक्के झाडे दिसली असती तर चित्र वेगळे असते. निसर्गाचे शोषण करण्याच्या नादात माणूस स्वत:वरच संकट ओढवून घेत आहे. झाडांची संख्या कमी होत असल्याने निसर्गचक्र बाधित झाले आहे. पावसाळा, हिवाळा, उन्हाळा हे तिन्ही ऋतू आपले मूळ चरित्र विसरत आहेत. ते प्रमाण जर वाढले तर स्थिती भंयकर होईल. शहरे आणि गावांमध्ये ग्रीन झोन वाढविण्यासाठी ठोस उपायोजना अजिबात होताना दिसत नाहीत. उंच ठिकाणावरून कोणत्याही शहरावर नजर टाकली की काँक्रीटचे जंगलच दृष्टीस पडते. तसेच या शहराच्या आजूबाजूचा परिसर भकास असतो. अगदी बोटावर मोजता येईल इतकीच शहरे वृक्षवल्लीने समृद्ध आहेत. विकास व्हायलाच हवा, तो काळाची गरज आहे पण, तो समतोल नसला की अडचणी निर्माण होतात. वेगाने वाढणाऱ्या तापमानाच्या स्थितीवर नियंत्रण मिळविण्यासाठी शाश्वत उपायोजनांची नितांत गरज आहे. झाडे लावण्यासाठी आतापर्यंत वेगवेगळी अभियाने राबविण्यात आलीत, पण त्याच्या मर्यादा समोर आल्या. आता एक व्यक्ती एक झाड लावण्याशिवाय पर्याय नाही. हे अभियान कायद्यात व नियमांमध्ये तरतुदी आणि व्यापक जनजागृती करून हाती घ्यावे लागणार आहे. रस्ते व मोठे प्रकल्प तयार करणाऱ्या कंत्राटदार कंपनीला झाडे लावणे व ती स्वावलंबी होईपर्यंत संगोपन करणे हे त्यांच्या मूळ कामात नोंदवावे लागेल आणि ते प्रामाणिकपणे त्यांच्याकडून करून घ्यावे लागेल. झाडे लावणाऱ्यांना वेगवेगळ्या सवलती देण्यासंदर्भातली योजना सुरू करता येते का, यावर विचार व्हायला हवा. संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ आपल्या अधीनस्त महाविद्यालयांतील विद्यार्थ्यांच्या माध्यमातून एक विद्यार्थी एक वृक्ष हे अभियान राबविण्याचा विचार करीत आहे. याच प्रकारे अन्य विद्यापीठे, मोठ्या शैक्षणिक संस्था, देवस्थाने व मोठ्या कंपन्यांनी झाडे लावण्याची वेगवेगळी अभियाने राबविली तर मोठा हातभार लागू शकतो. अशी अभियाने राबविण्यासाठी शासनाने त्यांना प्रोत्साहित करायला हवे. जे उल्लेखनीय कार्य करतील त्यांना वेगवेगळ्या स्वरूपाची बक्षिसे, प्रमाणपत्रे, गुणांकन द्यावे. त्याचे काय फायदे होतील तेही सांगावे. जे अभियान राबविणार नाहीत, त्यांना होणाऱ्या हानीची जाणीवही करून द्यावी. झाडे तोडणाऱ्यांना माफी नसावी. तेव्हाच वातावरणाचा ताल जागेवर येईल.

९४२०७२१२२५

धर्म-संस्कृती

प्रा. दिलीप जोशी

# सप्त स्वर

**'संगीत है शक्ती ईश्वर की, हर स्वर मे बसे है राम।**
**रागी जो सुनाये रागिनी, रोगी को मिले आराम।'**

संगीताला ईश्वराची शक्ती म्हटले आहे. नारद, तुंबरू, गंधर्व यांची नावे गायन कलेसाठी घेतली जातात. सरस्वती माता तर हातात वीणा घेऊनच आहे. रामायणात रावण आणि लवकुश यांचे संगीत प्रसिद्ध आहे. भगवान शिवाचे तांडव सर्वांना ज्ञात आहे. नटराज तर कलाप्रेमींचे दैवत आहे. सामवेद गायन आपण ऐकून आहोत. वेदाचा एक उपवेद गांधर्ववेद स्वराशीच संबंधित आहे. भगवान श्रीकृष्णाची बासरी चराचराला भावविभोर करीत असे. अर्जुनाला अज्ञातवासात बृहन्नडा बनून राहताना संगीताचा आधार मिळाला.


वैज्ञानिक विचार केला तर स्वर निर्मिती कंपनामुळे होते. स्वर स्वर्गीय सुखाचा आनंद देतात. अध्यात्मात संगीत साधनेला महत्त्व आहे. 'धन्य ते गायनी कला' असे समर्थांनी म्हटले आहे. दत्त संप्रदायात तर गायनाला प्राधान्य आहे. स्वत: भगवंत नारदांना स्पष्ट सांगतात...

**'नाहं वसामि वैकुंठे योगिनां हृदये न च।**
**मद्भक्ता यत्र गायन्ति तत्र तिष्ठामि नारद ॥'**

स्वरांचे महत्त्व यावरून लक्षात येईल. भारतीय संगीतात सप्त स्वर सांगितले आहेत- सा रे ग म प ध नी. यांना अनुक्रमे षड्ज, ऋषभ, गंधार, मध्यम, पंचम, धैवत, निषाद म्हणतात. या स्वरांची निर्मिती प्रथम ब्रह्मदेवाने केली आणि त्यानंतर देवर्षी नारदांनी तिचा प्रसार केल्याचे पौराणिक मत आहे.

**'उदात्ते निषादगांधारौ, अनुदात्त ऋषभधैवतौ।**
**स्वरितप्रभवा ह्येते, षड्जमध्यमपञ्चमः॥'**

वैदिक काळात स्वरांची तीन प्रकारात रचना होती. देवर्षी नारदांनी नारदीय शिक्षा ग्रंथात प्रथम किंवा उदात्त स्वर म्हणून गंधार आणि निषाद, द्वितीय किंवा अनुदात्त म्हणून ऋषभ आणि धैवत तर तृतीय किंवा स्वरीत म्हणून षड्ज, मध्यम आणि पंचम सांगितले. या स्वरांची निर्मिती काही प्राणी आणि पक्ष्यांच्या आवाजातील साधर्म्यावरून शोधल्या गेली.



**'मयूर चटकाछाग क्रौञ्च कोकिल दुर्दुरा।**
**गजश्च सप्त षड्जादौंकृमा दुच्चार्यान्त्यमी ॥'**

सा म्हणजे षड्ज हा स्वर मोराच्या, रे म्हणजे ऋषभ हा स्वर गाईच्या हंबरण्यावरून, ग म्हणजे गंधार हा अज म्हणजे बकरीच्या आवाजावरून, म म्हणजे मध्यम हा स्वर क्रौंच पक्ष्याच्या, प म्हणजे पंचम हा स्वर कोकीळ पक्ष्याच्या आवाजावरून, ध म्हणजे धैवत हा स्वर घोड्यांच्या खिंकाळण्यावरून तर नि म्हणजे निषाद हा हत्तीच्या चित्कारावरून घेतल्याचे संगीत शास्त्रात काही ठिकाणी दिले आहे. या सप्त स्वरावरच संगीत आधारित आहे. सप्त स्वराचे थोडक्यात वर्णन पाहू-

**१) सा-षड्ज** : हा सप्त स्वरातील पहिलाच स्वर असून षड्ज इतर सहा स्वरांचा जनक आहे म्हणून षड्ज. सहा जणांपासून जन्मला म्हणून षड्ज. हा स्वर मनाला आनंद देतो. षड्ज म्हणजे शांत, षड्ज म्हणजे समाधान. षड्ज ध्यान, समाधीची कवाडे उघडतो. षड्ज मोराच्या आवाजाशी साधर्म्य ठेवतो.

**२) ऋषभ** : सप्त स्वरातील दुसरा रे म्हणजे ऋषभ. नावावरूनच त्यांचा संबंध बैलाच्या किंवा गोवंशाच्या आवाजाशी म्हणजे हंबरण्याशी साधर्म्य ठेवणारा तसेच तो बैलासारखा तेज आहे म्हणून ऋषभ.

**३) ग-गंधार** : हा स्वर मधुर आणि भावनांनी परिपूर्ण असल्याने गंधार. अज म्हणजे बकरीच्या आवाजाशी साधर्म्य ठेवणारा हा स्वर आहे.

**४) म-मध्यम** : सर्व सर्वांच्या मध्यभागी असल्यामुळे याला मध्यम म्हणतात. क्रौंच पक्ष्याच्या आवाजाशी साधर्म्य असलेला हा स्वर आहे.

**५) प-पंचम** : सप्त स्वरातील पाचवा स्वर असल्यामुळे याला पंचम म्हणतात. कोकिळेच्या कुहू काराशी साधर्म्य असलेला हा स्वर आहे.

**६) ध-धैवत** : वैराग्य आणि शांतता दर्शक असल्याने धैवत. हा स्वर घोड्याच्या खिंकाळण्याशी साधर्म्य ठेवतो.

**७) नि-निषाद** : सप्त स्वराशील अंतिम असलेला स्वर हत्तीच्या चित्काराशी साधर्म्य असलेला स्वर आहे.

सप्त स्वरांचा चढता क्रम आरोह तर उतरता क्रम अवरोह असतो. स्वर साधना ही नादब्रह्माची उपासना आहे. म्हणूनच वेदात संगीताचा उलेख आहे. नारद, याज्ञवल्क्य, भरतमुनी इत्यादींनी याबाबत योगदान दिले आहे. रत्नप्रदीपिका, नारदीय शिक्षा, नाट्यशास्त्र, संगीत चुडामणी, संगीत सुधाकर, संगीत रत्नावली इत्यादी ग्रंथातून भारतीय स्वर आणि संगीताचे वर्णन आहे. प्रत्येक स्वराचा बाज आणि पोत वेगळा असला, तरी ते जेव्हा एकवटतात तेव्हा ध्वनीची अलौकिक ऊर्जा तयार होते. त्यातून निर्माण उर्जेतून दिवे लागण्याचे, पाऊस पाडण्याचे सामर्थ्य निर्माण होते. दीप राग, मल्हार त्याची उदाहरणे आहेत.

उदास मनाला चैतन्य देण्याचे काम सूर करतात. सूर आनंदाश्रू-दु:खाश्रूंना वाट करून देऊ शकतात. नादब्रह्माची ही उपासना परमेष्ठीपर्यंत पोचण्याचे साधन आहे. भारतीय संगीत ही ईश्वराची शक्ती असून प्रत्येक स्वरात श्रीराम वसलेले आहेत. म्हणूनच प्रात:स्मरणात सप्त स्वरांचे स्मरण करण्यात येते.

९८२२२६२७३५

## डेक्कन क्वीन नाबाद ९७

जगातील अशा मोजक्या रेल्वेगाड्यांपैकी डेक्कन क्वीन एक आहे, जिचा वाढदिवस तब्बल ७२ वर्षांपासून सातत्याने साजरा केला जातो. पुणे आणि मुंबई या दोन महत्त्वाच्या शहरांना जोडणारी, लाखो चाकरमान्यांच्या भावविश्वाचा अविभाज्य भाग बनलेली डेक्कन क्वीन नुकतीच ९७ वर्षांची झाली. १ जून १९३० रोजी पुणे-मुंबई-पुणे मार्गावर डेक्कन क्वीनची सेवाकार्यासाठी सुरू झाली. त्या काळात आधुनिक सोयी सुविधांसाठी ही गाडी विशेष ओळखली जात होती. कालांतराने ती केवळ एक रेल्वेगाडी न राहता महाराष्ट्राच्या सांस्कृतिक आणि सामाजिक जीवनाचा अविभाज्य भाग बनली. पुणे-मुंबई दरम्यानच्या प्रवासासाठी दररोज हजारो प्रवासी डेक्कन क्वीनला प्राधान्य देतात. प्रवाशांशी निर्माण झालेले भावनिक नाते यामुळे ही गाडी अनेक पिढ्यांची आवडती ठरली आहे. सह्याद्रीच्या निसर्गरम्य घाटातून वाटचाल करणाऱ्या या रेल्वेगाडीबद्दल प्रवाशांच्या मनात आजही तेवढाच आदर आणि आपुलकी आहे. डेक्कन क्वीनचा हा ९७ वा वाढदिवस केवळ एका रेल्वेगाडीचा उत्सव नसून, महाराष्ट्राच्या रेल्वे इतिहासातील एका सुवर्णपानाचा गौरव करणारा क्षण आहे.



**विश्वनाथ पंडित**/ठाणे

## विश्वास आणि अविश्वास

शालेय जीवनात उन्हाळ्याची सुट्टी लागली की आवर्जून आनंद, मौजमजा करण्यासाठी मुले गावाला जायची; तीसुद्धा वयानुसार गाडी भाड्याच्या अर्ध्या तिकिटाच्या आकारात. तेव्हा आई असो वा मावशी, आत्या, काकी, मामी त्यांना संपूर्ण आकाराचे तिकीट असायचे; आता मात्र त्या उलट आहे. त्या सर्वांचे अर्धे तिकीट व मुलांचे पूर्ण रकमेचे तिकीट आहे. त्यावेळी आईवर किंवा अन्य मंडळींवर विश्वास असायचा म्हणून मुलांच्या वयाचा पुरावा देण्याची गरज भासली नाही, पण आता मात्र त्या मंडळींचे आधार कार्ड त्यांच्या वयाच्या पुराव्यासाठी दाखवावे लागते कारण मुलांवर कोणाचा विश्वासच उरला नाही. काहीही असो एसटी महामंडळ झिंदाबाद म्हणावेच लागेल .

**अमोल करकरे**/९९६७९२७६१७

वाचक पत्रे

## पाणीटंचाईचे संकट आणि अल निनोचे सावट

सध्याची स्थिती पाहता महाराष्ट्रातील जलसाठ्यांची स्थिती चिंताजनक होत चालली आहे. नुकत्याच प्रसिद्ध झालेल्या ताज्या आकडेवारीनुसार, राज्यातील धरणसाठा केवळ ३० शिल्लक आहे. गेल्या वर्षीच्या तुलनेत ही घट लक्षणीय असून, त्यातच यावर्षी अल निनो प्रभावामुळे मान्सूनवर विपरीत परिणाम होण्याची दाट शक्यता वर्तवण्यात येत आहे. जर पाऊस लांबला किंवा सरासरीपेक्षा कमी झाला, तर राज्याला भीषण दुष्काळाचा सामना करावा लागू शकतो. ही केवळ प्रशासनासाठी धोक्याची घंटा नसून, सर्वसामान्य जनतेसाठीही सतर्क राहण्याचा इशारा आहे. पाणीटंचाईवर मात करण्यासाठी प्रशासनाने युद्धपातळीवर नियोजन करणे आवश्यक आहे. जसे, उपलब्ध पाणी साठ्याचे तातडीने वॉटर ऑडिट करून ते केवळ पिण्यासाठी आरक्षित करणे गरजेचे आहे. बाष्पीभवन रोखण्यासाठी अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर आणि अनधिकृत पाणी उपसा थांबवण्यासाठी कडक पावले उचलली पाहिजेत. मान्सूनपूर्व काळात नद्या, नाले आणि तलावांमधील गाळ काढल्यास त्यांची साठवण क्षमता वाढते. गाळमुक्त धरण, गाळयुक्त शिवारसारख्या योजना अधिक प्रभावीपणे राबवून जलसाठ्यांची क्षमता वाढवणे हा एक शाश्वत उपाय आहे. टँकरमुक्त गावांसाठी आतापासूनच पर्यायी व्यवस्था शोधणे आणि शहरी भागात पाणी कपातीचे नियोजन करून शेवटच्या घटकापर्यंत पाणी पोहोचवणे हे प्रशासनाचे मुख्य कर्तव्य आहे. दुष्काळाचा सामना केवळ सरकार करू शकत नाही, त्यासाठी लोकसहभाग अनिवार्य आहे. घराघरांत पाण्याचा अपव्यय टाळला पाहिजे. रेन वॉटर हार्वेस्टिंग हा केवळ सरकारी नियम नसून ती काळाची गरज आहे. सोसायट्या आणि वैयक्तिक घरांच्या छतावरील पावसाचे पाणी जमिनीत जिरवल्यास भूजल पातळी वाढण्यास मदत होईल. येणाऱ्या पावसाळ्यातील प्रत्येक थेंब साठवण्याचे नियोजन आताच करायला हवे. शेतीसाठी पाण्याचा सर्वाधिक वापर होतो. अल निनोच्या काळात पारंपरिक पद्धतीने पाणी न देता ठिबक किंवा तुषार सिंचनाचा अवलंब करून शेतकऱ्यांनी कमी पाण्यात जास्त पिके घेण्याचे तंत्र आत्मसात करावे, शासनाने याकरिता प्रोत्साहन योजना जाहीर कराव्यात. अल निनोमुळे पाऊस कमी झाला, तर त्याचा परिणाम अन्नसुरक्षेवरही होणारच आहे. पाणीटंचाईचे संकट दारात उभे आहे. अशा बिकटप्रसंगी वैयक्तिक आणि शासन स्तरावर तत्काळ काय करता येईल, ते करावे.

**प्रा. विलास डोईफोडे**/९११२८५७२९९

CMYK

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत

https://epaper.dainiktarunbharat.com/



# राजाभाऊंच्या तिकिटासाठी झेडपी अध्यक्षांची मुंबईवारी

## सर्वसामान्य कार्यकर्त्यांसह झेडपी अध्यक्षांनी मुख्यमंत्र्यांना मध्यरात्री घातले होते साकडे

**तभा वृत्तसेवा । यशवंत गुरव**
**सोलापूर, दि.२ जून-**

सोलापूर विधानपरिषदेची उमेदवारी मिळण्यासाठी अनेक कारण असताना, दुसरे कारण देखील तितकेच महत्त्वाचे दिसून येत आहे. सोलापूर जिल्हा परिषदेचे अध्यक्ष दीपक वैद्य हे राजाभाऊ राऊत यांचे खंदे समर्थक मानले जातात. ज्या नेत्याने आपल्याला जिल्हा परिषदेचे अध्यक्ष केले. त्या नेत्याला आपल्या जिल्ह्याचा आमदार बनवणे, ही खुणगाठ अध्यक्ष वैद्य यांनी आपल्या मनाशी बांधली होती. आता नाही तर कधी नाही अशी भूमिका घेत, आपल्या नेत्याला विधान परिषदेची उमेदवारी मिळावी यासाठी सच्चा कार्यकर्ता कामाला लागला होता. रात्रंदिवस फोनाफोनी गाठीभेटी सुरू झाल्या होत्या.

यादरम्यान भगवंत महोत्सव सुरू झाला. भगवंत महोत्सवाला मुख्यमंत्र्यांना बार्शीत आणायचे ही खुणगाठ मनाशी बांधून राजाभाऊ राऊत यांनी कामकाज सुरू केले. त्यांच्या जोडीला अध्यक्ष वैद्य हे देखील सावलीप्रमाणे होते. विधान परिषदेची नुकतीच चर्चा सुरू झाल्यानंतर



अध्यक्ष वैद्य आणि तसेच त्यांच्या सोबत असणाऱ्या इतर कार्यकर्त्यांना आपला नेता जिल्ह्याचा आमदार व्हावा अशी इच्छा व्यक्त केली गेली. मग काय त्यासाठी अध्यक्षांनी तरुण कार्यकर्त्यांसह अनुभवी ज्येष्ठ नेत्यांना सोबत घेऊन आपल्या नेत्याला उमेदवारी मिळवण्यासाठी व्युव्हरचना आखण्यास सुरुवात केली.

राजेंद्र राऊत यांना विश्वासात घेऊन अध्यक्ष वैद्य तसेच त्यांचे स्वीयसहाय्यक जयसिंग परदेशी यांनी देखील हालचाली सुरू केल्या. उमेदवारीसाठी गल्लीपासून ते दिल्लीपर्यंत संपर्क साधण्यास सुरुवात झाली. विशेषतः मुख्यमंत्र्यांना जाऊन भेटणे त्यांना विश्वासात घेणे हे देखील महत्त्वाचे कार्य या मंडळींनी पार पाडले.

त्याचे फलित म्हणजे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मनावर एक वेगळे प्रकारे छाप पाडणे होती. यासाठी सोलापूर जिल्ह्यासह धाराशिव बीड जिल्ह्यातील प्रमुख नेत्यांसह कार्यकर्त्यांनी देखील मुख्यमंत्र्यांकडे शिफारस केली. राजाभाऊ असेल तर आमची काय हरकत नाही.. जणू काही हिरवा कंदीलच या नेत्यांनी अनेक कार्यकर्त्यांनी दिला.

दरम्यान, अपक्ष उमेदवार असताना राजेंद्र राऊत यांनी तत्कालीन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना सहकार्य केले होते. त्यानंतर त्यांची जवळीक्ता आणखीन वाढत गेली. याशिवाय मराठा आरक्षणा दरम्यान जरांगे यांना अंगावर घेणे. तसेच स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये सरशी झाल्यानंतर बार्शीपासून ते सोलापूर जिल्हा परिषद निवडणुकीत भाजपचे वर्चस्व प्रस्थापित करणे. या गोष्टी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावर छाप सोडणाऱ्या होत्या. त्याचे फलित म्हणून अखेर परिचारक यांना तूर्तास बाजूला ठेवून खंदे समर्थक म्हटल्या जाणाऱ्या राजेंद्र राऊत यांच्या नावावर अखेर शिक्कामोर्तब झाल्याचे राजकीय वतुर्ळात बोलले जात आहे.

सोलापूर विधान परिषदेच्या एका जागेसाठी भाजप पक्षांतर्गत मोठी चुरस निर्माण झाली होती. पंढरपूरचे माजी आमदार प्रशांत परिचारक यांना यापूर्वी भाजपच्या श्रेष्ठींनी उमेदवारी देण्यासंबंधी सकारात्मक विचार केला होता. परंतु मराठा आरक्षण आंदोलनाचे नेते मनोज जरांगे यांनी २०२४ मधील आंदोलनात तत्कालीन उपमुख्यमंत्री तथा विद्यमान मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावर सातत्याने टीका केली. त्यावेळी बार्शीचे तत्कालीन आ. राजेंद्र राऊत यांनी फडणवीस यांच्या बाजूने भूमिका घेत जरांगेवर टीका केली होती. परंतु या गोष्टीमुळे त्यांना विधानसभा निवडणुकीत पराभवाला सामोरे जावे लागले. परंतु सर्व समाजाला धुडकावून मनोज जरांगे तसेच मराठा बांधवांना अंगार घेतले होते. त्यामुळेच राऊत यांनी गेल्या काही वर्षातील छाप सोडलेल्या कामांमुळे ते मुख्यमंत्र्यांच्या गळ्यातील ताईत बनले होते.

### स्थानिक स्वराज्य संस्थेच्या यशामुळे उमेदवारी



विधानसभा निवडणुकीत पराभव झाल्यानंतरही माजी आ. राऊत यांनी बार्शी बाजार समिती, जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुकीत भाजपची एकहाती सत्ता आणली. त्यामुळे पक्षाने त्यांच्यावर विश्वास ठेवत विधान परिषद निवडणुकीसाठी संधी दिली आहे. त्याच पद्धतीने आमच्यासारख्या सर्वसामान्य शेतकऱ्यांच्या पुत्राला झेडपीचे अध्यक्ष बनवले. सर्वसामान्य कार्यकर्त्यांना प्राधान्य देऊन त्यांचे काम केले. यामुळे आम्ही देखील आमच्या नेत्याला विधान परिषदेचे उमेदवारी मिळवण्यासाठी बार्शी ते मुंबई असा प्रयत्न केला.

**- दीपक वैद्य, अध्यक्ष जिल्हा परिषद सोलापूर**



# ग्रंथपालन वर्गाच्या निरोप समारंभात विद्यार्थ्यांकडून पुस्तके भेट

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २ जून-**

ग्रंथपालन प्रमाणपत्र परीक्षा वर्ग २०२६ च्या सोलापूर केंद्राच्या ग्रंथपालन वर्गाच्या विद्यार्थ्यांकडून जिल्हा ग्रंथालय संघास स्पर्धा परीक्षेची पुस्तके भेट देण्यात आली.

यावेळी ग्रंथपालन वर्गाच्या सहा महिन्याच्या कालावधीत विद्यार्थ्यांना दिले गेलेले ग्रंथपालन वर्गाचे प्रशिक्षण याबाबत प्रा. गणेश फंड, प्रा. जाफर बांगी, प्रा. दत्ता मोरे, वर्ग व्यवस्थापक ग्रंथमित्र कुंडलिक मोरे यांनी आपल्या मनोगतातून मार्गदर्शन केले आणि विद्यार्थ्यांम धून प्रथमेश बनसोडे, वेदिका चव्हाण, संध्याराणी मोरे, सुजाता हुळी, अंबिका सुलाखे आदींनी मनोगत व्यक्त करत आभार मानले. सूत्रसंचालन गीतांजली गंभीरे यांनी केले.

### मौल्यवान ज्ञान विद्यार्थ्यांना दिले

कोणताही निरोप समारंभ आनंदाचा असला तरी थोडासा भावूक करणारा देखील आहे. ग्रंथालय व्यवस्थापन, वर्गीकरण, सूचीकरण, वाचक सेवा आणि ग्रंथालयाच्या विविध कार्यपद्धतीबाबत मौल्यवान ज्ञान ग्रंथपालन वर्गाच्या विद्यार्थ्यांना देण्यात आले याचा समाधान बाटते, असे मनोगत प्रा. अविनाश गायकवाड यांनी व्यक्त केले.

## लोकमंगल नागरी सहकारी पतसंस्था मर्या., सोलापूर

**९४/२९ मंगल प्लाझा, पहिला मजला, जोडभावी पेठ, सोलापूर**

**नमुना झेड**
**नियम १०७ पोटनियम (११) (ड-१) पहा**

### स्थावर मालमत्तेचा ताबा घेण्याबाबतची नोटीस

ज्याअर्थी खाली सही करणार विशेष वसुली अधिकारी, लोकमंगल नागरी सहकारी पतसंस्था मर्या, सोलापूर ९४/२९ मंगल प्लाझा, पहिला मजला, जोडभावी पेठ, सोलापूर यांनी सदर पतसंस्थेच्या खालील दर्शविलेल्या थकबाकीदार कर्जदार व त्यांचे जामीनदार यांचेविरूध्द महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम १०१ (१) अंतर्गत संस्थेने प्राप्त केलेल्या वसुली दाखल्यास अनुसरून कलम १५६ व नियम १०७ मधील तरतुदीस अनुसरून थकबाकीदार कर्जदारांना प्रथम मागणी नोटीस देऊन त्यांचाकडील थकबाकीची रक्कम भरण्याबाबत कळविलेले होते. परंतु थकबाकीदार कर्जदारांने रक्कम भरण्यास कसूर केल्याने त्यांच्या स्थावर मालमत्ता जप्त केल्या आहेत. या उपरी ऋणकोने त्यांच्याकडील थकबाकीची रक्कम जमा करण्यास कसूर केल्यामुळे ऋणकोला या नोटीसीव्दारे त्यांच्या स्थावर मालमत्तेचा प्रतिकात्मक ताबा घेतल्याबाबत कळविण्यात येत आहे. तसेच सर्व नागरिकांना देखील सूचित करण्यात येते की, खाली निर्दिष्ट केलेल्या थकबाकीदार, कर्जदार यांच्या मालमत्तेवर प्रतिकात्मक ताबा नियम १९६१ मधील नियम १०७ (११) (ड-१) नुसार विशेष वसुली व विकी अधिकारी यांनी घेतला आहे.

विशेष करून ऋणकोला आणि सर्व नागरिकांना याद्वारे सावध करण्यात येत आहे. सदर ताबा घेतलेल्या मालमत्तेसंबंधी कोणताही व्यवहार करू नये आणि जर असा व्यवहार केल्यास लोकमंगल नागरी सहकारी पतसंस्था मर्या., सोलापूर या संस्थेच्या बोजाची रक्कम आणि त्यावरील व्याज याला संबंधितांना अधीन राहावे लागेल.

**स्थावर मिळकतीचे वर्णन.**

| अ. क्र. | कर्जदाराचे नाव | जप्त केलेल्या स्थावर मालमत्तेचे वर्णन | क्षेत्राचे एकक हे.आर.चौ.मी. | जप्ती आदेश दिनांक | प्रतिकात्मक ताबा दिनांक |
|---|---|---|---|---|---|
| १ | श्री. कापले सागर विश्वनाथ | मौजे सांगोला, ता. सांगोला, जि. सोलापूर येथील गट नं ५०९/१ | १.०२.६७<br>०.०२.६६ | १३/१२/२०२४ | २८/०४/२०२६ |
| | | मौजे सांगोला, ता. सांगोला, जि. सोलापूर येथील गट नं ५०९/२ | ०.५५.१०<br>०.४७.५६<br>१.४२.६७ | १३/१२/२०२४ | २८/०४/२०२६ |
| २ | श्री. म्हमाणे महासिध्द अंबादास | मौजे कोरवली ता. मोहोळ, जि. सोलापूर येथील गट नं ११३ | ३.७७.४० | ०७/०२/२०२४ | ३०/०४/२०२६ |
| ३ | श्री. गायकवाड उत्तम कृष्णा | मौजे सोनके, ता. पंढरपूर, जि. सोलापूर येथील गट नं ६०७/२ | ०.९५.०० | ०३/०९/२०२३ | ०४/०५/२०२६ |
| | | मौजे सोनके, ता. पंढरपूर, जि. सोलापूर येथील गट नं येथील गट नं ३४ | ०.२९.०० | ०३/०९/२०२३ | ०४/०५/२०२६ |
| | | मौजे पळशी, ता. पंढरपूर, जि. सोलापू येथील गट नं. ६२८ | ०.४०.०० | ०३/०९/२०२३ | ०४/०५/२०२६ |
| ४ | श्री. सुतारी मोनेश्वर सुरेश | मौजे गोगाव, ता. अक्कलकोट, जि. सोलापूर येथील गट नं. १८/पैकी/ प्लॉट नं. २७ | ०.७८.०० | २२/०४/२०२५ | ०५/०५/२०२६ |
| ५ | श्री. म्हेत्रे श्रीशैल जगन्नाथ | मौजे प्रताप नगर, ता. उत्तर सोलापूर, जि. सोलापूर येथील गट नं. ८२/३/इ/२/ब/२/ब/४ | १.०० | २६/१२/२०२३ | १८/०५/२०२६ |
| | | मौजे प्रताप नगर, ता. उत्तर सोलापूर, जि. सोलापूर येथील गट नं. ८२/३/इ/२/ब/२/ब/३ | ०.४९ | २६/१२/२०२३ | १८/०५/२०२६ |
| ६ | श्री.मासाळ संभाजी नामदेव | मौजे कातेवाडी, ता. मोहोळ, जि. सोलापूर येथील गट नं. १०२/१ | १.७३ | १८/०७/२०१९ | १४/०५/२०२६ |
| | | मौजे कातेवाडी, ता. मोहोळ, जि. सोलापूर येथील गट नं. १०२/२/अ | ०.३८ | १८/०७/२०१९ | १४/०५/२०२६ |
| | | मौजे कातेवाडी, ता. मोहोळ, जि. सोलापूर येथील गट नं. १०२/३/अ | ०.४० | १८/०७/२०१९ | १४/०५/२०२६ |

**स्थळ : सांगोला**
**दि. ०३/०६/२०२६**

शिक्का

**सही/-**
**श्री. प्रशांत तात्यासाहेब क्षिरसागर**
**विशेष वसुली व विक्री अधिकारी**
**लोकंमगल नागरी सहकारी पतसंस्था मर्या., सोलापूर**

## जाहीर प्रसिध्दीकरण

तमाम जनतेस विशेषत शहर करमाळा व तालुक्यातील जनतेस या व्दारे सुचित करण्यात येते की, शहर करमाळा येथील म्यु. पल हद्दीबाहेरील निवासी उपयोगी बिगरशेती जमीन खुला प्लॉट यास गट नं. २०२/४/२०३/२०४/१०३ पैकी उत्तरेची ४७.५० चौ.मी. ही मिळकत सुवर्णा अनिल खरटमल यांचे मालकी वहिवाटीची होती, ती मिळकत सुषमा मारूती थाटे व प्रशांत मारूती थाटे यांनी ता. २०/११/२०१७ रोजी दस्त क्र. ४०४१ अन्वये खरेदी केली आहे, परंतु सदरचा अस्सल दस्त सुमारे पंधरा दिवसांपूर्वी हरवला आहे व तो अद्याप मिळाला नाही. सदरची मिळकत आमचे अशील श्री सुंदरदास गौतम पाडुळे यांनी त्यानंतर विकत घेतली आहे, परंतु घरतारण कर्जाकरीता उपरोक्त दस्त क्र. ४०४१ ता. २०/११/२०१७ चा अस्सल दस्त बँकेस जरूरी आहे, सबब, सर्वांना जाहीर रित्या कळविण्यात येते की, सदरचा ता. २०/११/२०१७ चा खरेदीचा अस्सल दस्त कोणाला मिळून आल्यास त्यांनी त्वरीत खालील पत्यावर आणून द्यावा त्यास योग्य बक्षीस दिले जाईल.

हे जाहीर प्रसिध्दीकरण केले ता. ०२/०६/२०२६

**सही/-**
**बी.टी. देवी**
**बी.कॉम., एलएल.बी. ॲडव्होकेट**
**रा. महेंद्रनगर करमाळा, जि. सोलापूर**
**मो. नं. ९४२३३८७२७५**
**श्री. सुंदरदास गौतम पाडुळे तर्फे ॲडव्होकेट**

## जाहीर समन्स

**मे. उपनिबंधक, सहकारी संस्था, शहर सोलापूर, सोलापूर यांचे समोर**

सोलापूर जिल्हा महसूल कर्मचारी सहकारी पतसंस्था नियमित सोलापूर
सिटी सर्व्हे नं. ८४१३, दुसरा मजला, जुने जिल्हाधिकारी आवार, सोलापूर ४१३००३

**छत्रपती संभाजी महाराज नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित, सोलापूर - अर्जदार**
विरूध्द
(खालील तपशिलातील नमुद केलेले थकबाकीदार सभासद) - जाब देणार

| अं. क्र. | केस नंबर | दावा रक्कम | प्रतिवादी नंबर | प्रतिवादीचे नांव व पत्ता |
|---|---|---|---|---|
| १ | ८८३/२०२६ | ६७,२२२/- | २<br>३ | **२. श्री. मनोज तानाजी पवार** रा. बसवेश्वर नगर, श्रीराम नगर, देगाव ता. उ. सोलापूर, जि. सोलापूर<br>**३. श्री. पांडुरंग भानुदास शेंडगे** रा. तळेहिपरगा, ता. उ. सोलापूर, जि. सोलापूर |
| २ | ८८०/२०२६ | ७४,५८९/- | १<br>२<br>३ | **१. श्री. मनोज तानाजी पवार** रा. बसवेश्वर नगर, श्रीराम नगर, देगाव ता. उ. सोलापुर, जि. सोलापूर<br>**२. श्री. पांडुरंग भानुदास शेंडगे** रा. तळेहिपरगा ता. उ. सोलापूर, जि. सोलापूर<br>**३. श्री. शिवाजी तानाजी पवार** रा. बसवेश्वर नगर, श्रीराम नगर, देगाव ता. उ. सोलापुर, जि. सोलापूर |
| ३ | ८९३/२०२६ | १९,६३०/- | २<br>३ | **२. श्री. सिध्दाराम शंकरराव यलशेट्टी** रा. ४१ गावठाण शेळगी, सोलापूर. जि. सोलापूर<br>**३. श्री. राजु निंगप्पा मसुती** रा. साई पार्क शेळगी, सोलापूर, जि. सोलापूर |
| ४ | ८८६/२०२६ | २१,१४९/- | १<br>३ | **१. श्री. सचिन धोंडीराम वाघमोडे** रा. संतोष नगर, बाळे, सोलापूर, जि. सोलापूर<br>**३. श्री. रोहित रमेश शिंदे** रा. घर नं. २२, वैष्णवी नगर-२, सैफुल विजापूर रोड सोलापूर, जि. सोलापूर |
| ५ | ८९०/२०२६ | ७१,०४१/- | १<br>३<br>४ | **१. सौ. शिल्पा राजेश भोसेकर** रा. २७ पंधे अपार्टमेंट, सम्राट चौक, सोलापूर जि. सोलापूर<br>**३. श्री. राजेश अरूण भोसेकर** रा. बिल्डींग नं पंधे अपार्टमेंट, सम्राट चौक, सोलापूर<br>**४. श्री. संजय शंकर होसमनी** रा. शंकर होसमनी हॉलीबॉल मैदान जवळ ब्लॉक नं ४, लोखंडवाला पार्क जुळे सोलापूर, जि. सोलापूर |
| ६ | ८८९/२०२६ | ८७,५७७/- | १ | **१. श्री. इफ्तेकार अब्दुल गफार शेख** रा. गोदुताई विडी घरकुल, कुंभारी, जि. सोलापूर |
| ७ | ८८७/२०२६ | | २<br>३ | **२. श्री. शरणप्पा पुडलिंक जेऊरे** रा. घर नं ११०, सत्यनारायण सोसायटी, सोलापूर, जि. सोलापूर<br>**३. सौ. मोनिका सुरेश सरकार** रा. घर नं. २४८.१४९, कल्याण नगर भाग-२, मजरेवाडी, सोलापूर, जि. सोलापूर |
| ८ | ८८५/२०२६ | ३७,७१६/- | १<br>२<br>३ | **१. श्री. रोहित रमेश शिंदे** रा. घर नं २२ वैष्णवी नगर २ सैफुल विजापुरगेड सोलापूर<br>**२. श्री. आण्णासाहेब किसन घंटे** रा. घर नं १५.१ वैण्णवी नगर २ सैफुल विजापुरगेड मोलापूर<br>**३. श्री. सतिश दशरथ बागल** रा. घर नं ५१. अ ग्वामी विवेकानंद नगर मोलापूर जि. सोलापूर |
| ९ | ८७९/२०२६ | १,१६,८०४/- | १ | **१. श्री. रविंद्र मेघराज राठोड** रा. शंकरनगर, ता. द. सोलापूर, जि. सोलापूर |
| १० | ८७८/२०२६ | ५६,३७९/- | | **२. श्री. शेखर विष्णु जगदाळे** रा.८०२४ उरूबा शिंदे चौक, सोलापूर, जि. सोलापूर |
| ११ | ८७१/२०२६ | ७५,१७७/- | २ | **३. श्री. शिलाज महमद शेखजी** रा. रत्नमंजीरी नगर सोलापुर जि. सोलापूर |
| १२ | ८८८/२०२६ | ५३,७५३/- | २ | **२. श्री. यश मनोज थिटे** रा. राजेश्वरी नगर बाळे सोलापूर जि. सोलापूर |

यात वादी पतसंस्था यांनी दाखल केलेल्या अर्जातील वर नमूद केलेल्या प्रतिवादी यांचे पत्ते उपलब्ध होत नसल्यामुळे/पत्तावर आढळून येत नसल्याने/अपुरा पत्ता असल्याने सदरचे जाहीर समन्स देणेत येत आहे. प्रतिवादी यांना जाहीर समन्सद्वारे कळविणे येते की, **उपनिर्दिष्ट अर्जासंबंधी आपले म्हणणे मांडणेसाठी स्वताः जातीने अथवा वकिलामार्फत दिनांक - १६/०६/२०२६ रोजी दुपारी १२.०० वा. कागदपत्रासह या कार्यालयात हजर रहावे .**

प्रतिवादी यांनी तारखेस वेळेवर हजर न राहिल्यास त्यांच्या गैरहजेरीत अर्जाची सुनावणी घेण्यात येईल व पुढील योग्य तो निर्णय केला जाईल.

आज दि. ०२/०६/२०२६ रोजी माझी सही व कार्यालयाचे मुद्रेसह हे जाहीर समन्स दिले आहे.

**स्थळ - सोलापूर**
**दि. ०२/०६/२०२६**

शिक्का

**सही/-**
**(डॉ. प्र.अ. बागल)**
**उपनिबंधक**
**सहकारी संस्था, सोलापूर शहर, सोलापूर**

## नावात बदल

**माझे जुने नाव संजय विठ्ठलराव जगताप असे होते ते आता बदलून संजय विठ्ठलराव जगताप असे ओळखले जाईल. अक्कलकोट येथील मे. कार्यकारी दंडाधिकारी यांचे समोर प्रतिज्ञा पत्र क्र. ५४८/२०२६ दिनांक- २१/०५/२०२६**

## जाहीर समन्स/नोटीस

आर.टी.एस. अपील नं. ९६/२०२४

**सोलापूर येथील मे. उपविभागीय अधिकारी साहेब यांचे कोर्टात**

**दत्तात्रय निवृत्ती माळी, वगैरे - अपेलंट्स**
विरुध्द
**भागवत धर्मा माळी वगैरे - रिस्पॉडंट्स**

ज्या अर्थी, यातील अपेलंट्स यांनी, रिस्पॉडंट्सविरुध्द या कोर्टात, रस्ता / कलम / १४३ / एस.आर. ३ /२०२१ ता. ०७/१२/२०२३ रोजीचे मे. तहसिलदार बार्शी यांचे कोर्टातील न्यायनिर्णयाविरुध्द सदरचे अपील दाखल केलेले आहे.

सदर अपीलाचे कामी खालीलप्रमाणे रिस्पॉडंट्स यांना अपीलात नमुद केलेल्या पत्यावर वेळोवेळी समन्स काढूनही बजावणी होत नाही. ते वारंवार राहणेचे पत्ते बदलत असल्याने बजावणी झाली नाही. त्यांचा सध्याचा पत्ता, ठावठिकाणा माहित नसलेने, अपेलंट्स यांनी अपीलात नमुद असलेल्या खालील पत्त्यावर त्यांना जाहीर समन्स काढणेबाबत अर्ज दिलेला आहे.

रिस्पॉइंट नं. ३ - **ज्ञानेश्वर बलभिम माळी,** वय - ४३, धंदा - शेती, रा. नारीवाडी, ता. बार्शी, जि. सोलापूर
रिस्पॉडंट नं. ६ - **अनुराधा अश्रूबा तांदळे,** वय - ३८ वर्षे, धंदा - घरकाम, रा. इंदापूर, ता. बाशी, जि. सोलापूर
रिस्पॉडंट नं. १३ - **श्रीधर नारायण माळी,** वय - ६२ वर्षे, धंदा - शेती, रा. नारी, ता. बार्शी, जि. सोलापूर

त्यामुळे या जाहीर समन्स/नोटीसने तुम्हास कळविण्यात येते की,

त्या अर्थी, सदर जाहीर समन्स / नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसांचे आत किंवा नेमली ता. १०/०६/२०२६ रोजी, या अपीलाचे कामी हजर राहून, आपले म्हणणे वा हरकत लेखी स्वरूपात पुराव्यानिशी दाखल करावी. मुदतीत तुमची हरकत वा म्हणणे आले नाही तर, तुम्हास काही सांगणे नाही, असे समजून, तुमचे गैरहजेरीत पुढील चौकशी होऊन न्यायनिर्णय होईल.

कळावे हे जाहीर समन्स / नोटीस मे. कोर्टाचे सही शिक्क्यानिशी दिली असे. ता. ०२/०६/२०२६

कोर्टाचा शिक्का

**सही/-**
**मा. उपविभागीय अधिकारी**
**सोलापूर क्र. १ सोलापूर**

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस विशेषतः मौजे बार्शी व आसपासचे परिसरातील तसेच बार्शी तालुक्यातील लोकांना या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, डि. सोलापूर सब डि. व ता. बार्शी पैकी येथील म्युन्सीपल हद्दीतील कसबा पेठ भागातील तानाजी चौकातील जागा जिचा सि.स.नं. ७८५/७८६ पैकी पूर्व उत्तर कोपऱ्यातील जागा याचे क्षेत्रफळ चौ.मी. ५०.६२, व यासी पुर्व बाजू ३०.५ फुट व याचे मी. ९.२७. दक्षिण बाजू १८.११ फुट याचे मी. ५.७७, पश्चिम बाजू ३०.५ फुट व याचे मी. ९.२७, व उत्तर बाजू १८.९ फुट याचे मी. ५.७१, या जागेत दोन मजली बांधाकाम आहे. यात खाली दोन खोल्या, वरी दोन खोल्या असे एकूण ४ खोल्या आहेत. यासी चतुःसिमा पुर्वेस - सि.स.नं. ७८८ व ७८७, दक्षिणेस व पश्चिमेस - सदर सि.स.नं. पैकी उर्वरित जागा व उत्तरेस - म्युनसिपल बोळ, येणेप्रमाणे चतुःसिमापुर्वक वर्णनाची वरजागा आतील सर्व तंदगभूत वस्तुसह.

वर नमुद मिळकती हि श्री. विजयकुमार विश्वनाथ गुरव यांची स्वकष्टार्जीत खरेदी मालकीची होती व आहे. सदर मिळकतीबाबत कु. कश्मीरा शेखर गुरव यांना श्री. विजयकुमार विश्वनाथ गुरव यांनी दि. २९/०५/२०२६ रोजी कुलमुखत्यारपत्र देवून सदरची जाहीर नोटीस देणेबाबतचे अधिकार दिलेले असल्यामुळे त्यांचे तर्फे या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, वर नमुद मिळकतीबाबत दि. २८/१२/२०२१ रोजी श्री. विजयकुमार विश्वनाथ गुरव यांनी त्यांची पत्नी सौ. शोभा विजयकुमार गुरव व मुलगा श्री. शेखर विजयकुमार गुरव यांचे नावे मृत्युपत्र केलेले होते. सदरचे मृत्युपत्र हे नोटरी अधिकारी बार्शी यांचेकडे नोटरी केलेले होते. सदरचे मृत्युपत्र हे दि. २९/०५/२०२६ रोजी सदर श्री. विजयकुमार विश्वनाथ गुरव यांनी कायदेशीररित्या रद्द/cancel केलेले आहे. तसा लेखी cancellation deed बनविलेले आहे. त्यामुळे सदर मृत्युपत्राचा येथून पुढे अथवा सदर श्री. विजयकुमार विश्वनाथ गुरव यांचे मृत्युपश्चातही अंमल होणेचा नाही. सदर मृत्युपत्रान्वये सौ. शोभा विजयकुमार गुरव व शेखर विजयकुमार गुरव यांना पुढे चालून म्हणजेच सदर श्री. विजयकुमार विश्वनाथ गुरव यांचे मृत्युनंतर वर नमुद मिळकतीमध्ये मृत्युपत्राने कोणताही कायदेशीर अधिकार राहिलेला नाही. त्यामुळे या जाहीर नोटीसीने सदरची बाब कळविलेली आहे. याउपरही त्यांचे काही म्हणणे असेल तर त्यांनी खालील नमुद पत्त्यावर योग्य त्या कागदोपत्री पुराव्यानिशीही नोटीस प्रसिध्द झालेपासुन ३ (तीन) दिवसांत कागदपत्रासह लेखी स्वरुपात आमचे कार्यालयात येऊन समक्ष भेटुन खात्री करुन द्यावी. त्यानंतर वर नमुद मुदतीत कोणाचीही कसलीही हरकत, तक्रार आमचे अशिलावर बंधनकारक राहणार नाही. याची नोंद घ्यावी. कोणाचीही फसगत होऊ नये म्हणून ही जाहीर नोटीस दिली असे. ता. ०२/०६/२०२६

**सही/-**
**ॲड मिस. एस.एस. क्षिरसागर**
**ऑफिस - पं. नेहरू हौसिंग सोसायटी**
**सुभाष नगर रोड, शाळा नं. १७ चे**
**समोर, बार्शी ता. बार्शी जि. सोलापूर**
**अशिलातर्फे ॲडव्होकेट**

## खरेदीपुर्व जाहीर नोटीस

प्रस्तुत जाहीर नोटीसीद्वारे तमाम जनतेस विशेषतः मौजे यावली, तालुका बार्शी व जिल्हा सोलापूर येथील व आसपासचे सलग्न तालुक्यातील व परिसरातील तमाम लोकांना कळविण्यात येते की,

अ) डि सोलापूर तालुका बार्शी पैकी मौजे यावली येथील शेतजमीन याचा गट नं. २५/१/क/१ यापैकी क्षेत्र ०० हे ८१ आर, आकार ०१ रु ६१ पैसे येणेप्रमाणे चतुःसिमापुर्वक शेतजमीन आतील सर्व झाडझुडूप, दगड, माती, तदंगभुत वस्तु हक्कासह.

ब) डि सोलापूर तालुका बार्शी पैकी मौजे यावली येथील शेतजमीन याचा गट नं. २५/१/ब/१ यापैकी क्षेत्र ०० हे ८१ आर, आकार ०१ रु ६५ पैसे. येणेप्रमाणे चतुःसिमापुर्वक शेतजमीन आतील सर्व झाडझुडुप, दगड, माती, तदंगभुत वस्तु हक्कासह.

क) डि सोलापूर तालुका बार्शी पैकी मौजे यावली येथील शेतजमीन याचा गट नं. २५/१/अ/१ यापैकी समाईक क्षेत्र ०१ हे २१ आर, + पो.ख. ०० हे ०१ आर एकूण क्षेत्र आकार ०२ रु ६० पैसे. येणेप्रमाणे चतुःसिमापुर्वक शेतजमीन आतील सर्व झाडझुडुप, दगड, माती, तदंगभुत वस्तु हक्कासह.

वर नमुद कलम अ व ब मधील शेतजमनी या छाया गंगाधर दिंडोरे यांचे मालकी व कब्जे वहिवाटीची आहे व कलम क मधील शेतजमीन हि छाया गंगाधर दिंडोरे व माणिक रामभाऊ दिंडोरे यांचे समाईक मालकी व कब्जे वहिवाटीची आहे. आज रोजी वर नमुद केल्याप्रमाणे छाया गंगाधर दिंडोरे व माणिक रामभाऊ दिंडोरे यांचे नावे समाईक मालकी हक्की ७/१२ हक्कपत्रकी नाव दाखल आहे व नमुद शेतजमीन प्रत्यक्ष कब्जे वहिवाटीस आहे.

सदरची मिळकत छाया गंगाधर दिंडोरे व माणिक रामभाऊ दिंडोरे यांनी त्यांचे प्रापंचिक, कायदेशीर गरजेपोटी आमचे अशिलास विक्री करणेचे ठरविलेले आहे व आमचे अशिलांनी सदरची मिळकत खरेदी घेण्याचे ठरविलेले आहे. तसा विक्री संबंधीचा व्यवहारही उभयंतामध्ये ठरलेला आहे. व त्याप्रमाणे जमीन मालक यांनी इसारा रक्कम आमचे अशिलांकडुन स्विकारलेली आहे. सदरची मिळकत हि निर्वेध, निजोखमी, बिनबोजाची, स्वतंत्र मालकी व कब्जे वहिवाटीची असल्याची खात्री, ग्वाही जमीन मालकांनी आमचे अशिलास दिलेली आहे.

या उपरही वर नमुद मिळकत संदर्भाने कोणाचाही कसलाही गहाण, दान, बक्षीस, साठेखत, मृत्युपत्र, खरेदीखत, वारसा, फेडपत्र, पोटगी, टाच, कर्ज-बोजा, जप्ती, करार, नोटरी, खंडपत्र, बटईपत्र, आग्रहक्क, पोटगीबोजा, कोर्ट केसेस अथवा अन्य कोणत्याही स्वरुपाचा हक्क हितसंबंध तसेच वादविवाद असल्यास त्यांनी खालील नमुद पत्त्यावर योग्य त्या कागदोपत्री पुराव्यानिशीही नोटीस प्रसिध्द झालेपासुन ०८ (आठ) दिवसांचे आत कागदपत्रासह लेखी स्वरुपात आमचे कार्यालयात येऊन समक्ष भेटुन खात्री करुन द्यावी. वर नमुद मुदतीत कोणाचीही कसलीही हरकत, तक्रार न आलेस वर नमुद मिळकतही निजोखमी व बिनबोजाची, त्यावर कोणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क अथवा हितसंबंध नसल्याचे समजुन अथवा त्यांनी तो जाणीवपूर्वक स्वईच्छेने सोडून दिला असे समजुन आमचे अशिल व जमीन मालक आपसात ठरल्याप्रमाणे खरेदीचा व्यवहार पुर्ण करतील त्यानंतर मागाहुन कोणाचीही, कसलीही, कोणतीही प्रकारची तक्रार आमचे अशिलावर बंधनकारक राहणार नाही. याची नोंद घ्यावी.

कोणाचीही फसगत होऊ नये म्हणून ही खरेदीपुर्वी जाहीर नोटीस दिली असे. ता. ०२/०६/२०२६

**सही/-**
**ॲड. आयेश इस्माईल शेख**
**जिल्हा व सत्र न्यायालय, बार्शी**
**मो. ९८८१०७७७५४**
**अशिलातर्फे ॲडव्होकेट**

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



महत्त्वाचे

## साईराज-सत्या मुख्य ड्रॉसाठी पात्र



सत्या चौहान व साईराज नायसे

**हैदराबाद** : हैदराबाद येथील पुलेला गोपीचंद बॅडमिंटन अकादमीमध्ये सुरू असलेल्या अखिल भारतीय सब-ज्युनियर (अंडर-१५ आणि अंडर-१७) रँकिंग बॅडमिंटन स्पर्धेत मंगळवारी साईराज नायसे आणि सत्या चौहान मुख्य ड्रॉसाठी पात्र ठरले आहेत. नागपूरचा साईराज आणि त्याचा जोडीदार सत्या (मुंबई) यांनी चौथ्या आणि अंतिम पात्रता फेरीत सी. पी. हरिकुमार आणि जेस्विन सूर्या व्यंकटरमण यांचा १५-९, १५-६ असा पराभव करून अंडर-१७ मुलांच्या दुहेरीच्या मुख्य ड्रॉमध्ये आपले स्थान निश्चित केले. महाराष्ट्राच्या साईराज-सत्या या जोडीने सोमवारी तिसऱ्या फेरीत देवाशीष प्रजापत आणि विनय प्रताप सिंग यांचा १५-८, १५-११ असा पराभव केला होता. आधीच्या दोन फेऱ्यांमध्ये, साईराज-सत्या यांनी अनुक्रमे दुर्गा प्रसाद शेट्टी-दीप्त्यांशु शर्मा आणि व्ही. ऋत्विक व बी. रामकुमार यांचा पराभव केला. अरुंधती अरुण बॅडमिंटन अकादमीचे प्रशिक्षणार्थी असलेले साईराज आणि सत्या, मुख्य ड्रॉमध्ये एस. वरुण नायर आणि मुहम्मद नाझमी यांचा सामना करतील. ■

## विराट-अनुष्का प्रेमानंद महाराजांच्या चरणी

**मथुरा** : विराट कोहलीच्या रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूने नुकतेच आपले दुसरे आयपीएल विजेतेपद जिंकले. नेहमीप्रमाणेच, अनुष्का शर्मा आरसीबी आणि विराट कोहलीला पाठिंबा देण्यासाठी आली होती. आता, आपले दुसरे विजेतेपद जिंकल्यानंतर विराट कोहली आणि अनुष्का शर्मा थेट प्रेमानंद महाराजांच्या आश्रमात गेले आहेत. विराट आणि अनुष्काने



वृंदावनमधील आध्यात्मिक गुरू प्रेमानंद महाराजांच्या आश्रमाला भेट दिली. या दोघांनी प्रेमानंद महाराजांच्या राधा केली कुंज आश्रमाला भेट देऊन त्यांचे आशीर्वाद घेतले. आता, अनुष्का आणि विराटचे अनेक फोटो सोशल मीडियावर व्हायरल होत आहेत. यामध्ये, विराट आणि अनुष्का आध्यात्मिक गुरूंना भेटल्यानंतर आश्रमातून बाहेर पडताना दिसत आहेत. गेल्या काही वर्षांपासून, विराट कोहली आणि अनुष्का शर्मा यांनी वारंवार वृंदावनला भेट देऊन प्रेमानंद महाराजांचे आशीर्वाद घेतले आहेत. या जोडप्याने त्यांच्या जीवनातील अध्यात्माच्या महत्त्वाविषयी अनेकदा सांगितले आहे आणि त्यांना अनेक धार्मिक आणि आध्यात्मिक कार्यक्रमांमध्ये एकत्र पाहिले गेले आहे. आरसीबीने सलग दुसरे आयपीएल विजेतेपद जिंकल्यानंतर, अनुष्काने मैदानावर आणि मैदानाबाहेरही आनंद साजरा केला. यामध्ये सोशल मीडिया पोस्ट्स आणि नृत्य करतानाच्या व्हिडिओज्चा समावेश होता. अंतिम सामन्यात गुजरात टायटन्सला पाच गडी राखून पराभूत करून आरसीबीने आपली सलग दुसरी ट्रॉफी जिंकली.



## एनजी क्रिकेट; वॉरियर्स ७ धावांनी विजयी

**सोलापूर, दि. २ जून-**

निलेश गायकवाड क्रिकेट अकॅडमी आयोजित इंटर क्लब टूर्नामेंट मध्ये वॉरियर्स संघाने एम बी चॅलेंजर संघाचा ७ धावांनी पराभव केला. उत्कृष्ट कामगिरी बद्दल आदित्य चटके याला सामनावीर व उत्कृष्ट गोलंदाज म्हणून तर तनुष नाईक याला उत्कृष्ट फलंदाज म्हणून गौरवण्यात आले. प्रवीण कुलकर्णी आणि साकिब सय्यद यांनी पंच म्हणून तसेच वीरभद्र कोळी यांनी गुणलेखक आणि समालोचक म्हणून जबाबदारी पार पाडली.

**संक्षिप्त धावफलक : वॉरियर्स** : ३० षटकांत सर्वबाद १४७ ( आदित्य चटके ३४, नकुल होनमाने १२, संचित जानराव याने १०, सिद्धार्थ कुमशी ३-१३ फहाद मोमीन ३-२६) **वि. वि. एम. बी. चॅलेंजर** : ३० षटकांत ९ बाद १४०(तनुष नाईक ५०, आशिष पवार १५, आदित्य चटके ३-२३ यशराज टेकाळे ३-३०, विराज टकले २-३५.

# प्रज्ञानंद, गुकेश आणि दिव्यामुळे आशा कायम

### नॉर्वे बुद्धिबळ स्पर्धा

**◆ ओस्लो, २ जून**

मागील फेरीत निराशाजनक कामगिरीनंतर, भारतीय खेळाडूंनी नॉर्वे बुद्धिबळ स्पर्धेच्या सातव्या फेरीत जोरदार पुनरागमन करत आपल्या विजेतेपदाच्या आशा जिवंत ठेवल्या आहेत.

विश्वविजेता डी. गुकेश आणि आर. प्रज्ञानंद यांनी खुल्या गटात महत्त्वपूर्ण विजय मिळवले, तर दिव्या देशमुखने महिला गटात भारतीय खेळाडू कोनेरू हम्पीचा पराभव केला. हे चारही भारतीय खेळाडू सहाव्या फेरीत पराभूत झाले होते.



गुकेशने अमेरिकन ग्रॅण्डमास्टर वेस्ली सो विरुद्धच्या सामन्यात १.५ गुण मिळवले. क्लासिकल गेममध्ये एक संधी गमावल्यानंतर त्याने आर्मागेडॉन टाय-ब्रेक जिंकून आपले एकूण गुण आठवर नेले. तथापि, सहा खेळाडूंच्या डबल राऊंड-रॉबिन क्रमवारीत तो तळाशीच आहे.

प्रज्ञानंदने क्लासिकल गेममध्ये फ्रेंच ग्रॅण्डमास्टर अलीरेझा फिरौजाचा सलग दुसऱ्यांदा पराभव करत पूर्ण तीन गुण मिळवले. आता त्याचे नऊ गुण झाले आहेत. प्रज्ञानंद पाचव्या स्थानावर कायम आहे, तर गुकेश सहाव्या स्थानावर कायम आहे. स्पर्धेत सामन्यांच्या तीन फेऱ्या शिल्लक असताना, भारतीय खेळाडूंना पुनरागमन करून अव्वल स्थानी पोहोचण्याची संधी आहे. वेस्ली सो १२.५ गुणांसह गुणतालिकेत आघाडीवर आहे, तर अलीरेझा १० गुणांसह दुसऱ्या स्थानावर आहे. प्रज्ञानंद, जागतिक क्रमवारीत अव्वल असलेला मॅग्नस कार्लसेन आणि जर्मनीचा व्हिन्सेंट केमर प्रत्येकी नऊ गुणांसह तिसऱ्या स्थानावर बरोबरीत आहेत.

सात वेळचा चॅम्पियन कार्लसेनने आर्मागेडॉन टाय-ब्रेकमध्ये केमरला पराभूत केले. ◀(वृत्तसंस्था)

### दिव्याचे स्थान मजबूत

दिव्याने आर्मागेडॉन टाय-ब्रेकमध्ये हम्पीला पराभूत करून आपले स्थान अधिक मजबूत केले. पुढील फेरीत तिचा सामना अव्वल मानांकित बिबिसारा असोबायेवाशी होणार आहे, जिथे विजय तिला आघाडी मिळवून देऊ शकतो. तथापि, असोबायेवाने आपला उत्कृष्ट फॉर्म कायम ठेवत, क्लासिकल गेममध्ये चीनच्या झू जिनरला पराभूत करून पूर्ण तीन गुण मिळवले. आता तिचे १२.५ गुण झाले आहेत. दिव्याचे १० गुण आहेत. ■



उत्तराखंडमधील चमोली जिल्ह्यातील नीती व्हॅली येथे पर्यटन विभागाने आयोजित केलेल्या 'नीती एक्स्ट्रीम अल्ट्रा रन'च्या अखेरच्या दिवशी गमसाली ते मलारी या ३० किमीच्या माऊंटन बाईकिंग चॅलेंजमध्ये सहभागी सायकलस्वार.

# मॉडेल क्रिकेट ॲकॅडमी, ख्वाजा बंदेनवाज क्लबचे शानदार विजय





### ७९ वी रेल्वे स्कॉट मेमोरियल प्रिसिजन क्रिकेट स्पर्धा

**सोलापूर, दि. २ जून-**

रेल्वेची ७९ व्या स्कॉट मेमोरियल प्रिसिजन क्रिकेट स्पर्धेत मॉडेल क्रिकेट ॲकॅडमी आणि ख्वाजा बंदेनवाज क्रिकेट क्लब यांनी आपापल्या प्रतिस्पर्ध्यांवर मात करत शानदार विजय नोंदवले.

सकाळच्या सत्रात पावसाच्या कारणास्तव ८-८ षटकांच्या खेळवण्यात आलेल्या सामन्यात एस एस आय संघाने नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजी स्वीकारली. प्रथम फलंदाजी करताना मॉडेल क्रिकेट ॲकॅडमीने ८ षटकांत ६ बाद ८८ धावा उभारल्या. यात वैष्णव जावळेने ३०, सुमित येवलेने २२ तर विवेक अंचीने १६ धावांचे योगदान दिले. एस.एस. आय.कडून गोलंदाजीत निखिल दोरणाल व चेतन नराळ यांनी प्रत्येकी २ बळी, तर दीपक राजुल व मनीष यमुल यांनी प्रत्येकी १ बळी घेतला. प्रत्युत्तरात मैदानात उतरलेला एस एस आय संघ ८ षटकांत ५ बाद ७४ धावांपर्यंतच मजल मारू शकला. त्यांच्याकडून निखिल मादास (१६), समर्थ दोरणाल (१६) आणि निखिल दोरनाल (१२) यांनी संघर्ष केला. मॉडेल ॲकॅडमीच्या प्रथमेश राठोड व सुदेश राठोड यांनी प्रत्येकी २, तर आदर्श नागोजीने १ बळी घेत एस एस आयला रोखले. हा सामना मॉडेल क्रिकेट ॲकॅडमीने १४ धावांनी जिंकला. उत्कृष्ट कामगिरीबद्दल प्रथमेश राठोडला वरिष्ठ खेळाडू राजा पटेल यांच्या हस्ते, आणि विक्रांत पवार, अंबादास तोरा, वासुदेव धोरणाल व वैभव इरावती यांच्या उपस्थितीत सामनावीर पुरस्कार देण्यात आला. या सामन्यात मजहर मंगोली व चिराग शहा यांनी पंच म्हणून, तर सचिन गायकवाड यांनी गुणलेखक म्हणून काम पाहिले.

### उद्याचे सामने

**सकाळी** : सेंट्रल रेल्वे इन्स्टिट्यूट बी विरुद्ध श्री स्वामी समर्थ क्रिकेट क्लब.

**दुपारी** : ख्वाजा बंदेनवाज क्रिकेट क्लब विरुद्ध कंपली प्रकाश क्रिकेट ॲकॅडमी

दुपारच्या सत्रात पावसाच्या व्यत्ययामुळे १५-१५ षटकांच्या झालेल्या दुसऱ्या सामन्यात मारिया क्रिकेट ॲकॅडमी, ठाणे संघाने नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजीचा निर्णय घेतला. पहिल्यांदा फलंदाजी करताना ख्वाजा बंदे नवाज क्रिकेट ॲकॅडमीने वसीम बॅगच्या ७९ धावांच्या वादळी खेळीच्या जोरावर १५ षटकांत ६ बाद १५० धावांचा टप्पा गाठला. केदारनाथ आणि आदर्श राठोड यांनी प्रत्येकी १६ धावा केल्या. मारिया क्रिकेट क्लबतर्फे बाबूने ३, बाळाने २ तर जयप्रकाशने १ बळी घेतला. १५१ धावांच्या आव्हानाचा पाठलाग करताना मारिया क्रिकेट क्लबचा डाव १५ षटकांत ८ बाद १२१ धावांवर मर्यादित राहिला. त्यांच्याकडून अभिषेकने ३०, बाबूने १७ आणि मीत घोळतने १६ धावा केल्या. ख्वाजा बंदेनवाज संघाकडून अष्टपैलू वसीम बेगने गोलंदाजीतही चमक दाखवत अवघ्या ५ धावांत ३ बळी टिपले, तर जाहिद पठाण आणि जकवान यांनी प्रत्येकी १ बळी घेतला. हा सामना ख्वाजा बंदेनवाज क्रिकेट ॲकॅडमीने २९ धावांनी खिशात घातला. दमदार अष्टपैलू कामगिरी करणाऱ्या वसीम बॅगला वरिष्ठ खेळाडू लियाकत शेख आणि राजा पटेल यांच्या हस्ते, व अतुल बांदोडकर आणि सचिन गायकवाड यांच्या उपस्थितीत सामनावीर पुरस्काराने गौरविण्यात आले. या सामन्याचे पंच म्हणून महेश सोनवणे व युनूस खान यांनी, तर गुणलेखक म्हणून सचिन गायकवाड यांनी काम पाहिले.

## क्रीडा विभागाच्या योजनांसाठी १० जुलैपर्यंत प्रस्ताव सादर करा

### जिल्हा क्रीडाधिकारी प्रकाश मोहारे यांचे आवाहन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २ जून-**

राज्यामध्ये क्रीडा क्षेत्राचा विकास व्हावा तसेच सर्व नागरिकांचे आरोग्यमान चांगले राहावे यासाठी शासनाच्या वतीने क्रीडा व युवा धोरणाची प्रभावी अंमलबजावणी करण्यात येत आहे.

या धोरणांतर्गत विद्यार्थी व तरुणांसाठी व्यायामशाळा व क्रीडांगणे विकसित करण्याच्या विविध योजना राबविण्यात येत असून त्यामध्ये व्यायामशाळा विकास अनुदान योजना व क्रीडांगण विकास अनुदान योजना समाविष्ट आहेत.

तरी संबंधित पात्र संस्थांनी सर्वसाधारण व विशेष घटक योजनांसाठी विहित नमुन्यातील अर्ज आवश्यक कागदपत्रांसह दिनांक १० जुलै २०२६ पर्यंत कार्यालयीन वेळेत जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, जिल्हा क्रीडा संकुल, कुमठा नाका, सोलापूर येथे कार्यालयीन वेळेत सादर करावेत.

अधिक माहितीसाठी कुमठा नाका येथील जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालयाशी संपर्क साधावा, असे आवाहन जिल्हा क्रीडा अधिकारी प्रकाश मोहारे यांनी केले आहे.




## क्रीडा शिक्षक गंगाराम घोडके यांचा सेवानिवृत्ती निमित्त सत्कार

**तभा वृत्तसेवा**
**अक्कलकोट, दि. २ जुन-**

सोलापूर येथील क्रीडा शिक्षक गंगाराम घोडके यांनी श्री मल्लिकार्जुन हायस्कूल हत्तुरे नगर, सोलापूर या ठिकाणी सलग २७ वर्ष क्रीडा शिक्षक म्हणून यशस्वीपणे सेवा केली. त्यानिमित्त त्यांचा श्री वटवृक्ष स्वामी महाराज देवस्थानच्या वतीने चेअरमन व नगरसेवक महेश इंगळे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. यावेळी प्राचार्य वैजनाथ हत्तुरे, जिल्हा सॉफ्टबॉल असोसिएशनचे अध्यक्ष सिद्धेश्वर पाटील, नगरसेवक विनोद भोसले, मुख्याध्यापक रमेश दिंडोरे, निवृत्त तालुका क्रीडाधिकारी सत्येन जाधव, प्राध्यापक संतोष खेंडे, सुहास छंचुरे, अजित पाटील, वसीम शेख, प्रबुद्ध चिंचोळीकर, बाळकृष्ण गायकवाड, राजेश एकबोटे, नारायण रासमक, श्रीनिवाल वालसा, प्रसाद करे, रमेश शिंदे, बाळकृष्ण गोट्टीपमूल, क्रीडा प्रेमी आजी-माजी विद्यार्थी जिल्हा शारीरिक शिक्षण क्रीडा शिक्षक उपस्थित होते.

## साऊथ सोलापूर ब्ल्यूचा मॉडेलवर दणदणीत विजय

### विजय ट्रॉफी : श्रीनिवास कुलकर्णी सामनावीर

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २ जून-**



येथील इंदिरा गांधी पार्क स्टेडियम वर रंगलेल्या विजय ट्रॉफी सुपर नॉकआउट क्रिकेट सामन्यात साऊथ सोलापूर ब्ल्यू संघाने अष्टपैलू कामगिरीच्या जोरावर मॉडेल क्रिकेट अकादमीची९८ धावांनी धुव्वा उडवला.

नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी स्वीकारणाऱ्या साऊथ सोलापूर ब्ल्यू संघाने ३९.४ षटकांत सर्वबाद २७७ धावांची भक्कम धावसंख्या उभारली. यामध्ये निरंजन कदम याने अवघ्या ६७ चेंडूंत ११ चौकार व २ षटकारांच्या मदतीने ८२ धावांची वादळी खेळी केली. त्याला अमीर खान (६६ चेंडूंत ७८ धावा) आणि यश गोपाळ (५४ धावा) यांनी दमदार अर्धशतकी खेळी करत साथ दिली. २७८ धावांच्या आव्हानाचा पाठलाग करताना मॉडेल सीए संघाला निर्धारित ४० षटकांत ७ बाद १७९ धावांपर्यंतच मजल मारता आली. साऊथ सोलापूर ब्लूच्या गोलंदाजांनी सुरुवातीपासूनच अचूक टप्प्यावर मारा करत विरोधी फलंदाजांना जखडून ठेवले. जोतिबा चव्हाण याने ४६ धावांत सर्वाधिक ४ बळी घेतले. तर श्रीनिवास कुलकर्णी याने ८ षटकांत अवघ्या २१ धावा देत ३ महत्त्वाचे बळी टिपले. त्याच्या या किफायतशीर आणि भेदक गोलंदाजीसाठी त्याला सामनावीर पुरस्काराने गौरवण्यात आले.

# सोलापूर, सांगली, पुणे, धाराशिवची दोन्ही गटात विजयी सलामी

### ५२ वी कुमार-मुली राज्य अजिंक्यपद व निवड चाचणी खो-खो स्पर्धा : रत्नागिरीच्या मुलींचाही विजयी झेंडा



सोलापूर : मुलींच्या लातूर विरुद्ध ठाणे या सामन्यातील क्षण.

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २ जून-**

नेहरूनगर येथील शासकीय मैदानावर उभारण्यात आलेल्या स्वर्गीय अजितदादा पवार क्रीडा नगरीत सुरू असलेल्या ५२ व्या कुमार-मुली राज्य अजिंक्यपद व निवड चाचणी खो-खो स्पर्धेच्या पहिल्याच दिवशी अनेक संघांनी प्रतिस्पर्ध्यांचा अक्षरशः धुव्वा उडवत विजयी सलामी दिली. महाराष्ट्र खो-खो असोसिएशनच्या मान्यतेने तसेच सोलापूर ॲम्युचर्स खो-खो असोसिएशन आणि किरण स्पोर्ट्स क्लब यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित या स्पर्धेत सोलापूर, सांगली, पुणे, धाराशिव यांनी कुमार व मुली दोन्ही गटांत विजयाची नोंद केली, तर रत्नागिरीच्या मुली संघाने रायगडवर मात करत स्पर्धेची दमदार सुरुवात केली.

**सोलापूरच्या सिद्धार्थ-समर्थच्या अष्टपैलू खेळीने परभणीचा धुव्वा**

कुमार गटातील सामन्यात सोलापूरने परभणीचा ४३-१८ असा एक डाव राखून धुव्वा उडवला. सोलापूरच्या सिद्धार्थ माने-देशमुख (१.२० मि. संरक्षण व ८ गुण) आणि समर्थ जाधव (२.०० मि. संरक्षण व ८ गुण) यांनी अष्टपैलू खेळ करत सामन्यावर एकहाती वर्चस्व गाजवले. परभणीकडून शिवराज चिंचवड, कृष्णा पुरोहित, वैभव भालेराव आणि वैजनाथ पोळे यांनी प्रत्येकी चार गडी बाद करत झुंज दिली; मात्र सोलापूरच्या आक्रमणापुढे त्यांचे प्रयत्न निष्फळ ठरले.

**मुंबईची जळगाववर मात; विघ्नेश-अंश चमकले**

दुसऱ्या सामन्यात मुंबईने जळगावचा ३३-२४ असा ६.२० मि. राखून मोठा पराभव केला. मुंबईच्या विघ्नेश कोरे (२.००, १.३० मि. संरक्षण व ६ गुण) आणि अंश कदम (१.३० मि. संरक्षण व ६ गुण) यांनी अष्टपैलू खेळ करत विजयात मोलाचा वाटा उचलला. जळगावच्या आयर्न पवार (नाबाद १, १.३० मि. संरक्षण व ६ गुण) याने एकहाती लढा दिला; मात्र तो संघाला विजय मिळवून देऊ शकला नाही.

**प्राजक्ता-स्नेहाच्या जोरावर सोलापूरचा बीडवर डावाने विजय**

मुली गटात सोलापूरने बीडचा ४१-१२ असा एक डाव राखून दणदणीत पराभव केला. प्राजक्ता बनसोडे (२.३९, १.४० मि. संरक्षण व ८ गुण) आणि स्नेहा लामकाने (३.०५ मि. संरक्षण व ६ गुण) यांनी अप्रतिम अष्टपैलू खेळ करत बीडच्या बचावफळीची पुरती मोडतोड केली. बीडकडून दुर्गा नाईकनवरे आणि श्रद्धा खारे (१.१० मि. संरक्षण) यांनी प्रत्येकी दोन गुण मिळवले; मात्र त्या संघाचा पराभव टाळू शकल्या नाहीत.

**तन्वी-साक्षीच्या खेळीने रत्नागिरीची विजयी सलामी**

मुलींच्या दुसऱ्या सामन्यात रत्नागिरीने रायगडवर ३०-२६ असा एक डाव राखून विजय मिळवला. रत्नागिरीच्या तन्वी खानविलकरने १.२० मि. संरक्षण करत ८ गुण मिळवले, तर साक्षी लिंगायतने १.१० मि. संरक्षण करत ६ गडी बाद करत संघाच्या विजयात मोलाचा वाटा उचलला. रायगडकडून प्रज्ञा गाडेने १.५० मि. संरक्षण करत १२ गुण अशी दमदार कामगिरी केली; मात्र तिची झुंज अपुरी ठरली.




सोलापूर : पुणे विरुद्धच्या सामन्यात नांदेडचा आक्रमक पुण्याच्या संरक्षकाला पोलवर टिपताना.

**कुमार गटात सांगली, पुणे, ठाणे, धाराशिवचा एकतर्फी जलवा**

कुमार गटातील अन्य सामन्यांत सांगलीने लातूरचा ४५-६ असा एक डाव राखून धुव्वा उडवला, धाराशिवने नंदुरबारचा ३९-१२ असा दणदणीत पराभव केला, पुण्याने नांदेडचा ४८-२० असा एक डाव राखून समाचार घेतला, मुंबई उपनगरने रायगडला ४४-३४ असे ५.२० मि. राखून हरविले, तर ठाण्याने सिंधुदुर्गचा ४९-१२ असा एक डाव राखून अक्षरशः धुव्वा उडवला.

**मुली गटातही विजयांची बरसात; सातारा-ठाणे-धाराशिवचा धडाका**

मुली गटात सांगलीने जळगावचा ३३-१६ असा एक डाव राखून पराभव केला, साताऱ्याने हिंगोलीचा ३८-४ असा एक डाव राखून धुव्वा उडवला, पुण्याने नांदेडला ४२-१२ असे नमविले, नाशिकने सिंधुदुर्गचा ५४-१० असा एक डाव राखून दणदणीत पराभव केला, ठाण्याने लातूरचा ५२-१२ असा एक डाव राखून चुराडा केला, तर धाराशिवने छत्रपती संभाजीनगरचा ४८-१० असा एक डाव राखून धुव्वा उडविला.

# ‘उजनी’च्या पाणथळीत जांभळ्या रंगांची उधळण

## जलवनस्पतींमध्ये वावरणारी जांभळी पाणकोंबडी देतेय पर्यावरणाच्या समृद्धीची साक्ष

**तभा वृत्तसेवा,**
**जेऊर, दि. २ जून-**

उजनी जलाशय परिसरातील पाणथळ भाग, दलदली आणि जलवनस्पतींनी समृद्ध अधिवासात सध्या जांभळी पाणकोंबडी या आकर्षक जलपक्ष्याचे दर्शन पक्षीप्रेमी आणि निसर्ग अभ्यासकांचे लक्ष वेधून घेत आहे. गडद निळसर-जांभळा रंग, लालभडक चोच आणि लांब गुलाबी पाय यामुळे हा पक्षी सहज ओळखला जातो. उजनीच्या विस्तीर्ण जलभूमीत जलवनस्पतींमध्ये मुक्तपणे वावरणाऱ्या या पक्ष्यामुळे परिसराच्या जैवविविधतेचे वैभव अधिक खुलून दिसत आहे.

जांभळी पाणकोंबडी हा उजनी परिसरातील स्थानिक निवासी पक्षी असून वर्षभर येथे आढळतो. दलदलीतील गवत, नरकुल, पाणवनस्पती तसेच उथळ पाण्याच्या भागात तो खाद्य शोधताना दिसतो. जलवनस्पतींची कोवळी पाने, बिया, कीटक, गोगलगायी आणि इतर लहान जलचर हे त्याचे प्रमुख खाद्य आहे. पाणथळ परिसंस्थेतील अन्नसाखळी संतुलित ठेवण्यात या पक्ष्याची महत्त्वाची भूमिका असते. त्याचबरोबर पाणथळ



भागातील वनस्पती आणि जैवविविधतेच्या स्थितीचे तो एक महत्त्वपूर्ण निर्देशक मानला जातो.

उजनी जलाशय परिसरात मागील काही वर्षांत पक्षीनिरीक्षकांकडून जांभळ्या पाणकोंबडीच्या दर्शनाच्या नोंदी वाढत आहेत. यावरून परिसरातील काही पाणथळ अधिवास अद्यापही जैवविविधतेस पोषक असल्याचे दिसून येते. जलवनस्पतींचे पट्टे, उथळ पाण्याचे क्षेत्र आणि मानवी हस्तक्षेप कमी असलेले भाग या पक्ष्यांसाठी सुरक्षित आश्रयस्थान ठरत आहेत. मात्र पाणथळ क्षेत्रांचे अतिक्रमण, जलप्रदूषण, प्लास्टिक कचरा, अनियंत्रित मासेमारी आणि दलदलींचा ऱ्हास यामुळे अशा पक्ष्यांच्या अधिवासावर भविष्यात धोका निर्माण होऊ शकतो.

पक्षी अभ्यासक साळुंके म्हणाले, जांभळी पाणकोंबडी हा उजनीच्या पाणथळ परिसंस्थेचा महत्त्वाचा स्थानिक पक्षी आहे. या पक्ष्याची उपस्थिती म्हणजे त्या परिसरातील जलवनस्पती, खाद्यसाखळी आणि अधिवास तुलनेने निरोगी असल्याचे द्योतक आहे. उजनी परिसरातील दलदली, गवताळ पाणथळी आणि उथळ जलक्षेत्रांचे संवर्धन केल्यास जांभळी पाणकोंबडीसह अनेक दुर्मिळ जलपक्ष्यांना सुरक्षित अधिवास उपलब्ध होईल.

यासंदर्भात पक्षी व जैवविविधता अभ्यासक डॉ. अरविंद कुंभार यांनी सांगितले, उजनी जलाशय परिसरातील जांभळी पाणकोंबडी ही पाणथळ परिसंस्थेच्या समृद्धीचे जैविक निर्देशक मानली जाते. या पक्ष्याची नियमित उपस्थिती म्हणजे त्या परिसरात जलवनस्पती, सूक्ष्म जीव, कीटक आणि इतर जलचरांचा समतोल चांगल्या स्थितीत असल्याचे द्योतक आहे. पाणथळ क्षेत्रे ही केवळ पक्ष्यांची अधिवासस्थाने नसून जलशुद्धीकरण, भूजल पुनर्भरण आणि जैवविविधता संवर्धनासाठी आवश्यक आहेत. त्यामुळे उजनी परिसरातील दलदली, उथळ पाणथळी आणि नैसर्गिक जलवनस्पतींचे संरक्षण करण्यासाठी स्थानिक प्रशासन, संशोधक आणि नागरिक यांनी संयुक्तपणे प्रयत्न करणे गरजेचे आहे.

### संवर्धनासाठी आवश्यक उपाययोजना

- पाणथळ व दलदलीच्या अधिवासांचे संरक्षण व पुनर्स्थापना करणे.
- जलाशय परिसरातील प्लास्टिक व इतर प्रदूषण रोखणे.
- जलवनस्पतींचे नैसर्गिक पट्टे जतन करणे.
- पक्ष्यांच्या प्रजनन क्षेत्रात मानवी हस्तक्षेप कमी करणे.
- स्थानिक नागरिक, विद्यार्थी व शेतकरी यांच्यामध्ये पक्षी संवर्धनाबाबत जनजागृती करणे.
- नियमित पक्षी गणना व जैवविविधता अभ्यासाला प्रोत्साहन देणे.

## महत्वाचे...



### पर्यावरण दिन अभियान चित्रकला स्पर्धेत ८५ जणांचा सहभाग

**सोलापूर, दि. २ जून-**

जागतिक पर्यावरण दिन अभियानाच्या अनुषंगाने आज कार्मिक विभाग व यांत्रिक विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने डीआरएम कार्यालयाजवळील बाल विकास मंदिर, सोलापूर येथे विद्यार्थ्यांसाठी चित्रकला स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. स्पर्धेचा विषय ङ्गहवामान बदलङ्ख हा होता. या स्पर्धेत सुमारे ८५ विद्यार्थ्यांनी उत्साहाने सहभाग घेतला आणि पर्यावरण संवर्धन, शाश्वत जीवनशैली तसेच हवामान बदलाचे परिणाम यांवर आधारित आकर्षक चित्रे सादर केली. स्पर्धेचा मुख्य मुलांमध्ये पर्यावरणाबाबत जागरूकता निर्माण करणे व निसर्गाप्रती जबाबदारीची भावना विकसित करणे हा होता. विद्यार्थ्यांना प्रोत्साहन देण्यासाठी आणि त्यांच्या सहभागाचा गौरव करण्यासाठी सर्व सहभागी विद्यार्थ्यांना तत्काळ भेटवस्तू देण्यात आल्या. ही चित्रकला स्पर्धा वरिष्ठ विभागीय कार्मिक अधिकारी, सोलापूर आणि वरिष्ठ विभागीय यांत्रिक अभियंता, सोलापूर यांच्या मार्गदर्शनाखाली यशस्वीरित्या पार पडली. कार्यक्रमाचे समन्वयन विपिन कुमार सिंह, रामलाल प्यासे, जितेंद्र वाघमारे, महावीर निमानी, अरविंद खडाखडे, शिल्पा ढेपले, भिमशा मस्के मुख्य कर्मचारी व कल्याण निरीक्षक, सोलापूर यांनी केले. रेल्वेने घेतलेल्या ड्रॉईंग कॉम्पिटिशनमध्ये प्रवीण तळे यांची उपस्थिती.



### ‘स्वेरी’तर्फे मातोश्री वृद्धाश्रमात फळे वाटप

**पंढरपूर, दि. २ जून-**

गोपाळपूर (ता. पंढरपूर) येथील स्वेरी तथा ‘श्री विठ्ठल एज्युकेशन अँड रिसर्च इन्स्टिट्यूट या शिक्षणसंस्थेचे संस्थापक डॉ. बी. पी. रोंगे यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून, गोपाळपूर येथील मातोश्री वृद्धाश्रम येथे वृद्धांना फळे वाटप करण्यात आली. मातोश्री वृद्धाश्रमाचे अध्यक्ष हभप बद्रीनाथ महाराज तनपुरे यांच्या मार्गदर्शनाखाली चालणाऱ्या या वृद्धाश्रमातील आजी-आजोबांची भेट घेऊन त्यांच्याशी आपुलकीचा संवाद साधण्यात आला व त्यांना फळे वाटप करण्यात आली. यावेळी डॉ. वृणाल मोरे, डॉ. प्राजक्ता खुळे, लोटस इंग्लिश स्कूलच्या प्राचार्या डॉ. जयश्री भोसले, सहशिक्षक सचिन निकम, संपत लवटे, दयानंद जाधव, शिक्षकेतर कर्मचारी संजय फुले यांच्यासह वृद्धाश्रमाचे व्यवस्थापक धनंजय राक्षे उपस्थित होते.

### अक्कलकोटमध्ये सक्तीचे स्मार्ट मीटर बसविणे थांबविण्याची मागणी

**अक्कलकोट, दि. २ जून-**

महावितरण अक्कलकोट यांच्या वतीने शहरात सक्तीने स्मार्ट मिटर बसविण्याचे काम चालू आहे ही जनतेची मोठी लूट आहे. अधिकारी कर्मचारी यांची नागरिकांशी उध्दट वागणूक, अरेरावी दडपशाही चालू आहे. बसवण्यात आलेले स्मार्ट मिटर त्वरीत बदलून द्या. स्मार्ट मीटरद्वारे आलेले लाईट बिल रद्द करा. शहरात वारंवार खंडीत होणारा वीज पुरवठा सुरळीत करा, वारंवार खंडीत होणाऱ्या वीजपुरवठयामुळे विद्युत उपकरणे निकामी होत आहेत. शहरासाठी स्वतंत्र सबस्टेशन निर्मिती करा अशा मागणीचे निवेदन प्रहार संघटनेच्या वतीने तालुका अध्यक्ष अमर शिरसाट यांच्या नेतृत्वाखाली अभियंता महावितरण कार्यालय अक्कलकोट यांना देण्यात आले. सक्तीचे स्मार्ट मिटर बसविणे त्वरीत थांबवा अन्यथा तीव्र आंदोलन छेडण्याच्या इशारा प्रहार संघटनेच्या वतीने देण्यात आला. यावेळी प्रहारचे तालुकाध्यक्ष अमर शिरसाट, निशांत निंबाळकर, सागर शिरसाट, शरणु किणीकर, रूषी गवंडी, बिरु सरवदे, गणेश पवार, समर्थ जाधव, फरान शेख उपस्थित होते.

### कोळी समाजातील गुणवंत विद्यार्थ्यांना आवाहन

**सोलापूर, दि. २ जून-**

बटगेरी सामाजिक प्रतिष्ठान या संस्थेच्या वतीने दरवर्षी कोळी समाज गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार आयोजित करण्यात येतो. त्यानुसार कोळी सामाजातील सन २०२५-२६ या शैक्षणिक वर्षात इयत्ता १० वी मध्ये ८०% व त्यापुढे गुण मिळवलेल्या तसेच इयत्ता १२ वी मध्ये ७० टक्के व त्यापुढे गुण घेतलेल्या विद्यार्थ्यांना तसेच क्रिडा व कला क्षेत्रात राज्यस्तरीय/राष्ट्रीय पातळीवर स्पर्धेत भाग घेतलेल्या खेळाडूंचा सत्कार आयोजित करण्यात आला आहे. त्यानुसार पात्र विद्यार्थी/खेळाडूंनी आपले मार्कलिस्ट छायांकित प्रत/प्रशस्तीपत्रकाची प्रत दि. १५ जूनपर्यंत संस्थेच्या खालील पदाधिकाऱ्यांना समक्ष भेटून अथवा व्हाटस् ॲपद्वारे पाठविण्याची विनंती संस्थेतर्फे करण्यात आली आहे. अधिक माहितीसाठी शंकर बटगेरी ८६६८३३२२३५, नागनाथ दोरनाळे ८६००४०४९५३, शिवलिंग कोळी मो. नं. ९०११०२६०६८ यांच्याशी संपर्क करावा ही विनंती.

## निधन वृत्त...

### चित्रकला शिक्षक अतुल खुने



**बार्शी, दि. २ जून-**

बार्शी येथील रहिवासी तथा आंतरभारती विद्यालय, कुर्डवाडी येथील चित्रकला शिक्षक कै. अतुल रामचंद्र खुने (वय ४६) यांचे ३१ मे रोजी पहाटे तीव्र हृदयविकाराच्या झटक्याने निधन झाले. ३० मे रोजी सकाळी चक्कर आल्याने त्यांना प्रथम जगदाळे मामा हॉस्पिटल येथे दाखल करण्यात आले. त्यानंतर पुढील उपचारासाठी सोलापूर येथील यशोधरा हॉस्पिटलमध्ये हलविण्यात आले होते. उपचार सुरु असतानाच ३१ मे रोजी पहाटे त्यांचे निधन झाले. त्यांच्या पश्चात वडील, पत्नी, दोन मुले असा परिवार आहे.

## शिवराज्याभिषेक सोहळ्यानिमित्त रायगडावर विविध कार्यक्रम

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. २ जून-**

अखिल भारतीय शिवराज्याभिषेक महोत्सव समिती दुर्गराज रायगड यांच्या वतीने युवराजसंभाजी छत्रपती महाराज यांच्या मार्गदर्शनाखाली छत्रपती शिवाजी महाराज राज्याभिषेकदिनानिमित्त दोन दिवसीय विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाचे प्रदेश प्रवक्ते महादेव तळेकर यांनी दिली.

दुर्गराज रायगड किल्ल्यावर दिनांक ५ व ६ जून रोजी प्रतिवर्षीप्रमाणे विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. ६ जून १६७४ साली छत्रपती शिवाजी महाराज यांनाराज्याभिषेक करण्यात आला होता. या ऐतिहासिक क्षणाची स्मृती सदैव राहावी या हेतूने दरवर्षी दुर्गराज रायगड वर शिवराज्याभिषेक सोहळ्याचे आयोजन करण्यात येते.




यामध्ये यंदा शुक्रवारी (दि.५ जून ) प्रथम राजमाता जिजाऊ यांच्या समाधीस अभिवादन, दुपारी चार वाजता युवराज संभाजी छत्रपती महाराज व युवराजकुमार शहाजीराजे छत्रपती यांचे स्वागत करून हजारो शिवभक्तांच्या समवेत गड चढण्यास प्रारंभ, यानंतर गड पूजन तसेच धार तलवारीची,युद्धकला महाराष्ट्राची या युद्ध कलेच्या प्रात्यक्षिकास प्रारंभ, सायंकाळी सातवाजता ढोल वादन, लेझीम प्रात्यक्षिक व वारकरी संप्रदायाकडून टाळ मृदुंगाचा गजर, रात्री आठवाजता जागर शिवशाहीरांचा, रात्री नऊ वाजता गडदेवता शिरकाई देवीचा गोंधळ, यानंतर वारकरी संप्रदायाकडून कीर्तन व भजन होणार आहे. त्यानंतर शनिवारी (दि.६ जून) शिवराज्याभिषेक दिवशी सकाळी सातवाजता युवराजकुमार शहाजीराजे यांचे हस्ते ध्वजपूजन व ध्वजारोहण, सकाळी साडेसातवाजता शाहिरी कार्यक्रम, साडेनऊ वाजता शिवछत्रपती महाराजांच्या पालखीचे राज्यसभेवर आगमन, सकाळी दहा वाजता युवराज संभाजी महाराज यांच्या हस्ते शिवछत्रपती महाराजांच्या उत्सव मूर्तीस अभिषेक तसेच राजदरबार वरील सिंहासनावरील मूर्तीस सुवर्णमुद्रांचा अभिषेक, त्यानंतर युवराज संभाजी महाराज उपस्थितांना मार्गदर्शन करणार आहेत. सकाळी साडेदहा वाजता सोहळा पालखीचा, स्वराज्याच्या ऐक्याचा या कार्यक्रमास प्रारंभ तर दुपारीसाडेबारा वाजता शिवछत्रपती महाराजांच्या समाधीस अभिवादन करून कार्यक्रमाची सांगताहोणार आहे.

या दोन दिवसीय कार्यक्रमास पंढरपूर शहर व तालुक्यातून हजारोशिवभक्त उपस्थित राहणार असून या सोहळ्याचा लाभ घ्यावा, असे आवाहन महादेव तळेकरयांनी केले आहे.

## पत्रकाराला मारहाण, जीवे मारण्याची धमकी

### अवैध दगड उत्खननाचे फोटो काढल्याचा राग

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. २ जून-**

बार्शीतील दैनिक पुण्यनगरीचे तालुका प्रतिनिधी (पत्रकार) यांनी अवैध दगड खाणकामाचे फोटो काढून तहसीलदार बार्शी यांना पाठवल्याच्या कारणावरुन घरासमोरच मारहाण करण्यात आल्याची गंभीर घटना घडली आहे. याप्रकरणी पत्रकार प्रशांत चंद्रकांत खराडे यांनी बार्शी शहर पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे.



तक्रारीनुसार, पत्रकार प्रशांत खराडे (वय ४६), हे बार्शी तालुका प्रतिनिधी म्हणून कार्यरत आहेत. रविवारी दि. ३१ मे दुपारी ४ वाजण्याच्या सुमारास ते त्यांच्या शिवाजी आखाडा येथील राहत्या घरी विश्रांती घेत असताना त्यांच्या पत्नीने घराबाहेर काही व्यक्ती आल्याची माहिती दिली.

दरवाजातून पाहिले असता घरासमोरील पत्राशेडमध्ये सचिन उर्फ बाळू जाधव व त्याच्यासोबत दोन अनोळखी व्यक्ती उभ्या असल्याचे दिसून आले. त्यानंतर सचिन उर्फ बाळू जाधव याने ‘तुम्ही सुनिल भराडिया यांच्या दगड खाणीच्या खोदकामाचे फोटो का काढले आणि ते तहसीलदारांना का पाठविले?’ असा जाब विचारत पत्रकार खराडे यांची गच्ची धरुन त्यांना मारहाण केली तसेच शिवीगाळ व जीवे मारण्याची धमकी दिल्याचा आरोप तक्रारीत करण्यात आला आहे.

दरम्यान, भांडण सोडविण्यासाठी आलेल्या त्यांच्या पत्नी रुपाली खराडे तसेच घरकामासाठी आलेल्या मीरा बगाडे (रा. लहुजी चौक, बार्शी) व सुनिता पेटणे (रा. टिळक चौक, बार्शी) यांनाही ‘तुमचा काही संबंध नाही’ असे म्हणत शिवीगाळ व दमदाटी करण्यात आल्याचे तक्रारीत नमूद करण्यात आले आहे. या प्रकरणी प्रशांत खराडे यांनी सचिन बाळू जाधव (रा. सुभाष नगर, बार्शी) याच्याविरुद्ध बार्शी शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला असून, पुढील तपास पोलीस प्रमोद केकाण करीत आहेत.



## चंडक प्रशालेत माजी विद्यार्थ्यांचा मेळावा

### ५० वर्षांनी एकत्र येत शाळेच्या दिवसांना दिला उजाळा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २ जून-**

बाळे येथील ज.रा.चंडक प्रशालेची १९७५-७६ सालची बॅच पन्नास वर्षांनी एकत्र येत शाळेच्या दिवसांना उजाळा दिला आहे. यावेळी माजी विद्यार्थ्यांनी जुन्या आठवणींना उजाळा दिला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रशालेचे माजी पर्यवेक्षक राजशेखर आडके होते तर प्रमुख पाहुणे महाराष्ट्र शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष सचिन ठोकळ, संस्थासचिवा शिल्पा ठोकळ, संचालक किशोर पाटील, बाळे प्रभागाचे नगरसेविका मंदाकिनी तोडकरी या होत्या.

प्रास्ताविक शाहीर सलगर यांनी केले. व्यासपीठावर प्रशालेचे माजी मुख्याध्यापक रंगनाथ अवताडे, माजी कलाशिक्षक हरिहर मोरे, प्रशालेचा विद्यार्थी तथा माजी न्यायाधीश नामदेव चव्हाण, वरिष्ठ लिपिक वाघचौरे, मधुकर मुळे आदी होते. प्रारंभी थोर स्वातंत्र्य सेनानी स्वर्गीय तुळशीदास जाधव व संस्थेच्या प्रेरणास्थानी असलेल्या स्वर्गीय निर्मला ठोकळ यांच्या प्रतिमेचे पूजन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी माजी विद्यार्थ्यांकडून प्रशालेस भेटवस्तू देण्यात आली. तसेच स्व. हरी गोविंद करंडे यांच्या स्मरणार्थ सर्वांना भेटवस्ते स्वरूपात श्री विठ्ठल-रुक्मिणीची मूर्ती देण्यात आली. कार्यक्रम यशस्वी करण्याकरिता कांचन पाटील, रामचंद्र दळवी, मल्लिनाथ विभूते, नागनाथ कांबळे, सुनील चांगभले आदींनी परिश्रम घेतले. सूत्रसंचालन निवृत्ती दळवी आभार रामचंद्र दळवी यांनी मानले.

## एमआयटी कॉलेज ऑफ रेल्वे इंजिनिअरिंग येथे एज्युकेशन समिट ऑन एआय शिक्षण उत्साहात

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. २ जून-**

एमआयटी कॉलेज ऑफ रेल्वे इंजिनिअरिंग अँड रिसर्च, बार्शी येथे कृत्रिम बुद्धिमत्ता (Artificial Intelligence - AI) आधारित शिक्षण प्रणाली, अध्यापनातील आधुनिक तंत्रज्ञान आणि भविष्यातील शैक्षणिक संधी याविषयी मार्गदर्शन करण्यासाठी एज्युकेशन समिट ऑन AI शिक्षण - २०२६ या विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

कार्यक्रमाच्या प्रारंभी संस्थेच्या संचालिका प्रा. स्वाती कराड-चाटे तसेच संस्थेच्या मार्गदर्शक व मेंटॉर प्रा. प्रभा कासलीवाल यांच्या प्रेरणादायी विचारांचा उल्लेख करण्यात आला. त्यांनी शिक्षण क्षेत्रात कृत्रिम बुद्धिमत्तेच्या प्रभावी वापराचे महत्त्व अधोरेखित केले.



प्राचार्य डॉ. मधुकर लेंगरे यांनी उपस्थितांना महाविद्यालयाची शैक्षणिक वाटचाल, विविध पदवी व पदविका अभ्यासक्रम, संशोधन उपक्रम, प्लेसमेंट सुविधा तसेच विद्यार्थ्यांसाठी उपलब्ध असलेल्या विविध शैक्षणिक संधींची माहिती दिली. त्यांनी AI युगात विद्यार्थ्यांनी तंत्रज्ञानाशी सुसंगत कौशल्ये विकसित करण्याचे आवाहन केले. सूत्रसंचालन प्रा. साक्षी पारखे यांनी केले. AI चे औद्योगिक व कार्यालयीन उपयोग पहिल्या सत्रात चैतल मगाडे यांनी MS Office मधील AI चे अनुप्रयोग या विषयावर मार्गदर्शन केले. त्उद्योग क्षेत्रातील एआयचे भविष्य दुसऱ्या सत्रात डॉ. प्रमोद रिडे यांनी औद्योगिक क्षेत्रातील एआयचे उपयोग आणि भविष्यातील संधी या विषयावर मार्गदर्शन केले. दैनंदिन अध्यापनातील AI ची भूमिका तिसऱ्या सत्रात प्रा. अजिंक्य लाडे यांनी दैनंदिन अध्यापनातील अख टूल्स या विषयावर मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे नियोजन डॉ. माने यांनी केले. प्रा. व्यंकटेश मुडे यांनी आभार मानले.

## अहिल्यादेवी होळकर यांच्या जयंतीनिमित्त कर्तृत्ववान व्यक्तींचा सत्कार

**तभा वृत्तसेवा**
**बार्शी, दि. २ जून-**

राजमाता आहिल्यादेवी सार्वजनिक वाचनालय व सकल धनगर समाज, बार्शी शहर व तालुका यांच्या संयुक्त विद्यमाने पुण्यश्लोक राजमाता अहिल्यादेवी होळकर यांचा ३०१ वा जयंती उत्सव व समाजातील कर्तृत्ववान व्यक्तीमत्वांचा सत्कार समारंभ उत्साहात पार पडला.

कार्यक्रमाचे उद्घाटन व सत्कार सोहळा माजी आमदार राजाभाऊ राऊत यांच्या हस्ते संपन्न झाला. यावेळी बोलताना राजाभाऊ राऊत म्हणाले, राजमाता अहिल्यादेवी म्हणजे न्याय, कर्तव्य आणि सेवाभावाचा आदर्श. त्यांनी राज्य सांभाळून काशी ते रामेश्वर घाट, विहिरी, मंदिरं बांधली. बार्शीच्या वाचनालयाने आणि सकल धनगर समाजाने कर्तृत्ववान व्यक्तींचा सत्कार ठेवून खऱ्या अर्थाने राजमातांना



श्रद्धांजली दिली. आपल्या समाजातील मुले-मुली शिक्षणात, प्रशासनात, खेळात पुढे जातील तेव्हाच त्यांना खरी श्रद्धांजली ठरेल.

कार्यक्रमात समाजातील जिल्हा परिषद अध्यक्ष दीपक वैद्य, डॉ. नवनाथ कसपटे, रणजित महानवर, अनिल बनसोडे, प्रशांत पैकेकर, अर्चना बजरंग नरुटे, संतोष कोयले, नरुटे, ॲड. पवन वायकुळे, मधुकर वैद्य, नाना सातपुते, आनंद सातपुते, समृद्धी समीर वायकुळे, रामेश्वर पाटील, डॉ. योगेश नरुटे आदी मान्यवरांचा विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केल्याबद्दल सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाला नानादेव फरांडे महाराज, तेजस्विनी कथले, विजय गरड, मीनाक्षी रोंगे, श्रीमंत थोरात, सचिन वायकुळे, रोहित पाटील, समीर मदनराव वायकुळे, ॲड. रविंद्र वैद्य, अमोल सुभाष वायकुळे, बजरंग नरुटे, ॲड. प्रशांत एडके, शितल पाटील, शशिकांत वायकुळे, आप्पा शेंडगे, राहुल भौरे, आमाराम वायकुळे, अजय वायकुळे, गणेश वायकुळे, राहूल शेंडगे, अक्षय खरात, ज्ञानेश्वर वायकुळे, विक्रम टकले, कालिदास देवकते, आप्पासाहेब हांडे, सुरेश होनमाने, स्वप्रिल वायकुळे, सागर वायकुळे, सौरभ देवकते, बबन गडदे, सूर्यकांत चोरमुले, प्रविण कसपटे, भास्कर करडे, दिपक खरात, विपुल शेंडगे, नितिन कोळेकर, विपुल होनमाने, विशाल वायकुळे, राजाभाऊ पांढरमिसे, प्रमोद वाघमोडे, नाना धायगुडे, अरुण येळे, माणिक हजारे, राजाभाऊ पैकेकर, दिलीप वायकुळे, सचिन शेंडगे, ऋषीकेश वायकुळे, शिवाजी हाके, राहुल खरात, सौरभ वायकुळे, बिरमल सातपुते, रोहित वायकुळे, तानाजी वाघमोडे, मदन वाघमोडे उपस्थित होते.

# पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी फिरवली सूत्रे

## सात उमेदवार राहिले निवडणूक रिंगणात

## खा. प्रणिती शिंदे यांनी घेतली भेट

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर. दि.२ जून-**

विधानपरिषद निवडणुकीच्या अनुषंगाने पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी सूत्रे फिरविल्याने विविध घडामोडी घडल्या. 'महायुती'प्रणित भारतीय जनता पार्टीचे राजेंद्र विठ्ठल राऊत यांच्यासह राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे केशव दौलतराव बनगर, अपक्ष नागेश हरिभाऊ अक्कलकोटे, जीवन उत्तमराव जानकर, धनंजय महादेव डिकोळे, महेश देवीदास साठे व रमेश नागनाथ बारसकर असे एकूण सात उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात राहिले आहेत. येत्या दोन दिवसात यापैकी कोण, कोण माघार घेणार? ही निवडणूक बिनविरोध करण्यासाठी भाजपाकडून कोणती राजकीय खेळी खेळणी जाणार? याकडे लक्ष लागले आहे.

सोलापूर विधानपरिषद निवडणुकीच्या नामनिर्देशनपत्र छाननी दरम्यान राजकीय घडामोडी पाहायला मिळाल्या. पंढरपूरचे नगरसेवक नागेश भोसले हे काँग्रेस पक्षाच्या उमेदवाराला सुचक होते. परंतु त्यांनीच यावर हरकत घेत सूचक म्हणून आपली सही नसल्याचे प्रतिज्ञापत्र सादर केल्याने काँग्रेसचा या निवडणुकीत गेम झाला. पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्यासाठी ही निवडणूक प्रतिष्ठेची मानली जात आहे. भाजपाकडून माजी आमदार राजेंद्र राऊत यांना उमेदवारी मिळाल्यानंतर पालकमंत्री गोरे,







आमदार सचिन कल्याणशेट्टी यांनी शिस्तबध्द नियोजन केल्याचे पाहायला मिळत आहे. या निवडणुकीत सोलापूरची जागा काँग्रेस पक्षाला सुटल्याने पंढरपूरचे माजी नगरसेवक आदित्य फत्तेपूरकर यांनी उमेदवारी अर्ज दाखल केला होता. या निवडणुकीसाठी सूचक म्हणून मतदारांपैकी दहा सदस्यांची सही लागते. फत्तेपुरकर यांच्या अर्जावर सूचक म्हणून सही केलेले पंढरपूरचे नगरसेवक नागेश भोसले भाजपाचे जिल्हाध्यक्ष शशिकांत चव्हाण, जिल्हा सरचिटणीस विकास वाघमारे यांच्यासमवेत जिल्हाधिकारी कार्यालयात दाखल होत फत्तेपुरकर यांच्या अर्जावरील सही माझी नाही, अशा आशयाचे प्रतिज्ञापत्र सादर केले.

दरम्यान, पालकमंत्री जयकुमार गोरे हे सकाळी ११ वाजता सोलापुरात दाखल झाले होते. त्यांनी हॉटेल बालाजी सरोवरमध्ये बसून सूत्रे हलवली. जिल्हाधिकारी कार्यालयात आमदार सचिन कल्याणशेट्टी, आमदार देवेंद्र कोठे हे उमेदवार राजेंद्र राऊत यांच्यासह ठाण मांडून होते. दुपारनंतर पालकमंत्री जयकुमार गोरे, माजी आमदार राम सातपुते, माजी आमदार दिलीप माने ही नेतेमंडळी शहाजी पवार यांच्या यमाई कंट्रक्शनमध्ये बसून या निवडणूक प्रक्रियेच्या हालचालींवर लक्ष ठेवले.

खासदार प्रणिती शिंदे यांनी जिल्हाधिकारी कार्यालयात येऊन निवडणूक निर्णय अधिकारी कार्तिकेयन यांची भेट घेतल्याचे दिसून आले. दुपारी दीड वाजल्यापासून काँग्रेसचे शहराध्यक्ष चेतन नरोटे हे उमेदवार फत्तेपूरकर हे रात्री उशिरापर्यंत जिल्हाधिकारी कार्यालयात ठिय्या मांडून होते. निवडणूक निर्णय अधिकारी कार्तिकेयन यांनी रात्री ८ वाजण्याच्या सुमारास निकाल दिला. रमेश बारसकर यांनी राजेंद्र राऊत यांच्या अर्जावर घेतलेल्या चारही हरकती फेटाळण्यात आल्या. काँग्रेस उमेदवार आदित्य फत्तेपूरकर यांच्या अर्जावर नागेश भोसले यांनी घेतलेली हरकत मान्य करुन फत्तेपुरकर यांचा अर्ज रद्द ठरविण्यात आला. न्यू राष्ट्रीय समाज पक्षाचे उमेदवार वाघमोडे यांचाही अर्ज बाद करण्यात आला.

## महत्वाचे...



### मित्राचा वाढदिवस साजरा करुन परतणारे दोन मित्र ट्रकच्या धडकेत ठार

**सोलापूर, दि.२ जून-**

आपल्या मित्राचा वाढदिवस साजरा करून दुचाकीवरून घराकडे परतणाऱ्या दोन मित्रांचा ट्रकच्या धडकेत मृत्यू झाल्याची दुर्घटना सोलापूर-विजापूर महामार्गावरील हत्तुर ब्रिजजवळ घडली. रहिमान मौला ढवळगी (वय-४८), राजू इमामसाब शेख (वय-३५, दोघेही रा.सलगर वस्ती, सोलापूर) अशी त्यांची नावे आहेत. रहिमान ढवळगी व राजू शेख हे




आपल्या मित्राचा वाढदिवस साजरा करण्यासाठी सोमवारी मध्यरात्री विजापूर रोडवरील एका हॉटेलमध्ये गेले होते. वाढदिवस साजरा करुन ते दोघे मंगळवारी पहाटेच्या सुमारास दुचाकीवरुन परतत असताना हत्तुर ब्रिजजवळ समोरुन येणाऱ्या एका ट्रकने त्यांच्या दुचाकी ला जोराची धडक दिली. यात रहिमान ढवळगी याचा जागीच ठार झाला. राजू शेख याचा शासकीय रुग्णालयात उपचारादरम्यान मृत्यू झाला. रहिमान ढवळगी हा कबड्डी खेळाडू होता. रोजगारासाठी तो पुण्यात राहायला गेला होता. बकरी ईदसाठी तो सोलापुरात आला होता. त्याच्या पश्चात आई, पत्नी, तीन मुली, एक मुलगा, चार भाऊ आणि तीन बहिणी, नातवंडे असा परिवार आहे. राजू शेख हा सोलापूर रेल्वे स्टेशनवर पाणी बाटली विक्री करण्याचे काम करायचा. त्याच्या पश्चात पत्नी, तीन मुले असा परिवार आहे.

### 'भाजपा'चा काम केल्याच्या कारणावरुन तरुणास लोखंडी रॉड व लाकडाने मारहाण

**सोलापूर, दि.२ जून-**

'भाजपा'चा काम केल्याच्या कारणावरुन एका तरुणाला लोखंडी रॉड व लाकडांनी मारहाण करण्यात आल्याची घटना मोहोळ येथे मंगळवार, दि.२ जून २०२६ रोजी दुपारी १२ वाजता घडली. अकबर आलम फरास (वय-३६, रा.मोहोळ) असे मारहाण झालेल्या तरुणाचे नाव आहे. अकबर फरास हा मंगळवारी घराजवळ असताना जिब्राईल बाबाजान शेख, अक्रम शेख, इमाम शेख, बिलाल शेख व इतर दोघा जणांनी मिळून मारहाण केली. मोहोळच्या आरोग्य केंद्रात प्राथमिक उपचार करुन सोलापुरातील शासकीय रुग्णालयात तो स्वतः दाखल झाला.

### ५८ वर्षीय व्यक्तीला दस्तुरखुद्द पत्नी, मुलाकडून मारहाण

**सोलापूर, दि.२ जून-**

घरगुती वादातून एका ५८ वर्षीय व्यक्तीला दस्तुरखुद्द त्याची पत्नी व मुलाने लाथाबुक्क्यांनी मारहाण केल्याची घटना मोहोळ तालुक्यातील एकुरगे गावात मंगळवार, दि.२ जून रोजी घडली. भुजंग विष्णू साठे असे मारहाण झालेल्या व्यक्तीचे नाव आहे. यात सर्व अंगाला मुकामार लागल्याने मोहोळच्या आरोग्य केंद्रात प्राथमिक उपचार करून सोलापुरातील शासकीय रुग्णालयात ते स्वतः दाखल झाले.

### पैशाच्या कारणावरुन वृध्दाला उसाने मारहाण

**सोलापूर, दि.२ जून-**

पैशाच्या कारणावरून एका वृध्द इसमाला उसाने मारहाण करण्यात आल्याची घटना पंढरपुरात चंद्रभागा नदीकाठी घडली. आसाराम रामजी भार्गजे (वय-६९, रा. वेळामांडवा, ता.पैठण, जि.संभाजीनगर) असे मारहाण झालेल्या वृध्दाचे नाव आहे. सोमवारी सकाळी १० वाजण्याच्या सुमारास ते चंद्रभागा नदीकाठी असताना एका अज्ञात इसमाने उसाने मारहाण केली. सर्व अंगाला मार लागल्याने पंढरपूरच्या आरोग्य केंद्रात प्राथमिक उपचार करुन सोलापुरातील शासकीय रुग्णालयात ते स्वतः दाखल झाले.

## अधिक मास चतुर्थीनिमित्त श्रीक्षेत्र पखालपूर गणपतीसाठी बसेस सोडण्यात येणार : ग्राहक पंचायत

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर,दि.२ मे -**

प्रत्येक चतुर्थी दिवशी श्रीक्षेत्र पखालपूर गणपतीच्या दर्शनासाठी बस सोडव्यात या अखिल भारतीय ग्राहक पंचायतीच्या मागणीनुसार संकष्टी चतुर्थी दिवशी पखालपूरसाठी बसेस सोडण्यात येतात अशी माहिती पंढरपूर आगार प्रमुख योगेश लिंगायत व जिल्हाध्यक्ष शशिकांत हरिदास यांनी दिली.

श्रीक्षेत्र पखालपूर येथे प्राचीन,जागृत असे गणपतीचे मंदिर आहे. नवसाला पावणारा गणपती अशी भाविकांची श्रध्दा आहे.त्याठिकाणी प्रत्येक महिन्यात चतुर्थी दिवशी दर्शनासाठी भाविकांची मोठी गर्दी असते. तीन वर्षातून एकदा येणारा ''अधिक मास चतुर्थी योग'' बुधवार दि.३ जून २०२६ रोजी आलेला आहे.त्यामुळे भाविकांची मोठी गर्दी होणार हे लक्षात घेऊन सकाळी सात पासून रात्रीपर्यंत श्रीक्षेत्र पखालपूर येथे जाण्या-येण्यासाठी जुन्या बस स्थानकापासून बससेवा सुरू करण्यात येत आहे तरी जाण्या-येण्यासाठी जेष्ठ नागरिक,महिला प्रवाशी भाविकांनी या सेवेचा लाभ घ्यावा असे आवाहन आगार प्रमुख योगेश लिंगायत,स्थानक प्रमुख अंकुश सरगर,वाहतुक नियंत्रक मोहन शिंदे,अप्पा अष्टेकर,ग्राहक पंचायतीचे सदस्यांनी केले आहे.

## छत्रपती शिवाजी नाईट कॉलेजच्या प्राचार्यपदी नितीन मोटे

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. २ जून-**

येथील छत्रपती शिवाजी नाईट कॉलेजच्या प्राचार्य पदी डॉ. नितीन मोटे यांची निवड करण्यात आली आहे. यापूर्वी डॉ.मोटे हे पुण्यातील वडगाव येथील शिवछत्रपती कला व वाणिज्य महाविद्यालयात उपप्राचार्य म्हणून काम केले असून एनएसएस कार्यक्रमाधिकारी आणि विभाग समन्वयक म्हणूनही त्यांनी सेवा बजावले आहे. तसेच सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठशी सलग्नित विविध महाविद्यालयात वक्ता म्हणून व्याख्याने दिली आहेत. नुकतीच त्यांची सोलापुरातील छत्रपती शिवाजी नाईट कॉलेजच्या प्राचार्य पदी निवड करण्यात आली आहे. त्याबद्दल त्यांचा संस्थेचे अध्यक्ष माजी महापौर मनोहर सपाटे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. यावेळी संस्थेचे सरचिटणीस महेश माने, छत्रपती शिवाजी प्रशालेच्या मुख्याध्यापिका सुजाता जुगदार, माजी प्राचार्य अरुण मित्रगोत्री सोलापूर जिल्हा कॉलेज कर्मचारी युनियनचे अध्यक्ष दत्ता भोसले, प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.





## माण नदीत पाणी सोडण्याच्या मागणीसाठी शेतकऱ्यांचा रास्ता रोको

**तभा वृत्तसेवा,**
**मंगळवेढा, दि. २ जून-**

मंगळवेढा तालुक्यातील माण नदीकाठच्या १६ गावांतील शेतकऱ्यांनी माण नदीत तातडीने पाणी सोडण्याच्या मागणीसाठी आज मल्लेवाडी चौकात रास्तारोको आंदोलन करत प्रशासनाचे लक्ष वेधले. भीषण उष्णतेमुळे पिके करपण्याच्या उंबरठ्यावर पोहोचल्याने शेतकऱ्यांनी हा तीव्र निषेध नोंदविला.

मारापूर, ढवळस, गुंजेगाव, धर्मगाव, मल्लेवाडीसह नदीकाठच्या अनेक गावांतील शेतकरी मोठ्या संख्येने आंदोलनात सहभागी झाले होते. सिंचनासाठी आवश्यक पाणी उपलब्ध करून देण्याची त्यांची प्रमुख मागणी होती. वाढत्या तापमानामुळे पिकांवर गंभीर परिणाम होत असून पाण्याअभावी मोठ्या प्रमाणात नुकसान होण्याची भीती निर्माण झाली आहे.

भैरवनाथ शुगर्सचे चेअरमन अनिल सावंत यांनी आंदोलनस्थळी उपस्थित राहून शेतकऱ्यांशी संवाद साधला. त्यांनी शेतकऱ्यांच्या मागण्या प्रशासनापर्यंत पोहोचवण्याचे आश्वासन दिले. शेतकऱ्यांचे प्रश्न हे संपूर्ण ग्रामीण अर्थव्यवस्थेशी संबंधित आहेत. प्रशासनाने माण नदीत पाणी सोडण्याबाबत तातडीने सकारात्मक निर्णय घ्यावा, असे त्यांनी सांगितले.

## युवकास पेट्रोल टाकून पेटवून दिल्याप्रकरणी आरोपीस जन्मठेप

**तभा वृत्तसेवा**
**बार्शी दि. जून**



दि. १ ऑक्टोबर २०१७ रोजी दुपारी १.४५ वा.चे सुमारास भालेकर पाटीजवळ देवगांव येथे फिर्यादी त्याचे मित्र अमजद मुलाणी, भिका मांजरे व आरोपी वसंत बाबू मांजरे रा. देवगांव, ता. बार्शी हे सर्व गप्पा मारत बसले असताना आरोपी तेथून निघून गेला व थोड्या वेळाने परत येऊन आरोपीने पाण्याच्या रिकाम्या बाटलीत पेट्रोल घेवून येऊन मागील भांडणाचा राग मनात धरुन फिर्यादीच्या डोक्यावर बाटलीतील पेट्रोल ओतून काडीपेटीची काडी ओढून अंगावर टाकून पेटवून दिले. त्यावेळी फिर्यादीस त्याचे मित्रानी उपचारासाठी बकरे हॉस्पीटल बार्शी येथे दाखल केले होते. उपचारादरम्यान यातील फिर्यादी धर्मराज विठठल मांजरे, वय ३० वर्षे हा दि. ५ ऑक्टोबर २०१७ रोजी मयत झाला. यातील आरोपीविरुध्द पांगरी पोलीस ठाणे येथे गु.र.नं.२५०/२०१७ नुसार भादंवि. कलम ३०७, ३०२, ३२४ अन्वये दि. ५ ऑक्टोबर २०१७ रोजी गुन्हा दाखल केला. यातील आरोपी वसंत बाबु मांजरे हा गुन्हा घडलेपासून सुमारे ४ वर्षे फरार होता. गोपनीय बातमीदारामार्फत माहिती घेवन सदर आरोपीस लोणंद पोलीस ठाणे हद्दीतील पाडळी, ता. खंडाळा, जि. सातारा येथून आरोपीस अटक करुन सबळ पुरावा गोळा करुन आरोपीविरुध्द सदर गुन्हयाचा प्रथम तपास सपोनि. डी. एस. ढोणे, पो. उपनिरीक्षक संतोष बडे यांनी करुन उर्वरीत तपास पो.उपनिरीक्षक अमोल ननवरे यांनी करुन न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले.

सरकार पक्षाच्यावतीने सदर गुन्हा शाबितीसाठी १६ साक्षीदार तपासण्यात आले. यातील फिर्यादीने मृत्यपूर्व दिलेला जबाब व प्रत्यक्षदर्शी साक्षीदार यांचे कोर्टासमोर झालेले जबाब व घटना एकमेकास पूरक होत्या. त्या अनुषंगाने वैद्यकीय अधिकारी यांची साक्ष महत्वाची ठरली. तपास अधिकारी यांनी तपासा दरम्यान गोळा केलेले पुरावे व नेत्र साक्षीदार यांचे जबाबाच्या अनुषंगाने मे. कोर्टासमोर आलेला पुरावा या सर्व बाबी सहा.सरकारी वकील ॲड. आनंद गोरे यांनी मे. कोर्टासमोर मांडला. कोर्ट पैरवी पोकॉ. १५०५ प्रभाकर गायकवाड यांनी साक्षीदार यांना कोर्टासमोर हजर ठेवून योग्य साक्ष देण्याबाबत वेळोवेळी मार्गदर्शन केले. सरकार पक्षाचेवतीने युक्तीवाद करण्यात आला की, आरोपीने फिर्यादीचे अंगावर पेट्रोल ओतून पेटवून जिवे ठार मारले. सदर बाब सरकार पक्षाचे युक्तीवादामध्ये निदर्शनास आणून देण्यात आली व सरकार पक्षाच्या युक्तीवादाला सहाय्यक म्हणून मा. ना. सर्वोच्च न्यायालय यांचे दाखले देण्यात आले.

सरकारी पक्षाचा युक्तीवाद व आरोपीविरुध्द आलेला पुरावा याचा विचार करता अप्पर जिल्हा व सत्र न्यायाधीश श्रीमती व्ही. एस. मलकालपट्टे रेड्डी मॅडम यांनी आरोपी यास भादंविक ३०२ अन्वये दोषी धरुन जन्मठेप व ५,०००/- रुपये दंड व दंड न भरल्यास ६ महिने कारावास अशी शिक्षा सुनावण्यात आली. सरकार पक्षातर्फे ॲड. आनंद गोरे व ॲड. शिवाजी होटकर यांनी काम पाहिले. सदर केसमध्ये अंजना कृष्णा व्ही. एस., सहा. पोलीस अधीक्षक, अति. कार्यभार बार्शी उपविभाग व साईनाथ सुरवसे, सहा. पोलीस निरीक्षक यांनी साक्षीदार यांना वेळोवेळी योग्य मार्गदर्शन केले. सदर गुन्हयाचा तपास सपोनि. डी.एस. ढोणे, पो.उपनिरीक्षक संतोष बडे, पो. उपनिरीक्षक अमोल ननवरे यांनी केलेला होता. तसेच कोर्ट पैरवी अधिकारी म्हणून पोकॉ. १५०५ प्रभाकर गायकवाड यांनी काम पाहिले.

# अदिला नाला रेड-ब्ल्यू लाईन रेखांकनाला स्थगिती द्या; अदिला नाला कृती समितीचा जनआंदोलनाचा इशारा

### या आहेत प्रमुख मागण्या

✻ रेड-ब्ल्यू लाईन प्रक्रियेला स्थगिती द्यावी ✻ नाला ६ मीटर रुंद, ५ मीटर खोल करण्याची मागणी ✻ अतिक्रमण हटवून नाल्याचा प्रवाह पूर्ववत करणे ✻ पूर्वीच्या बांधकाम परवानग्या कायम ठेवा ✻ रेखांकनाऐवजी नालेसफाई,खोलीकरण, रुंदीकरण करा

## रेखांकनामुळे सुमारे १२०० एकर जमीन, २०० गट, ७५० बांधकामे बाधित होण्याची भीती

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२ जून-**

सोलापूर महानगरपालिकेकडून आपत्ती व्यवस्थापन कायद्यांतर्गत प्रस्तावित करण्यात आलेल्या आदिला नाल्याच्या रेड लाईन व ब्ल्यू लाईन रेखांकनाला तीव्र विरोध दर्शविला आहे. या रेखांकनामुळे शेळगी ते बसवेश्वर नगर परिसरातील सुमारे १२०० एकर जमीन, २०० गट, ७५० बांधकामे तसेच हजारो प्लॉटधारक व घरमालक बाधित होणार असल्याने प्रस्तावित रेखांकन प्रक्रिया तातडीने स्थगित करावी अन्यथा पुढील १५ दिवसांत व्यापक जनआंदोलन छेडण्याचा इशारा अदिला नाला कृती समितीने पत्रकार परिषदेत दिला.



महानगरपालिकेने रेड-ब्ल्यू लाईन रेखांकनाऐवजी प्रथम आदिला नाल्याची संपूर्ण सफाई, खोलीकरण आणि रुंदीकरण करणे गरजेचे आहे. ज्या ठिकाणी अनधिकृत भराव, बेकायदेशीर पूल अथवा अतिक्रमणामुळे नाल्याचा प्रवाह रोखला गेला आहे, तेथील अडथळे हटवून नाल्याची मूळ वाट पूर्ववत करावी. २०२५ मध्ये हिप्परगा तलावातील अतिरिक्त पाण्याचा विसर्ग झाल्यानंतर नाल्यालगतच्या काही भागांत पाणी साचल्याचा संदर्भ देत समितीने प्रशासनावर दुर्लक्षाचा आरोप केला. पाटबंधारे विभागाने पूर्वसूचना देऊनही नालेसफाई व उपाययोजना न केल्याने ही परिस्थिती निर्माण झाल्याचा आरोप केला आहे.

रेड-ब्ल्यू लाईन रेखांकन लागू झाल्यास विकसित निवासी भाग, मंजूर लेआऊट, अपार्टमेंट प्रकल्प, प्लॉटिंग स्कीम आणि सुरू असलेल्या बांधकामांवर निर्बंध येतील, त्यामुळे सामान्य नागरिक, शेतकरी, बिल्डर आणि गुंतवणूकदारांचे मोठे आर्थिक नुकसान होईल, अशी भूमिका समितीने मांडली. सोलापूर शहर विकास आराखडा २०२४-२०४३ नुसार बांधकाम परवानग्या पूर्ववत कराव्यात, तसेच पूर्वी मंजूर केलेल्या परवानग्या कायम ठेवाव्यात, अशी मागणीही यावेळी करण्यात आली. खासदार, आमदार तसेच सुमारे ५० नगरसेवकांचा पाठिंबा असल्याचा दावा समितीने केला असून आंदोलनाची दिशा व तारीख लवकरच जाहीर केली जाणार असल्याचे सांगण्यात आले.

### हा परिसर होणार बाधित

शेळगी, बाळे, वसंत विहार, चौदा कमानी, ५४ मीटर रस्ता लगतचा परिसर, सी.एन.एस. हॉस्पिटल परिसर, देगाव, बसवेश्वर नगर आदी परिसरातील भागांतील निवासी व विकसित क्षेत्रांवर रेखांकनाचा परिणाम होण्याची शक्यता व्यक्त करण्यात आली आहे.

आदिला नाल्याची सोलापूर शहरातील प्रवाह लांबी सुमारे १२ कि.मी. असून, हिप्परगा तलावातील एकरुख उपसा सिंचन योजनेचे अतिरिक्त पाणी या नाल्यामार्गे सीना नदीत मिसळते. हा हंगामी नाला असून त्यामध्ये बारामाही पाणी वाहत नाही. २०२५ मध्ये हिप्परगा तलाव पूर्ण भरल्यानंतर अतिरिक्त पाण्याचा विसर्ग झाला; मात्र नाल्यातील अतिक्रमणे, बेकायदेशीर पूल, भराव तसेच कमी झालेली खोली व रुंदी यामुळे पाणी नाल्याबाहेर पसरले.

प्रत्यक्ष सर्वेक्षणात अनेक ठिकाणी नाल्याचे पात्र मूळ नकाशांपेक्षा अरुंद व उथळ झाल्याचे दिसून आले. तरीही या घटनेत कोणतीही जीवितहानी, पशुहानी किंवा मालमत्तेचे नुकसान झाले नाही. असे असताना प्रशासनाने याला पूरस्थितीचे स्वरूप देत आपत्ती व्यवस्थापन कायद्यांतर्गत रेड-ब्ल्यू लाईन रेखांकन प्रक्रिया सुरू केल्याचा आरोप कृती समितीने केला.

विकसित भागात रिस्ट्रीक्टेड झोन लागू झाल्यास हजारो नागरिक, प्लॉटधारक व बांधकाम प्रकल्प अडचणीत येतील. त्यामुळे प्रथम नाल्याची सफाई, अतिक्रमण हटविणे, पात्र ६ मीटर रुंद व ५ मीटर खोल करणे तसेच संरक्षण भिंत उभारणे आवश्यक आहे. त्यानंतर किमान दोन वर्षे पावसाळी परिस्थितीचे सर्वेक्षण करूनच पुढील निर्णय घ्यावा, अशी मागणी करण्यात आली आहे. या पत्रकार परिषदेस ॲड. शशांक साबळे, बाळासाहेब भोगडे, मल्लिनाथ मसरे, सुधीर थोबडे, प्रसाद गोडसे, राजशेखर विनसगी, सुदेश देशमुख, राजू अक्कलवाडे-पाटील, विद्याधर काटकर, तम्मा मसरे आदी उपस्थित होते.

हे पत्र मुद्रक व प्रकाशक दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून सोलापूर, धाराशिव, लातूर,संपूर्ण मराठवाडा तसेच पश्चिम महाराष्ट्र सातारा,सांगली,कोल्हापूर येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. ● प्रबंध संपादक : विवेक कृष्णाजी घळसासी. ● समूह मुख्य संपादक : दिलीप यशवंत पेठे.● मुख्य संपादक :प्रशांत वसंतराव माने दैनिक सोलापूर तरुण भारत रजि.नं.G2/RNP/SLP/D/32/2024-26.RNI Reg.No.46878/87. दूरध्वनी -संपादकीय-(०२१७)-२६००४९८ ● जाहिरात विभाग (०२१७)-२६००३९८. E-mail starunbharatgmail.com. ● Website:http://dainiktarunbharat/ या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

Mr. Dilip Shivmurthi Dulange is the publisher on behalf of the Company **Solapur Tarun Bharat Media Limited.**, and Daily Solapur Tarun Bharat. We print/publish and distribute these Editions like Solapur, Dharashiv, Latur Nanded, Parbhani, Hingoli, Jalna, and Beed from Register Address 19/20, Industrial Estate, Hotgi Road, Solapur – 413003. ● **Mr. Vivek Krishnaji Ghalsasi** - Dissertation Editor / ● **Mr. Dilip Yeshwant Pethe** - Group Chief Editor ● **Mr. Prashant Vasantrao Mane** - Chief Editor, Daily Solapur Tarun Bharat Postal Register No. G2/RNP/SLP/D32/2024-26. RNI Register No. 4687/87. Editorial Department Tel. No. – 0217-2600398) **Email ID starunbharat@gmail.com** and Advertisement Department Tel. No. – 0217-2600498, ● Website: **https://dainiktarunbharat.com/**, ● Epaper: **https://epaper.dainiktarunbharat.com/.** The Editors / Directors do not necessarily agree with the views expressed in the news and articles published in this issue. (responsible as per PRB Act)

# भाजपा अन् काँग्रेस पदाधिकारी भिडले; एकमेकांविरोधात जोरदार घोषणाबाजी

- विधानपरिषद निवडणुकीचा राडा
- छाननीच्या वेळी घडलेला प्रकार



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२ जून-**

विधानपरिषद निवडणुकीची रंगत दिवसागणिक वाढत आहे. मंगळवार, दि.२ जून २०२६ रोजी अशाच प्रकारे एक राडा झाला. 'महाविकास आघाडी'चे उमेदवार आदित्य फत्तेपुरकर यांच्या अर्जाच्या छाननीच्या वेळी भाजपा अन् काँग्रेसचे पदाधिकारी भिडले आणि एकमेकांविरोधात जोरदार घोषणाबाजी केली.

आदित्य फत्तेपुरकर यांच्या अर्जावर पंढरपूरचे माजी उपनगराध्यक्ष नागेश भोसले यांनी सूचक म्हणून सही केली होती. मात्र, छाननीच्या दरम्यान नाट्यमय घडामोडी घडल्या. नागेश भोसले यांनी माझी सही बनावट आहे अशा आशयाचे प्रतिज्ञापत्र जिल्हाधिकारी यांच्यासमोर सादर केले. त्यामुळे काँग्रेस पदाधिकाऱ्यांचा संताप अनावर झाला.

काँग्रेसच्या पदाधिकाऱ्यांनी भारतीय जनता पार्टीच्या पदाधिकाऱ्यांना घेराव घालत घोषणाबाजी केली. यावेळी भाजप नेत्यांनीही प्रत्युत्तरादाखल जोरदार घोषणाबाजी केली. पंढरपूरचे माजी उपनगराध्यक्ष नागेश भोसले यांनी जिल्हाधिकारी यांच्यासमोर सादर केलेल्या प्रतिज्ञापत्रामध्ये आदित्य फत्तेपूरकर यांना सूचक म्हणून सही केली नाही. माझ्या दोन्ही सह्या बनावट असल्याचे म्हटले आहे.

यावर जिल्हाधिकाऱ्यांनी एक वाजता सुनावणी घेतली. या सुनावणीमध्ये आपल्या प्रतिज्ञा पत्रावर नागेश भोसले ठाम राहिले. त्यामुळे आदित्य फत्तेपूरकर यांचा अर्ज बाद होणार असल्याची शक्यता आहे. यादरम्यान खासदार प्रणिती शिंदे या पदाधिकाऱ्यांसोबत जिल्हाधिकारी कार्यालयात दाखल झाल्या. त्यांनी जिल्हाधिकाऱ्यांची भेट घेतली. या कारस्थानामध्ये भाजप असल्याचा आरोप खा.प्रणिती शिंदे यांनी यावेळी केला.

नागेश भोसले यांच्यावर दबाव टाकून त्यांना प्रतिज्ञापत्र दाखल करायला लावले असल्याचा आरोपही खा.प्रणिती शिंदे यांनी यावेळी केला. तर इकडे काँग्रेस पदाधिकारी आणि कार्यकर्ते नागेश भोसले यांच्या विरोधात आक्रमक झाल्याचे दिसून आले. जिल्हाधिकारी कार्यालय येथे नागेश भोसले गद्दार है! अशा घोषणा दिल्या. काँग्रेसचे गणेश डोंगरे यांनी कार्यकर्त्यांसह भाजपच्या कार्यकर्त्यांशी भिडले. काही काळ घोषणाबाजी झाल्यानंतरही भाजपा पदाधिकाऱ्यांना माध्यमांशी काँग्रेस पदाधिकाऱ्यांनी बोलूही दिले नाही.

### अपक्ष भोसलेंचा अन् भाजपचा काय संबंध: चव्हाण

पंढरपूरचे माजी उपनगराध्यक्ष तथा नगरसेवक नागेश भोसले हे सध्या अपक्ष म्हणून निवडून आले आहेत. त्यांचा आणि भारतीय जनता पार्टीचा कसलाही संबंध नाही. त्यामुळे भाजपनेच हे कारस्थान केले, असा आरोप करत घोषणाबाजी करणे म्हणजे साऽऽप, साऽऽप म्हणून भुई बडविण्याचाच प्रकार काँग्रेसकडून सुरु आहे, असे भाजपाचे जिल्हाध्यक्ष शशिकांत चव्हाण यांनी सांगितले.

### खोटे ॲपेडेव्हिट दाखल : खा. शिंदे

महाविकास आघाडीच्या उमेदवारांच्या अर्जावर १० अधिकृत सह्या असताना नागेश भोसले यांच्यावर भाजपकडून दबाव आणून आणि धमक्या देवून खोटे ॲपेडेव्हिट दाखल करण्यास भाग पाडले असल्याचा आरोप खासदार प्रणिती शिंदे यांनी केला. जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक निर्णय अधिकारी यांनी खोलवर जावून चौकशी करावी आणि पारदर्शकपणे निकाल द्यावा, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

### कार्यकर्ते तुमचेच ऐकत नसतील तर...

आमदार देवेंद्र कोठे यांनी खासदार प्रणिती शिंदे यांच्यावर टीका करताना म्हणाले, लोकशाही पध्दतीने आणि घटनेने ठरवून दिलेल्या नियमांप्रमाणे विधान परिषद निवडणूक पार पडत आहे. गोंधळ घालण्यापेक्षा पराभव मान्य करायला शिका. काँग्रेसचे कार्यकर्ते तुमचेच ऐकत नसतील तर भाजपाला दोष का देता? केंद्रीय स्तरावरील नेत्यांच्या विरोधात बोलण्यापेक्षा आपला पक्ष सांभाळावा, असा उपरोधिक सल्ला द्यायलाही ते विसरले नाहीत.

## ▶▶ महत्वाचे...

### रिक्षा बाजूला काढण्याच्या कारणावरुन मारहाण; चौघांविरुध्द गुन्हा दाखल

**सोलापूर, दि.२ जून-**



रस्त्यात लावलेली रिक्षा बाजूला घेण्यास सांगितल्याच्या कारणावरुन एका ४३ वर्षीय व्यक्तीला चौघा जणांनी मिळून लाकडी बांबू व लाथाबुक्क्यांनी बेदम मारहाण केल्याची घटना कुमठा नाका भागातील भारत नगर येथे घडली. यात युसुफ मौला मुल्ला (रा.भारत नगर, कुमठा नाका, सोलापूर) हे जखमी झाले असून त्यांनी सदर बझार पोलिस ठाण्यात फिर्याद दिली. समीर सिद्दीकी, रजिया सिद्दीकी, सम्मी सिद्दीकी, जमीर सिद्दीकी (सर्वजण रा.भारत नगर, कुमठा नाका, सोलापूर) अशी गुन्हा दाखल करण्यात आलेल्या आरोपींची नावे आहेत. यातील फिर्यादी यांच्या घरासमोर सिमेंटची ट्रॉली आली होती. तेव्हा त्यांनी समीर सिद्दीकी याला रस्त्यातील रिक्षा काढण्यास सांगितले. याचा राग आल्याने वरील सर्व आरोपींनी एकत्र येऊन फिर्यादीला अश्लिल शिवीगाळ करत लाकडी बांबू व लाथाबुक्क्यांनी मारहाण केली. येथे बांधकाम करु देणार नाही, असे म्हणत जिवे मारण्याची धमकी दिली, असे फिर्यादीत नमूद आहे.

---

### पंजवानी मार्केट आवारात सुरक्षा रक्षकाला मारहाण

**सोलापूर, दि.२ जून-**

अक्कलकोट रोडवरील पंजवानी मार्केट येथील एका दुकानाच्या एका सुरक्षा रक्षकाला अज्ञात इसमाने मारहाण करून दात पाडल्याची घटना घडली. बसवराज शिवपुत्र इंडे (रा.अंबिका नगर, सोलापूर) हे जखमी झाले असून त्यांनी एमआयडीसी पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. यातील फिर्यादी पंजवानी मार्केट मधील अमित ट्रेडर्स दुकानांसाठी सुरक्षा रक्षक म्हणून काम करतात. ते नेहमीप्रमाणे रविवारी रात्री १० वाजण्याच्या सुमारास पंजवानी मार्केट कंपाउंडमध्ये बसलेले असताना एक अनोळखी व्यक्ती येवून फिर्यादी शेजारी बसला.तेव्हा फिर्यादीने त्यास तु रात्री आत कसा आला? असे विचारले असता त्या इसमाने फिर्यादीस शिवीगाळ करुन मारहाण केली. फिर्यादीचा एक दात तुटला. तसेच सर्वांगाला मुकामार लागल्याचे फिर्यादीत म्हटले आहे.

---

### विवाहितेस माहेरी हाकलून दिले, सासरच्या पाच जणांवर गुन्हा दाखल

**सोलापूर, दि.२ जून-**

लग्नात झालेला दहा लाख रुपये खर्च तुझ्या आई वडिलांकडुन घेवून ये असे म्हणून एका विवाहितेचा शारीरीक व मानसीक छळ करत माहेरी हाकलून दिल्याप्रकरणी सासरच्या पाच जणांविरुध्द सदर बझार पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. पती राजेश जगले, सासू मारिया जगले, नणंद सुनीता जगले, यशोदा जगले आणि सुजाता जॉन कुमार अशी गुन्हा दाखल झालेल्यांची नावे आहेत. याबाबत मेरी राजेश जगले (वय-२९, रा.हुडको कॉलनी, सोलापूर) यांनी दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे की, दि.३० डिसेंबर २०२५ ते दि. १९ मार्च २०२६ यादरम्यान सासरी नांदत असताना वरील आरोपींनी मिळुन लग्नात झालेला दहा लाख रुपये खर्च तुझ्या आई वडिलांकडुन घेवून ये असे म्हणून शारीरीक व मानसिक त्रास दिले. आणि माहेरी हाकलून दिले.

# १२ गावांतील नागरिकांना मिळणार लवकरच प्रॉपर्टी कार्ड

## नगरभूमापन मालमत्ता हक्कांना अधिकृत स्वरुप देणारी मोहीम : महापौर कोंड्याल

### नगरभूमापन मोहिमेच्या कामाचा आढावा



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२ जून-**

महानगरपालिका हद्दीत समाविष्ट झालेल्या १२ गावांतील नागरिकांना लवकरच प्रॉपर्टी कार्ड अर्थात मालमत्ता पत्रक मिळणार आहे. दरम्यान, महापालिकेच्या कॉन्सिल हॉलमध्ये नगरभूमापन मोहिमेच्या कामाचा आढावा घेण्यात आला. नगरभूमापन मालमत्ता हक्कांना अधिकृत स्वरुप देणारी मोहीम आहे, असे महापौर विनायक कोंड्याल यांनी सांगितले.

महापौर विनायक कोंड्याल यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीस उपमहापौर ज्ञानेश्वरी देवकर, सभागृह नेते नरेंद्र काळे, स्थायी समिती सभापती रंजीता चाकोते, आयुक्त डॉ.सचिन ओम्बासे, अधीक्षक भूमी अभिलेख दादासाहेब घोडके, उपअधीक्षक सचिन पवार, मॅपेक्स एजन्सीचे प्रतिनिधी सचिन कांबळे, सहायक संचालक नगर रचना समीर शितोळे, कार्यकारी अभियंता नीलकंठ मठपती, उपअभियंता आनंद जोशी आदी उपस्थित होते.

बैठकीत नगरभूमापन प्रक्रियेचे सादरीकरण करण्यात आले. उपअधीक्षक सचिन पवार यांनी सर्वेक्षणाची उद्दिष्टे, नागरिकांना होणारे फायदे, आवश्यक कागदपत्रे आणि पुढील कार्यपद्धती याबाबत माहिती दिली. सर्वेक्षणातून तयार होणाऱ्या डिजिटल नकाशांमुळे नागरिकांना ऑनलाइन प्रॉपर्टी कार्ड उपलब्ध होणार असून मालमत्तेसंबंधी वाद कमी होण्यास मदत होणार आहे. तसेच प्रॉपर्टी कार्ड व सनद मिळाल्यानंतर बँक कर्ज, आर्थिक व्यवहार आणि विविध शासकीय योजनांचा लाभ घेणे सुलभ होणार आहे.

आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांनी नगरभूमापन विभागाला महापालिकेच्या नगररचना व मालमत्ता विभागामार्फत समन्वय अधिकारी उपलब्ध करून दिले जातील, असे सांगत सर्वेक्षणाचे काम प्रभावीपणे पूर्ण करण्याचे निर्देश दिले. यावेळी नगरसेवकद्वय अनंत जाधव, शिवानंद पाटील, नारायण बनसोडे, प्रशांत पल्ली, नगरसेविका अर्चना वडनाल आदींनी सूचना मांडल्या.

### ५ कोटी रुपयांचा निधी वर्ग

या मोहिमेसाठी महापालिकेने यापूर्वीच ५ कोटी रुपयांचा निधी नगरभूमापन विभागाकडे वर्ग केला असून, अत्याधुनिक ड्रोन व जीआयएस तंत्रज्ञानाच्या साहाय्याने सर्वेक्षणाचे काम सुरु आहे.

### लागणारी आवश्यक कागदपत्रे

नगरभूमापन मोहिमेसाठी ७/१२ उतारा, महापालिका कर पावती, खरेदीखत, सक्षम प्राधिकाऱ्यांचे आदेश, डिम्ड कन्व्हेयन्स, सोसायटी नोंदणी प्रमाणपत्र, मंजूर बांधकाम नकाशा, वारसा हक्क प्रमाणपत्र, वीज बिल, पाणीपट्टी व आधार कार्ड आदी कागदपत्रे आवश्यक असल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले आहे.



# सोलापूरचे सीईओ कुशल जैन नांदेड दौऱ्यावर

### समृध्द पंचायत राज अभियानाची पडताळणी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२ जून-**

मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियानांतर्गत राज्यभर सुरू असलेल्या मूल्यमापन प्रक्रियेत सोलापूर जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कुशल जैन यांच्या नेतृत्वाखालील समितीने नांदेड जिल्ह्यातील विविध गावांना भेट देत विकासकामांची सखोल तपासणी केली. ग्रामविकास, स्वच्छता, शिक्षण, आरोग्य आणि पायाभूत सुविधांच्या अंमलबजावणीचा प्रत्यक्ष आढावा घेत समितीने गावांचे मूल्यमापन केले.

मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियानांतर्गत जिल्हास्तरीय मूल्यमापन समितीमार्फत राज्यातील ग्रामपंचायतींची पाहणी सुरु आहे. सोलापूर जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कुशल जैन, उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रामपंचायत) सूर्यकांत भुजबळ आणि जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ.सतीश कोपूरवाड यांची समिती १ जूनपासून नांदेड जिल्हा दौऱ्यावर आहे.


या दौऱ्यात समितीने मुखेड तालुक्यातील कामळजा तसेच देगलूर तालुक्यातील अंतापूर, येरगी आणि अंबुलगा या गावांना भेटी दिल्या. ग्राम पंचायतींनी अभियानांतर्गत राबविलेली विकासकामे, त्यांची प्रत्यक्ष स्थिती आणि त्यासंबंधी उपलब्ध कागदपत्रांची पडताळणी करून गावांचे मूल्यमापन करण्यात आले.

समितीने ग्रामपंचायत कार्यालय, जिल्हा परिषद शाळा, अंगणवाडी केंद्र, पाणीपुरवठा योजना, घनकचरा व्यवस्थापन प्रकल्प, आरोग्य केंद्र तसेच गाव परिसराची पाहणी केली. विविध योजनांची प्रभावी अंमलबजावणी आणि नागरिकांच्या सहभागाचीही माहिती घेतली.

# देशमुख मालकांच्या कट्टर समर्थकाचा शिवसेना शिंदे गटात प्रवेश निश्चित

### सोलापूरच्या राजकारणात उलथापालथ सुरुच

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२ जून-**



भाजपाचे आमदार तथा देशमुख म्हणून परिचित असलेले विजयकुमार देशमुख यांचे कट्टर समर्थक राजाभाऊ आलुरे यांचा शिवसेना शिंदे गटात प्रवेश निश्चित असल्याचे सांगण्यात येते. त्यामुळे सोलापूरच्या राजकारणात नवे समीकरण जुळुन येणार असल्याची चर्चा रंगतदार ठरत आहे.

शिवसेनेचे सोलापूर जिल्हा संपर्कप्रमुख तथा खासदार धैर्यशील माने यांच्या कोल्हापूर येथील निवासस्थानी आलुरे यांनी आपल्या समर्थकांसह भेट घेतली. २०२६ च्या सोलापूर महानगरपालिका निवडणुकीत अपक्ष उमेदवार म्हणून निवडणूक लढविली होती. मर्यादित पक्षीय पाठबळ असतानाही त्यांनी ५ हजार ३०० मते मिळवून आपली स्वतंत्र राजकीय ताकद सिद्ध केली होती. या मताधिक्यामुळे स्थानिक राजकारणात त्यांचे वजन वाढले. दरम्यान, आलुरे यांच्या पक्षप्रवेशाबाबत अद्याप अधिकृत घोषणा करण्यात आली नाही. येत्या काही दिवसांत शिवसेनेच्या वरिष्ठ नेत्यांच्या उपस्थितीत प्रवेश सोहळा पार पडण्याची शक्यता राजकीय वतुर्ळातून व्यक्त केली जात आहे.

# 'भामसं'च्या प्रदेशाध्यक्षपदी सुधांशू रानडे

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२ जून-**



भामसं अर्थात भारतीय मजदूर संघाच्या प्रदेशाध्यक्षपदी सुधांशू सुभाष रानडे यांची निवड करण्यात आली. पुणे येथे झालेल्या एका बैठकीत ही निवड करण्यात आली सुधांशू रानडे हे व्यावसायिकदृष्ट्या मेकॅनिकल इंजिनिअर असून सध्या सोलापूर जनता सहकारी बँकेत अधिकारी म्हणून कार्यरत आहेत.

बालपणापासून राष्ट्रीय स्वयंसेवक ते संघाचे स्वयंसेवक आहेत. सन १९९७ ते १९९९ या कालावधीत गोवा येथे संघ प्रचारक म्हणून कार्य केले आहे. भामसंशी ते गेली २३ जोडले गेले. भामसंचे सोलापूर जिल्हा सचिव, सहकारी बँक कर्मचारी संघाचे सरचिटणीस यांसारख्या जबाबदाऱ्या पार पाडल्या. मार्च २०२४ मध्ये पंढरपूर येथे झालेल्या भारतीय मजदूर संघाच्या महाराष्ट्र प्रदेश अधिवेशनापासून ते प्रदेश उपाध्यक्ष म्हणून कार्यरत होते. पुणे येथे झालेल्या बैठकीत सह क्षेत्र संघटन मंत्री मोहन येणुरे यांनी अध्यक्षपदासाठी सुधांशू रानडे यांच्या नावाची घोषणा केली.

जगन्नाथ पुरी येथे झालेल्या भाम संघाच्या राष्ट्रीय अधिवेशनात महाराष्ट्र प्रदेशाचे विद्यमान अध्यक्ष अनिल ढुमणे यांची राष्ट्रीय सचिवपदी निवड करण्यात आली. भारतीय मजदूर संघ महाराष्ट्र प्रदेशाचे महामंत्री किरण मिलगीर यांनी मार्गदर्शन केले. याप्रसंगी मिडीया प्रभारी सागर पवार यांच्यासह अन्य पदाधिकारी उपस्थित होते. भारतीय मजदूर संघ महाराष्ट्र प्रदेशाचे महामंत्री किरण मिलगीर यांनी मार्गदर्शन केले. याप्रसंगी मिडीया प्रभारी सागर पवार यांच्यासह अन्य पदाधिकारी उपस्थित होते.

नूतन प्रदेशाध्यक्ष सुधांशू रानडे म्हणाले, भामसंचा राष्ट्रवादी व कामगारहितवादी विचार तळागाळातील पोहोचवत कामगारांना न्याय हक्क मिळवून देणार आहे.

# दक्षिण सोलापूर पंचायत समिती उपसभापतींच्या जात प्रमाणपत्रावर प्रश्नचिन्ह

## ● ओबीसी प्रवर्गातील 'वाणी' जात प्रमाणपत्र अवैध ठरल्याची चर्चा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२ जून-**

दक्षिण सोलापूर पंचायत समितीच्या उपसभापती वर्षा सोमनाथ पटणे (उर्फ वर्षा शिवाजी कोनाळे) यांच्या जात प्रमाणपत्रासंदर्भात महत्त्वपूर्ण घडामोड समोर आल्याने राजकीय आणि प्रशासकीय वतुर्ळात चर्चेला उधाण आले आहे. धाराशिव जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समितीने त्यांच्या ओबीसी प्रवर्गातील जात प्रमाणपत्राची पडताळणी करत ते अवैध असल्याचा निष्कर्ष नोंदवल्याची माहिती पुढे आली असून, संबंधित प्रमाणपत्र रद्द करून जप्त करण्याबाबत कारवाईचे निर्देश दिल्याची चर्चा सुरु आहे.

होटगी स्टेशन परिसरातील सामाजिक कार्यकर्ते मिलिंद मुळे यांनी यासंदर्भात तक्रार दाखल केली होती. या तक्रारीनंतर जात प्रमाणपत्र पडताळणी समितीने प्रकरणाची सखोल चौकशी हाती घेतली. निवडणूक अर्जासोबत वर्षा शिवाजी कोनाळे यांनी राज्य शासनाच्या इतर मागासवर्गीय (ओबीसी) यादीतील अनुक्रमांक १९० वरील 'वाणी' जातीचे प्रमाणपत्र सादर केले होते. संबंधित प्रमाणपत्राची सत्यता तपासण्यासाठी समितीने विविध शासकीय अभिलेख, नोंदी आणि कागदपत्रांची पडताळणी केली.

या प्रकरणात समितीने दोन वेळा सुनावणी निश्चित केल्याचे समजते. मात्र, दोन्ही वेळा संबंधितांकडून उपस्थिती राहिली नसल्याची नोंद समितीसमोर असल्याचे सांगितले जात आहे. त्यामुळे उपलब्ध पुरावे आणि शासकीय नोंदींच्या आधारे समितीने पुढील कार्यवाही सुरु ठेवली. तपासादरम्यान प्रमाणपत्रावरील डिजिटल स्वाक्षरी, कार्यालयीन शिक्का आणि इतर तांत्रिक बाबींची बारकाईने छाननी करण्यात आली. यावेळी संबंधित उपविभागीय अधिकाऱ्यांनी हे प्रमाणपत्र त्यांच्या कार्यालयातून निर्गमित झाले नसल्याचे लेखी स्वरूपात कळिवल्याची माहिती समोर आली आहे. तसेच प्रमाणपत्रावरील बारकोडची पडताळणी केल्यानंतर त्यासंबंधित माहिती उपलब्ध होत नसल्याचेही निदर्शनास आल्याचे सूत्रांनी सांगितले.



### २ हजार १४३ मतांच्या फरकाने विजय

बोरामणी पंचायत समिती गणातून झालेल्या निवडणुकीत वर्षा पटणे यांनी २ हजार १४३ मतांच्या फरकाने विजय मिळवला होता. त्यांना ६ हजार ३०७ तर त्यांच्या प्रतिस्पर्धी उमेदवारांना ४ हजार १६४ मते मिळाली होती. या विजयानंतर त्यांची दक्षिण सोलापूर पंचायत समितीच्या उपसभापतीपदी निवड झाली होती. आता जात प्रमाणपत्र पडताळणी समितीच्या निर्णयानंतर त्यांच्या पदावर, सदस्यत्वावर तसेच पुढील प्रशासकीय प्रक्रियेवर काय परिणाम होणार? या प्रकरणातील अधिकृत आदेश आणि संबंधित यंत्रणांकडून होणाऱ्या पुढील कारवाईकडे राजकीय वतुर्ळासह सर्वसामान्यांचे लक्ष लागले आहे.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## ज्ञानामृत आनंदलहरी - १४६०

**देव पूजेवरी ठेवूनियां मन।**
**पाषाणा पाषाण पूजी लोभें।।**

माणूस जवळपास सर्वच कार्ये त्यातून कांही ना कांही तर प्राप्ती व्हावी म्हणून करीत असतो. बोटावर मोजण्याइतके लोक नि:स्वार्थ भावनेने व फलेच्छारहित कार्य करीत असल्याचे पहायला मिळते. संसारात अडकलेल्या जीवाला फळाची अपेक्षा न करता कर्म करणे आवडत नाही. फलेच्छारहित कर्म म्हणजे निव्वळ वेडपणाच होय, असे म्हणणारे आहेत. केलेल्या कार्यातून फलप्राप्ती नसेल तर कर्मच का करायचे? असा प्रश्नही अनेकजण करतात. कर्मात स्वत:ला गुंतवायचे नाही व फळाची अपेक्षाही करायची नाही, हे मानवाच्या बुध्दीला पटत नाही. पण संतांनी तर कर्मातून मी आणि फलेच्छा यांना अलिप्त करण्याचा सल्ला दिला आहे. माणूस जेव्हा कर्मात मीला व फलेच्छेला स्थान देतो तेव्हा त्यातून स्वार्थ, ईर्षा, द्वेष, अहंकार, मत्सर असे शत्रु निर्माण होतात. म्हणून आपल्या



वाट्याला आलेले कर्म विहित पध्दतीने पार पाडायचे एवढाच हेतू कर्म कर्त्याने ठेवावा, असे संत सांगतात. आपण या-त्या कर्माचे कर्ते आहोत व त्यातून फलप्राप्ती झालीच पाहिजे, ही भावना जोपासू नये. संताचे हे म्हणणे खरे असले तरीही, माणूस याकडे हेतूपूर्वक दूर्लक्ष करतो. साक्षात भगवंतांची पूजा-पाठ करायची म्हटले तरी त्यातही मी व फलेच्छेला माणूस गुंडाळतो. ईश्वरभक्तीतून, पूजा-पाठातून कांहीतरी लाभ झालाच पाहिजे, अशी तो अपेक्षा करतो. आशेपोटी, लोभापोटी भक्ती करणाऱ्या अशा व्यावहारिकाबद्दल बोलतांना जगद्गुरु तुकाराम महाराज म्हणतात, देवपूजेवरी ठेवूनियां मन। पाषाणा पाषाण पूजी लोभें।।

लोभापोटी ज्या देवतेची माणूस भक्ती करतो, तो देवही दगड व भक्ती करणाराही दगड होय, असे महाराजांनी म्हटले आहे. मुळात आपण दगडालाच विशिष्ट आकार करुन देवपण देतो. या दगडात नि:स्वार्थ भाव, प्रेम ओतले तरच तो देव, अन्यथा व्यावहारिक भाव ओतला तर तो दगडच होय. माणूस जर माणुसकी न जोपासला केवळ व्यावहारिक दृष्टीकोनातून पूजा-पाठ करीत असेल तर तो भक्त नसून तोही दगडच आहे. व्यावहारिक भक्ती असेल तेथे पुजणाराही दगड व ज्याची पूजा केली जाते तोही दगड असे तुकोब्बाजींनी स्पष्ट केले आहे. जो माणूस साक्षात भगवंताशी व्यवहार करतो,तो प्राणीमात्रांना व्यवहाराशिवाय सोडणारच नाही. अशा माणसांकडून नि:स्वार्थ प्रेमाची, कार्याची अपेक्षा करणे चुकीचे असते. आपण माणूस म्हणून जन्माला आलो आहोत. आपणाला देव किंवा संत म्हणून जगता आले नाही. तरी चालेल पण किमान माणूस म्हणून तरी जगता आले पाहिजे. कोणत्याही परिस्थितीत आपण दगड म्हणून जगता कामा नये. माणसाने व्यवहार करुच नये, असे नाही. निती-नियमाला अनुसरुन व्यवहार करायला हवा. व्यवहार हा मानवी जीवनाचा अविभाज्य भाग आहे. तुकोबाजींच्या आजच्या अभंगातून आपल्या लक्षात येते की, स्वार्थ, लोभ हा वाईट असतो. ज्या ठिकाणी स्वार्थाचा, लोभाचा शिरकाव होतो, तेथून चांगलेपणा नष्ट होतो. आपल्यात दगडपणाचा शिरकाव होऊ द्यायचा नसेल तर आपण स्वार्थ, लोभ, व्यावहारिक भक्तीला आपल्यात स्थान देता कामा नये. हे ज्याला जमले त्याच्याकडे आनंदलहरी वाढणारच असतात. जय राम कृष्ण हरी।

**- ज्ञानदास डॉ. विजयकुमार फड**
**मो. ९४२२२१६४४८**

## सुप्रभात

### आजचा दिवस

**वार : बुधवार,**
**दि. ३ जून २०२६**
**विक्रम संवत् २०८३ ।**
**शके -१९४८**
**संवत्सर - पराभव**
**मास - अधिक, कृ. तृतीया**
**ऋतु - वसंत ।**
**नक्षत्र- पूर्वाषाढा (२४.५९)**
**योग - शुभ (०८.११)**
**करण - बव (१०.२७)**
**राहू काल : बुधवार**
**स. २.३० ते ३.००**

**दिनविशेष :**
**१९५३: राणी एलिझाबेथ (दुसरी) यांचा**
**१८१८: मराठा साम्राज्याचा अस्त होऊन शेवटचे पेशवे बाजीराव (दुसरे) हे मध्य प्रदेशातील असीरगढजवळ जनरल माल्कम यांच्या स्वाधीन झाले**
**१९१६: महर्षी धोंडो केशव कर्वे यांनी भारतातील पहिल्या महिला विद्यापीठाची स्थापना केली**
**१९४७: भारताच्या फाळणीसाठी 'माउंटबॅटन योजना' जाहीर करण्यात आली**

# शेतकरी कर्जमाफी; सोलापुरातील शेतकरी आनंदी


- 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमाफी योजना' मंजूर
- राज्यातील ५६ लाख शेतकऱ्यांना २ लाखांपर्यंत कर्जमाफीचा दिलासा
- ३० सप्टेंबर २०२५ पूर्वीच्या कर्जदारांना लाभ मिळण्याची शक्यता

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर दि.२ जून-**

राज्यातील लाखो शेतकऱ्यांसाठी मोठा दिलासा देणारा निर्णय सरकारने घेतल्याची माहिती समोर आली आहे. मंत्रिमंडळाच्या बैठकीत दोन लाख रुपयांपर्यंतच्या पीककर्ज माफीला तत्त्वतः मंजुरी देण्यात आल्याने राज्यातील सुमारे ५६ लाख शेतकऱ्यांना मोठा आर्थिक आधार मिळणार आहे. या निर्णयामुळे कर्जाच्या ओझ्याखाली दबलेल्या शेतकऱ्यांना दिलासा मिळणार असल्याने आनंद व्यक्त होत आहे.

प्राप्त माहितीनुसार, 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमाफी योजना' या नावाने ही योजना राबविण्यात येणार असून यासाठी सुमारे ३६ हजार कोटी रुपयांचा निधी खर्च होण्याचा अंदाज आहे. राज्यातील राष्ट्रीयीकृत, सहकारी, ग्रामीण आणि खासगी बँकांकडून घेतलेल्या कर्जाचा या योजनेत समावेश होण्याची शक्यता आहे. विधान परिषद निवडणुकीच्या आचारसंहितेमुळे अधिकृत घोषणा अद्याप झालेली नसली तरी मंत्रिमंडळ स्तरावर या निर्णयाला मंजुरी मिळाल्याची माहिती प्राप्त झाली आहे.





### कोणाला मिळू शकतो लाभ?

- दोन लाख रुपयांपर्यंतच्या कर्जाचा समावेश होण्याची शक्यता
- ३० सप्टेंबर २०२५ पूर्वीची पात्र कर्जखाती विचारात घेतली जाणार
- राष्ट्रीयीकृत, सहकारी, ग्रामीण आणि खासगी बँकांच्या कर्जदारांचा समावेश
- राज्यातील अंदाजे ५६ लाख शेतकरी लाभार्थी
- योजनेसाठी सुमारे ३६ हजार कोटी रुपयांचा निधी प्रस्तावित
- अंतिम पात्रता निकष शासन निर्णयानंतर स्पष्ट होणार

### अंमलबजावणीच्या तारीखांकडे शेतकऱ्यांचे लक्ष

राज्य सरकारकडून अधिकृत शासन निर्णय आणि अंमलबजावणीची तारीख जाहीर होण्याकडे शेतकरी वर्गाचे लक्ष लागले आहे.या संदर्भातील अधिकृत शासन निर्णय, मंत्रिमंडळाचा अधिकृत ठराव किंवा शासन परिपत्रक जाहीर झाल्यानंतरच कर्जमाफीच्या अटी, लाभार्थी आणि अंमलबजावणीची प्रक्रिया निश्चित मानली जाणार आहे.

शेतकऱ्यांच्या खात्यात कर्जमाफीची रक्कम कशी आणि कोणत्या प्रक्रियेद्वारे जमा करता येईल, याबाबतही बैठकीत चर्चा झाल्याचे सांगितले जाते.

प्राथमिक माहितीनुसार, ३० सप्टेंबर २०२५ पर्यंतची थकीत अथवा पात्र कर्जखाती या योजनेसाठी विचारात घेतली जाणार आहेत. तसेच पूर्वीच्या कर्जमाफी योजनांप्रमाणेच पात्रता निकष लागू राहण्याची शक्यता आहे. त्यामुळे अंतिम शासन निर्णय आणि अधिकृत मार्गदर्शक सूचना जाहीर झाल्यानंतरच लाभार्थ्यांची अचूक संख्या आणि अटी स्पष्ट होणार आहेत.

राज्यातील शेतकरी आर्थिक संकट, नैसर्गिक आपत्ती आणि उत्पादन खर्चातील वाढ अशा अनेक अडचणींना सामोरे जात आहेत. अशा परिस्थितीत कर्जमाफीचा निर्णय हा केवळ आर्थिक मदत नसून शेतकऱ्यांच्या आत्मविश्वासाला बळ देणारा ठरणार असल्याची प्रतिक्रिया कृषी क्षेत्रातून व्यक्त होत आहे.

# नवीन रेल्वे पुलाच्या बांधकामाला गती

## विद्युत तारांची उंची वाढवण्याचे काम प्रगतीपथावर

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २ जून-**

मध्य रेल्वेच्या सोलापूर विभागाने, सोलापूर यार्डातील नवीन 'रोड ओव्हर ब्रिज'च्या बांधकामाच्या अनुषंगाने, 'ओव्हरहेड इक्विपमेंट' मध्ये सुधारणा करण्याचे व्यापक कार्य हाती घेतले आहे. १४ डिसेंबर २०२५ रोजी सोलापूर यार्डातील १०३ वर्षे जुना आरओबी यशस्वीरित्या पाडल्यानंतर, भारतीय राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाने नवीन पुलाच्या बांधकामाला २२ मे रोजी सुरुवात केली आहे.

महत्त्वपूर्ण पायाभूत सुविधा प्रकल्पाला गती देण्यासाठी आणि रेल्वेचे कामकाज सुरक्षितपणे सुरू राहावे यासाठी, सोलापूर विभागाच्या 'इलेक्ट्रिकल ट्रॅक्शन डिस्ट्रिब्युशन' विभागाने सोलापूर स्टेशन यार्डाच्या बाधित क्षेत्रात विद्यमान नेटवर्कमध्ये बदल करण्याचे महत्त्वपूर्ण कार्य हाती घेतले आहे. जुन्या पुलाच्या रचनेखाली असलेल्या 'ओएचई'ला, पुलाच्या रचनेपासून तसेच त्याखालून धावणाऱ्या गाड्यांपासून विद्युत अंतराच्या संदर्भात गंभीर मर्यादा होत्या. परिणामी, या विभागात 'ओएचई'ची एक विशेष रचना केली होती. नवीन 'आरओबी' चे बांधकाम सध्या प्रगतीपथावर आहे. या बदलामुळे गाड्यांचा वेग वाढवणे शक्य होईल, इलेक्ट्रिकल क्लिअरन्समध्ये



सुधारणा होईल आणि रेल्वेच्या कामकाजाची सुरक्षा लक्षणीयरीत्या वाढेल, असे सांगण्यात आले आहे.

# भारताचा मौल्यवान वारसा जपणारी ज्ञानभारतम् मोहीम सुरू

## एक कोटी हस्तलिखितांचा शोध घेणार

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २ जून-**

भारताच्या वैभवशाली ज्ञानपरंपरेचे रक्षण करण्यासाठी भारत सरकारच्या संस्कृती मंत्रालयाने ज्ञानभारतम या महत्त्वाकांक्षी देशव्यापी हस्तलिखित सर्वेक्षण मोहिमेची घोषणा केली आहे. केंद्रीय अर्थसंकल्पात जाहीर झालेल्या या योजनेद्वारे देशभरातील तब्बल १ कोटीहून अधिक हस्तलिखितांचे दस्तऐवजीकरण, संवर्धन आणि डिजिटायझेशन करण्याचे मोठे उद्दिष्ट आहे.

हस्तलिखितांचे मूल्यांकन, पडताळणी आणि नोंदणी करण्यासाठी ज्ञानभारतम मोबाईल ॲप हे विशेष ॲप विकसित केले आहे. मोहिमेद्वारे भारताच्या ज्ञानपरंपरेचा एक राष्ट्रीय डिजिटल संग्रह तयार करून तो जगासाठी उपलब्ध केला जाईल. हस्तलिखितांची मूळ मालकी संबंधित संस्था किंवा व्यक्तीकडेच राहील. स्वखुशीने दिल्यासच शासन ती स्वीकारेल. महाराष्ट्रात या मोहिमेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी पुराभिलेख संचालनालय, महाराष्ट्र राज्याची मुख्य नोडल संस्था म्हणून नियुक्ती केली आहे. पुराभिलेख संचालक सुजितकुमार उगले (राज्य नोडल अधिकारी) आणि अंजली ढमाळ (सहनोडल अधिकारी) या मोहिमेचे नेतृत्व करत आहेत.

राज्यात हस्तलिखितांचा शोध घेण्यासाठी कवी कालिदास संस्कृत विद्यापीठ, नागपूर (क्लस्टर केंद्र), भांडारकर प्राच्यविद्या संशोधन संस्था, पुणे (क्लस्टर केंद्र), आनंद आश्रम संस्थान, पुणे (स्वतंत्र केंद्र), भारत इतिहास संशोधक मंडळ, पुणे (स्वतंत्र केंद्र) या ४ प्रमुख संस्था कार्यरत राहतील.


### प्रशासनाचे सज्जता आणि जनसहभागाचे आवाहन

मोहिमेसाठी सर्व जिल्हाधिकाऱ्यांना जिल्हा नोडल अधिकारी नियुक्त करण्याचे निर्देश दिले आहेत. जिल्ह्यातील मंदिरे, मठ, धार्मिक संस्था आणि खाजगी संग्राहक यांच्याकडील हस्तलिखिते शोधण्याची जबाबदारी जिल्हा प्रशासनाची असेल. नागरिक, संस्था, संशोधक, तसेच एनसीसी आणि एन एस एस च्या स्वयंसेवकांनी या मोहिमेत सक्रिय सहभागी व्हावे. ज्यांच्याकडे जुनी हस्तलिखिते उपलब्ध आहेत, त्यांनी त्याची माहिती ज्ञानभारतम ॲपवर अपलोड करून या राष्ट्रकार्यात आपले योगदान द्यावे, असे आवाहन प्रशासनातर्फे करण्यात आले आहे.

# व्यंकटेश देवनपल्ली यांना पीएचडी प्रदान

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. २ जून-**

येथील आणि सध्या बेंगळुरू येथे स्थायिक असलेले व्यंकटेश देवनपल्ली यांना मानसरोवर ग्लोबल युनिवर्सिटी, सिहोर भोपाळने विद्यापीठाने हिंदी विषयात पीएचडी प्रदान केली आहे. 'नरेंद्र दीपक की काव्यसाधना एवं साहित्यिक पत्रकारिता में उनका योगदान' या विषयावर त्यांनी ही पदवी प्राप्त केली आहे.



मातृभाषा तेलुगु, शिक्षण मराठीतून आणि वयाच्या पंचहत्तराव्या वर्षी त्यांनी ही पदवी मिळविली आहे. वयाच्या एकोणिसाव्या वर्षी ते राष्ट्रीयीकृत बँकेत क्लार्क म्हणून नोकरीस लागले. त्यानंतर नोकरीच्या काळातच बी.ए., एल.एल.बी. आणि सीएआयआयबीच्या परीक्षा उत्तीर्ण झाले. सोलापूरच्या चाटी गल्ली शाखेत एक क्लार्क म्हणून सुरू झालेला त्यांचा बँकिंग प्रवास तब्बल एक्केचाळीस वर्षांनंतर नवी दिल्लीतील पार्लमेंट स्ट्रीट येथे डेप्युटी रिजनल मॅनेजर या पदावरून सेवानिवृत्त झाले. सेवानिवृत्तीनंतर, बेंगळुरू येथे आल्यानंतर कर्नाटक बार असोसिएशनकडून त्यांना वकिलीची सनद प्राप्त केली.

# महाशिबिरात नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २ जून-**

श्री सर्वोदय कच्छी जैन मंडळ, सोलापूर, इंडियन रेड क्रॉस सोसायटी आणि देढिया फाउंडेशन, सोलापूर यांच्या संयुक्त विद्यमाने दमाणी ब्लड बँक, डफरीन चौक येथे आयोजित करण्यात आलेल्या महा शिबिर उपक्रमास नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. या शिबिरामध्ये नागरिकांना एकाच ठिकाणी विविध शासकीय सेवा उपलब्ध करून देण्यात आल्या. ज्येष्ठ नागरिकांसाठी आयुष्मान वय वंदना कार्ड या योजनेअंतर्गत ४०० कार्ड तयार करण्यात आली. तसेच महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाच्या ङ्गमोबिलिटी कार्ड योजनेअंतर्गत ३२० लाभार्थ्यांना कार्ड देण्यात आले.

महिलांना व ज्येष्ठ नागरिकांना प्रवास सवलतीचा लाभ मिळवून देण्यासाठी या शिबिराचा मोठा फायदा झाला. तसेच आधार कार्ड अद्ययावत करण्यासाठी मोठ्या प्रमाणात नागरिकांनी सहभाग घेतला असून १५० आधार कार्ड अपडेट करण्यात आली. शिबिरामध्ये



कागदपत्रांची पूर्तता, नोंदणी प्रक्रिया भरून सहकार्य केले. ज्येष्ठ नागरिकांनी समाधान व्यक्त करत आयोजकांचे आभार मानले.

महाशिबिर यशस्वी करण्यात ममता कुलकर्णी,चंदुभाई देढिया. केतन देढिया अंकित धरमशी, वत्सल देढिया, तेजस देढिया, पलक गडा, नैनेश गडा, दर्ष जागाणी, मोक्षा देढिया, कुंज गडा, माही देढिया, अमिति नागदा. कार्यक्रमास अध्यक्ष धिरेन गडा, उपाध्यक्ष खुशाल देढिया, सचिव मयुर जागाणी, कोषाध्यक्ष कुणाल सावला व राजेश देढिया, बिपीन गडा, पियुष लोडाया, नेरल गडा, केतन निसर, अरुणाबेन शहा, मिथुन दोशी, तेजल जागाणी यांचे मोलाचे सहकार्य लाभले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन चंदन गोसर आणि श्रद्धा केनिया यांनी केले

# शेतीच्या वादातून शेतकऱ्यासह आई व पत्नीवर हल्ला

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. २ जून-**

बार्शी तालुक्यातील भोयरे येथे न्यायप्रविष्ट असलेल्या शेतीच्या वादातून एका शेतकऱ्यासह त्याची -आई आणि पत्नी यांच्यावर जीवघेणा हल्ला झाल्याची धक्कादायक घटना घडली आहे. या प्रकरणी पाचजणांविरुद्ध बार्शी तालुका पोलिसांत गुन्हा दाखल असून जखमींवर खासगी रुग्णालयात उपचार सुरु आहेत.

भोयरे येथील गोकुळ भाऊराव पुंड (वय ४७) हे आपल्या कुटुंबासह शेती व्यवसाय करतात. शेतजमिनीच्या ताब्यासंदर्भात न्यायालयात दावा सुरु असून या जमिनीच्या व्यवहारावरुन दोन्ही पक्षांमध्ये वाद सुरु आहे. फिर्यादीच्या जबाबानुसार, २९ मे रोजी रात्री साडेनऊच्या सुमारास गोकुळ पुंड हे घरामागील जनावरांच्या शेजारी झोपलेले असताना अचानक कुत्र्यांच्या भुंकण्याच्या आवाजा मुळे त्यांना जाग आली. त्यावेळी पाचजण हातात कोयता, लोखंडी गज, लोखंडी पाईप आणि लाकडी काठ्या घेऊन त्यांच्या दिशेने येताना दिसले. शेतीचा कब्जा का सोडत नाही, आज तुला जिवंत सोडणार नाही, अशी धमकी देत संशयितांनी हल्ला केल्याचा आरोप फिर्यादीने केला आहे. यामध्ये एका आरोपीने कोयत्याने डोक्यावर वार करुन गंभीर जखमी केले, तर इतरांनी लोखंडी गज, पाईप आणि काठ्यांनी मारहाण केल्याचे तक्रारीत नमूद करण्यात आले आहे. हल्ल्यादरम्यान गोकुळ पुंड यांनी आरडाओरडा करत घराकडे धाव घेतली. त्यांचा आवाज ऐकून आई मंडोदरी पुंड आणि पत्नी वैशाली पुंड या घराबाहेर आल्या असता आरोपींनी त्यांनाही मारहाण केल्याचा आरोप आहे. मंडोदरी पुंड यांच्या डोक्यावर कोयत्याने वार करण्यात आला असून त्यांना गंभीर दुखापत झाली आहे. पत्नी वैशाली पुंड या सोडविण्यासाठी मध्ये पडल्या असता त्यांनाही काठीने मारहाण करुन जखमी करण्यात आल्याचा आरोप करण्यात आला आहे. या प्रकरणी रामराजे नवनाथ गात, ज्ञानेश्वर अभिमान गात, शंकर हणुमंत गात, अभिमान तुळशीराम गात आणि पांडुरंग तानाजी गात (सर्व रा. भोयरे) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल असून पुढील तपास पोलीस करीत आहेत.

# पोलिस भरतीत 'वयोमर्यादा संकट'

## ५ वर्षांच्या सवलतीची मागणी प्रयास संस्थेचे गृहमंत्र्यांना निवेदन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२ जून-**

महाराष्ट्रातील आगामी पोलीस शिपाई भरतीकडे लाखो युवक-युवतींचे लक्ष लागले असताना भरती प्रक्रियेतील विलंबामुळे अनेक उमेदवार वयोमर्यादा ओलांडण्याच्या स्थितीत पोहोचले आहेत. त्यामुळे त्यांच्या रोजगाराच्या संधी धोक्यात येण्याची शक्यता निर्माण झाली असून राज्य शासनाने सर्व प्रवर्गातील उमेदवारांना किमान पाच वर्षांची विशेष वयोमर्यादा वाढ द्यावी, अशी मागणी प्रयास मागासवर्गीय सामाजिक संस्थेने राज्याचे मुख्यमंत्री तथा गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे मेलद्वारे केली आहे.

संस्थेचे संस्थापक अध्यक्ष सचिन शिंदे यांनी शासनाला दिलेल्या निवेदनात नमूद केले आहे की, मागील काही वर्षांत विविध प्रशासकीय कारणांमुळे पोलीस भरती प्रक्रिया नियमितपणे पार पडू शकली नाही. अनेक युवक-युवतींनी वर्षानुवर्षे भरतीची तयारी केली, मात्र भरती न झाल्याने त्यांचे वय निर्धारित मर्यादेच्या जवळ पोहोचले आहे. परिणामी गुणवंत आणि पात्र उमेदवारांना केवळ वयोमर्यादेच्या अटीमुळे संधी गमवावी लागू शकते.

### विशेष वयोमर्यादा वाढ द्या

भरती प्रक्रियेतील विलंबामुळे अनेक पात्र युवक-युवती वयोमर्यादेच्या बाहेर जाण्याच्या स्थितीत आहेत. त्यांच्या रोजगाराच्या संधी कायम राहाव्यात आणि त्यांना न्याय मिळावा यासाठी महाराष्ट्र पोलीस शिपाई भरतीमध्ये किमान ५ वर्षांची विशेष वयोमर्यादा वाढ देणे अत्यंत आवश्यक आहे.'

**-सचिन शिंदे, संस्थापक अध्यक्ष, प्रयास मागासवर्गीय बहुद्देशीय सामाजिक संस्था, सोलापूर.**



देशातील इतर राज्यांनी या समस्येची गांभीर्याने दखल घेत उमेदवारांना दिलासा दिला आहे. मध्यप्रदेशमध्ये पोलीस भरतीची कमाल वयोमर्यादा ३८ वर्षांपर्यंत वाढविण्यात आली आहे.

गुजरातमध्ये आरक्षित प्रवर्ग आणि महिलांसाठी विशेष सवलतीची तरतूद आहे, तर उत्तरप्रदेश शासनाने एकरकमी तीन वर्षांची वयोमर्यादा वाढ मंजूर केली आहे. त्यामुळे महाराष्ट्रानेही याबाबत सकारात्मक भूमिका घेण्याची गरज व्यक्त करण्यात येत आहे. सामाजिक न्यायाच्या दृष्टीनेही हा निर्णय महत्त्वाचा ठरेल. येत्या भरती प्रक्रियेपूर्वी शासनाने या मागणीचा गांभीर्याने विचार करून विशेष वयोमर्यादा वाढ जाहीर करावी, अशी अपेक्षा उमेदवारांमधून व्यक्त होत आहे.

# बँकांच्या गैरप्रकारांविरोधात भारतीय मित्र समूहाचे उद्या ठिय्या आंदोलन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २ जून-**

बँकांमधील ग्राहकांना होणारा त्रास, विविध गैरप्रकार तसेच ग्राहक सेवेत सुधारणा करण्याच्या मागण्यांसाठी भारतीय मित्र समूहातर्फे गुरुवार, दि. ४ जून रोजी ठिय्या आंदोलन करण्यात येणार असल्याची माहिती यल्लेश मादगुंडी यांनी पत्रकार परिषदेत दिली.

बँकांचे ग्राहक व गुंतवणूकदार म्हणून आलेले अनुभव, मानसिक त्रास आणि बँकिंग व्यवस्थेतील त्रुटींविषयी जनजागृती करण्याच्या उद्देशाने हे आंदोलन करण्यात येणार आहे. बँकांचे कामकाज २४ तास व वर्षभर सुरू ठेवणे, ग्राहकांना सन्मानपूर्वक व पारदर्शक सेवा देणे, टोकन पद्धतीने सेवा उपलब्ध करणे, कर्मचाऱ्यांना प्रादेशिक भाषेचे ज्ञान बंधनकारक करणे आदी मागण्या यावेळी करण्यात आल्या. बँक कर्मचाऱ्यांवर विमा, म्युच्युअल फंड यांसारख्या उत्पादनांच्या विक्रीसाठी टार्गेटचा दबाव टाकू नये, अनावश्यक शुल्क आकारणे थांबवावे, ग्राहकांसाठी प्रसाधनगृहाची सुविधा उपलब्ध करावी तसेच रिक्त पदे तातडीने भरावीत, अशीही मागणी करण्यात आली. लंच ब्रेकच्या नावाखाली कॅश काउंटर बंद ठेवण्याची पद्धत बंद करावी आणि ज्येष्ठ नागरिकांना आरबीआयच्या मार्गदर्शक सूचनांनुसार डोअरस्टेप सेवा द्यावी, अशी मागणी आंदोलनातून करण्यात येणार आहे.

या पत्रकार परिषदेला विजयकुमार अंकम, यल्लादास पारपेल्ली, कुमार नल्ला, जगदीश नल्ला आणि लक्ष्मण चंदनकेरी उपस्थित होते.

CMYK

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा,
छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली,
जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर
(कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/



# सोलापूर मनपा शिक्षण मंडळाकडून मोफत पाठ्यपुस्तक वाटपास प्रारंभ

- पहिल्या दिवशी उर्दू, कन्नड, तेलुगू व हिंदी माध्यमाच्या शाळांना पुस्तके वितरित
- समग्र शिक्षा अभियान: पहिल्या टप्प्यात ७४.८२ टक्के पुस्तके प्राप्त
- शाळानिहाय नियोजनबध्द वाटप सुरु

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २ जून-**

महानगरपालिका प्राथमिक शिक्षण मंडळ, सोलापूर अंतर्गत सन २०२६-२७ या शैक्षणिक वर्षासाठी समग्र शिक्षा योजनेअंतर्गत मोफत पाठ्यपुस्तक पुरवठा व वितरणाचा शुभारंभ आज, सोमवार दिनांक १ जून रोजी करण्यात आला. बालभारती, पुणे यांच्या पोर्टलवरील माहितीनुसार सोलापूर मनपा क्षेत्रासाठी पहिल्या टप्प्यात ७४.८२% पाठ्यपुस्तके प्राप्त झाली असून, त्याचे शाळांनिहाय नियोजनबद्ध वाटप सुरू झाले आहे.

आज वितरणाच्या पहिल्या दिवशी महानगरपालिका क्षेत्रातील २२ उर्दू माध्यमाच्या शाळांना इयत्ता १ ली, २ री, ५ वी, ७ वी आणि ८ वी ची सर्व प्राप्त पाठ्यपुस्तके, तसेच इयत्ता ३ री व ४ थी ची इंग्रजी विषयाची पाठ्यपुस्तके वितरित करण्यात आली. यासोबतच शहरातील कन्नड माध्यमाच्या १४ शाळा (मनपा व अनुदानित खासगी), तेलगू माध्यमाच्या ३ शाळा (मनपा व अनुदानित खाजगी) आणि हिंदी माध्यमाच्या २ खासगी अनुदानित शाळांना प्राप्त झालेल्या पाठ्यपुस्तकांचे सुरळीत वाटप करण्यात आले.



### आजपासून मराठी माध्यमाचा टप्पा

प्राप्त झालेल्या पाठ्यपुस्तकांचे दि. ०१ जून ते १० जून २०२६ यु-डायस प्रमाणे, २०२६-२७ आणि सेवक संचानुसार शाळांना वाटप करण्याचे नियोजन आहे. त्यानुसार येत्या बुधवारपासून बीटनिहाय मराठी माध्यमाच्या शाळांना इयत्ता १ ली, २ री, ३ री, ४ थी, ५ वी, ७ वी व ८ वी ची सर्व प्राप्त पाठ्यपुस्तके, तसेच इयत्ता ६ वीच्या हिंदी सुलभभारती विषयाच्या पाठ्यपुस्तकांचे वितरण केले जाणार आहे.

### पाठ्यपुस्तक पुरवठ्याची सद्यस्थिती

बालभारतीकडून प्राप्त झालेल्या माहितीनुसार सोलापूर मनपा क्षेत्रातील एकूण मागणी आणि पुरवठ्याचे गणित खालीलप्रमाणे आहे

**तपशील पाठ्यपुस्तकांची संख्या**

| | |
|---|---|
| एकूण मागणी (पुस्तके) | ४,२४,२४४ |
| एकूण प्राप्त (पुस्तके) | ३,१७,४१५ |
| उर्वरित अप्राप्त (पुस्तके) | १,०६,८२९ |
| प्राप्तीची टक्केवारी | ७४.८२% |

### उर्वरित पुस्तके १० जूनपर्यंत मिळणार

सध्या अप्राप्त असलेली १,०६,८२९ पाठ्यपुस्तके बालभारती, पुणे यांच्याकडून दि.१० जून पर्यंत प्राप्त होण्याची अपेक्षा आहे. ही पुस्तके उपलब्ध होताच दुसऱ्या टप्प्यात संबंधित शाळांना तातडीने वितरित केली जातील, अशी माहिती शिक्षण मंडळाकडून देण्यात आली.

आजच्या या पुस्तक वाटप प्रक्रियेचा शुभारंभ प्रशासनाधिकारी मल्हारी माने आणि बालभारती मराठी पाठ्यपुस्तक मंडळाचे माजी कार्यगट सदस्य पद्माकर कुलकर्णी यांच्या प्रमुख उपस्थितीत झाला. यावेळी समग्र शिक्षा अभियान पाठ्यपुस्तक प्रमुख रियाज आत्तार, पर्यवेक्षक निलोफर सय्यद, नितीन अंकुश जाधव, अमोल गायकवाड, लक्ष्मण पुजारी, ज्ञानेश्वर गरड, अमोल धस, रूपाली कैंची, सुवर्णा गुरव, प्रफुल्ला कदम, प्रभात चव्हाण, उमादेवी मुंडे, गणेश नांदवटे, नईम मुच्छले आणि प्रसन्न देवनुेर उपस्थित होते.

## महत्वाचे...



### उमरड येथे राजमाता अहिल्यादेवी होळकर यांची जयंती साजरी

**जेऊर दि. २ जून-**

उमरड (ता.करमाळा) येथे पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. गावातील पुण्यश्लोक अहिल्यादेवींच्या अर्धाकृती पुतळ्याचे पूजन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी मान्यवर मंडळींनी अहिल्यादेवींच्या कार्यकर्तृत्वाला उजाळा दिला. प्रा. नंदकिशोर वलटे यांनी लोकमाता अहिल्यादेवी खऱ्या अर्थाने जातिभेद निर्मुलन करणाऱ्या द्रष्ट्या समाजसुधारक होत्या असे सांगितले. भारतीय प्रशासन सेवेत कार्यरत असलेले पांडुरंग चोरमले यांनी सामाजिक कार्यात अग्रेसर राहण्यासाठी तरुणांना पन्नस हजार रुपयांची देणगी जाहीर केली. सभापती अतुल पाटील यांनी युवकांनी जयंती निमित्त समाजसुधारणेचे कार्य करावे असे मत मांडले. आदिनाथ कारखान्याचे संचालक राजा कदम यांनी अहिल्यादेवींचा इतिहास सर्व महिलांनी अंगिकारावा व बेडरपणे अनिष्ट प्रथावर हला चढवावा असे आवाहन केले. कार्यक्रमास मकाई कारखान्याचे संचालक बापू चोरमले, आदिनाथ कारखान्याचे संचालक चौधरी, सरपंच प्रमोद बदे, संदिप मारकड, दादा पाटील, उदयसिंह पाटील, बालाजी पाटील, पोलिस पाटील अंकुश कोठावळे, जनार्दन मारकड, श्रीकांत मारकड, बंडगर, रसूल शेख, ज्ञानेश्वर मारकड, विशाल मारकड, बिरुदेव हुलगे, दादा मारकड, साईदिप मारकड उपस्थित होते. सूत्रसंचालन फोजमल पाखरे यांनी केले.



### पर्यावरण संरक्षणासाठी वृक्षारोपण काळाची गरज : अनिल झंपले

**अक्कलकोट, दि. २ मे-**

पर्यावरण संरक्षणासाठी वृक्षारोपण काळाची गरज असल्याचे प्रतिपादन भारतीय लहुजी सेनेचे तालुकाध्यक्ष अनिल झंपले यांनी केले. सामाजिक कार्यकर्ते वसंत देडे यांनी सांगवी ग्रुप ग्रामपंचायत येथे वाढदिवसाला करण्यात येणारा बायफळ खर्च टाळून शंभर झाडे लावण्याचा सामाजिक उपक्रम राबवला. या उपक्रमाचे कौतुक होत आहे. या उपक्रमासाठी भारतीय लहुजी सेनेचे तालुकाध्यक्ष अनिल झंपले, टिल्लू नाईकनवरे, वाघमारे, संतोष बावने, श्रीकांत पाटील यांनी परिश्रम घेतले. सांगवी ग्रुप ग्रामपंचायत कोळी बेट येथे ६०० झाडे लावण्याचा संकल्प वाढदिवसानिमित्त करण्यात आला. वड, पिंपळ, उंबर, पळस, करवंद, जांभूळ, आंबा अशा विविध देशी झाडांच्या वृक्षारोपणाचा कार्यक्रम कोळीबेट या ठिकाणी घेण्यात आला.



### सुळेवाडी जिल्हा परिषद शाळेत डिजिटल क्लासरूमचे उद्घाटन

**पिलीव, दि. २ जून-**

माळिशरस तालुक्यातील सुळेवाडी येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा सुळेवाडी या शाळेस ६५ इंच, इंटरॅक्टिव्ह फ्लॅट पॅनल संच, भेट देऊन शाळा खोली डिजिटल केली. डिजिटल क्लासरूमचे उद्घाटन एनएमएमएस शिष्यवृत्तीधारक गुणवंत विद्यार्थिनी, संहिता धनाजी बोडरे व जिल्हा परिषद सदस्य चंद्रकांत जाधव, पंचायत समितीचे उपसभापती अमोल मदने-पाटील, पंचायत समिती सदस्य शिवराज पुकळे, आरटीओ अधिकारी हनुमंत सुळे, युवा नेते आशिष सुळे, शिवाजी इरकर, डॉ. महादेव विरकर, बाबुराव सुळे, बाजीराव सुळे, शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष कुंडलिक माने, पिलीव केंद्राचे केंद्रप्रमुख राजकुमार फासे, पत्रकार प्रमोद भैस, खंडू माने, ग्रामपंचायत अधिकारी प्रिया धुमाळ यांच्या हस्ते केले. यावेळी मुख्याध्यापक नागनाथ शेटे, विनायक आर्वे, गणेश भंडारे, सुबोध काटे, महेंद्र गवळी, अंगणवाडी सेविका वंदना ऐवळे उपस्थित होते. सूत्रसंचालन, शिक्षक अनिल कोल्हटकर यांनी केले. यावेळी सुळेवाडी युवा मंच सदस्य समाधान सुळे, नामदेव सुळे, कृष्णा सुळे, काशिलिंग सुळे, कृष्णा सुळे, रणजीत सुळे, दयाजी सुळे, ज्योतीराम माने, राजू रुपनवर, दीपक दडस, बापू भिसे, निलेश खांडेकर, दिलीप करे, तुषार हांडे, धनाजी दोलताडे, सतीश डोंबाळे, संतोष बंडगर, बापू दडस यांनी कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी परिश्रम घेतले.

### आदर्श हॉस्पिटलमधून रुग्ण महिलेचे दागिने लंपास

**सोलापूर, दि. २ जून-**

दवाखान्यातील स्पेशल रूममधून एका रुग्ण महिलेचे ४० हजार ५०० रुपये किमतीचे सोन्याचे दागिने चोरीला गेल्याची घटना येथील रंगभवन परिसरातील फर्स्ट चर्चच्या परिसरातील असलेल्या आदर्श हॉस्पिटल मध्ये घडली. दरम्यान याप्रकरणी सदर बझार पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत गणपत लालू राठोड (वय ६७ वर्ष, रा. शिवाजी नगर स्टेशन जवळ, अक्कलकोट) यांनी फिर्याद दिली आहे. फिर्यादीच्या पत्नी दि. १५ मे २०२६ रोजी रात्री १० ते दि. १७ मे सकाळी ६.४५ वाजण्याच्या दरम्यान संबंधित हॉस्पिटलच्या स्पेशल रूममध्ये ऍडमिट होत्या. त्यावेळी एका अज्ञात चोरट्याने रूममध्ये प्रवेश करून त्यांच्या पर्समध्ये ठेवलेले सोन्याचे दागिने चोरून नेले. यात ३० हजाराचे मणी मंगळसूत्र, १० हजाराचे सोन्याचे कानातील ऑप्स, सोन्याची नाकातील नथ असा एकूण ४० हजार ५०० रुपयांचा मुद्देमाल चोरीला गेल्याचे फिर्यादीत म्हटले आहे. हवालदार चव्हाण हे गुन्ह्याचा पुढील तपासकरत आहेत.

## पिलीव परिसरात बळीराजाला दमदार पावसाची अपेक्षा

**तभा वृत्तसेवा,**
**पिलीव, दि. २ जून-**

सोलापूर जिल्ह्यासह पिलीव परिसरात यंदा तापमानाने उच्चांक गाठला. यंदा कधी नव्हे ते पिलीव परीसरात तापमान ४४ पर्यंत पोहचले. यामध्ये प्रचंड ऊन, ऊकाडा यामुळे यंदा संपूर्ण जनजिवन विस्कळीत झाले होते. यानंतर २४ मे पासून रोहिणी या नक्षत्राला सुरुवात झाली. गेल्या वर्षी या नक्षत्रात जोरदार पाऊस झाला होता.

यामुळे खरेतर पुढे कसलीच अडचण आली नाही. पण यंदा हे नक्षत्र संपत आले तरीही पाऊस पडलाच नाही. सध्या पिलीव भागातील विहीरींनी तळ गाठला आहे. उन्हाळ्यात जेवढा त्रास झाला नाही तेवढा प्रचंड उन्हाचा तडाखा सध्या जाणवत आहे.

शेतातील पिके तर पाण्याला येत आहेत. यामुळे आता पिके ही पाऊस पडलाशिवाय जगणे अवघड झाले आहेत.

पिलीव परीसरातील सुळेवाडी, बचेरी, शिंगोर्णी या गावात पिण्याच्या पाण्याचे टॅंकर सुरु आहेत. या भागात सध्या फारशी पिके नाहीत पण पिलीव परीसरात कॅनालच्या पाण्यावर चांगली पिके आहेत. पण सध्या या पिकांचे भविष्य पावसावरच आहे.

पाऊस कधी पडतोय याकडेच सध्या या भागातील शेतकरी व इतरांचे लक्ष लागले आहे. पाऊस पडल्याशिवाय तापमान कमी होत नाही. पिलीव परिसरातील बळीराजा तसेच इतरांचे आकाशाकडे लक्ष लागले आहे. सध्या बळीराजा तसेच सर्वाचेच लक्ष वरूणराजा कधी बरसतोय.

### नवचैतन्य मंडळातर्फे श्रीमंत पांचाळ यांचा सत्कार

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. २**

नवचैतन्य गणेशोत्सव मंडळ यांच्या वतीने हभप श्रीमंत पांचाळ चिकुर्डा (जि. लातूर) यांचा कै. बाळासाहेब इंगळे स्मृती उद्यान येथील श्री जागृत लक्ष्मी मंदिर येथे शाल श्रीफळ देऊन मनोज जाधव मेजर संदिप सलगरे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. याप्रसंगी विश्वनाथ सुतार, हिराकांत जामदार, विश्वजीत जाधव, रूतुराज जामदार, प्रणव जाधव, शौर्य सुतार, सागर इंगळे, शिवनेरी सलगरे, रणवीर घाटके, नीरव पोतदार, सुरज सलगरे, मनोज जाधव, श्रीमुख जगदाळे, शिवकुमार लिंबीतोटे, सुधाकर काशेट्टी, गणेश दिवाणजी, किशोर खरात, बिराजदार उपस्थित होते.

## वृध्द महिलेला भुरळ पाडून सोन्याच्या पाटल्या लंपास

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि.२ जून-**

शहरात भामट्यांचा सुळसुळाट वाढला असून, भरदिवसा एका ६५ वर्षीय वृद्ध महिलेला भुरळ पाडून सुमारे ४ तोळे वजनाच्या सोन्याच्या पाटल्या लंपास केल्याची घटना समोर आली आहे. भोगेश्वरी मंदिर परिसरातील शेडगे हार्डवेअर दुकानाजवळ सोमवार सकाळी ११ वाजण्याच्या सुमारास ही घटना घडली. याप्रकरणी वृद्ध महिलेने बार्शी शहर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे.

फिर्यादी सुमन विलास चौधरी (वय ६५, रा. भोगेश्वरी चाळ, बार्शी) या सोमवारी सकाळी ११ वाजता भोगेश्वरी मंदिरातून दर्शन घेऊन आपल्या घराकडे पायी निघाल्या होत्या. त्या शेडगे यांच्या हार्डवेअर दुकानाजवळ आल्या असता, एक अनोळखी तरुण त्यांच्या समोर आला. समोरील गल्लीत उभे असलेले तीन मुले तुम्हाला बोलवत आहेत, ते काय म्हणतात ते बघा, असे सांगून तो त्या वृद्ध महिलेला सोबत घेऊन गेला.

त्या ठिकाणी आधीच तीन अनोळखी इसम उभे होते. त्यांनी स्वतःची ओळख लपवून, आम्ही महिलेला डिपार्टमेंटचे लोक आहोत, हा आमचा फोटो बघा, असे सांगून त्यांना विश्वासात घेतले. पुढे भामट्यांनी घाबरवण्यास सुरुवात केली. येथे शेजारीच एका सोनाराचा खून झाला असून त्याचा पोलीस तपास सुरु आहे. तुम्ही अशाप्रकारे हातामध्ये सोन्याचे दागिने घालून फिरु नका, ते काढून ठेवा, अशी भीती त्यांनी सुमन चौधरी यांना दाखवली.

महिलेने भामट्यांच्या सांगण्यावरुन आपल्या हातातील ४ तोळ्यांच्या सोन्याच्या पाटल्या काढल्या. त्यावेळी त्या तोतयांनी आम्ही तुमच्याकडे दया दाखवतो, तुम्हाला या पाटल्या कागदामध्ये व्यवस्थित गुंडाळून देतो, असे भासवले. त्यांनी सोन्याच्या पाटल्या हातात घेऊन एका कागदात गुंडाळल्याचे नाटक केले आणि ती पुडी सुमन चौधरी यांच्या हातात दिली. मात्र, घरी जाऊन पुडी उघडून पाहिली असता, त्यात सोन्याच्या पाटल्यांऐवजी काचेच्या तीन बांगड्या निघाल्या. आपल्याला भुरळ पाडून फसवण्यात आल्याचे लक्षात येताच महिलेने तात्काळ नातेवाईकांना सोबत घेऊन पोलीस ठाणे गाठले. याबाबत अज्ञात चोरट्याचा पोलीस तपास करीत आहेत.




## हरी ॐ तत्सत् परिवारातर्फे ३३ आदर्श माता-पित्यांचा गौरव

**तभा वृत्तसेवा,**
**वेळापूर, दि. २ जून-**

आई-वडील हेच मुलांच्या जीवनाचे पहिले गुरू, पहिले दैवत आणि यशामागील खरे शिल्पकार असतात. त्यांच्या त्याग, समर्पण, संघर्ष आणि संस्कारांना कृतज्ञतेची वंदना करण्यासाठी हरी ॐ तत्सत् परिवार, फोंडशीरस, (ता. माळिशरस) यांच्या वतीने मोरगाव येथे आयोजित करण्यात आलेला आदर्श आई-वडील सत्कार सोहळा संपन्न झाला.

या प्रेरणादायी सोहळ्यास सद्गुरू भक्तराज महाराज यांचे चिरंजीव नंदूदादा व रविदादा यांची प्रमुख उपस्थिती लाभली. तसेच देशभर आपल्या सुरेल तंतुवादनाने रसिकांच्या मनावर अधिराज्य गाजविणारे प्रख्यात तंतुवादक श्री. सुहास काटदरे व काटदरे यांची उपस्थिती कार्यक्रमाची विशेष आकर्षण ठरली. हरी ॐ तत्सतब परिवाराचे प्रेरणास्थान व मार्गदर्शक सद्गुरू श्रीराम दाते काका यांच्या मार्गदर्शनाखाली हा संस्कारांचा सोहळा पार पडला. यावेळी आपल्या मुला-मुलींना उच्च शिक्षित, सुसंस्कृत आणि समाजात मानाचे स्थान मिळवून देण्यासाठी आयुष्यभर कष्ट, त्याग आणि संघर्ष करणाऱ्या ३३ आदर्श माता-पित्यांचा सन्मान करण्यात आला. सत्कारमूर्तींना सन्मानचिन्ह, सन्मानपत्र, शाल, श्रीफळ, हार आणि पैठणी प्रदान करून त्यांच्या जीवनकार्याचा गौरव करण्यात आला.

आयुष्यभर मुलांच्या यशासाठी झटलेल्या या मातापित्यांना मिळालेला हा सन्मान त्यांच्या जीवनातील एक अविस्मरणीय क्षण ठरला. 'आज आमच्या कष्टांचे सार्थक झाले, आमच्या त्यागाची समाजाने दखल घेतली', अशा भावना व्यक्त करताना अनेकजण भावुक झाले. सूत्रसंचालन डॉ. सागर विद्वांस यांनी केले. त्यांना डॉ. तुळशीराम पिसाळ यांची उत्कृष्ट साथ लाभली. कार्यक्रमाच्या समारोपप्रसंगी श्री. नंदूदादा यांनी अध्यक्षीय भाषणातून पालकांविषयीची कृतज्ञता व्यक्त करत, 'ज्या घरात आई-वडिलांचा सन्मान होतो, ते घरच खऱ्या अर्थाने मंदिर बनते, असा संदेश दिला. त्यानंतर डॉ. अंकुश पवार यांनी सुमधुर स्वरांत पसायदान सादर केले. दिलीप दळवी यांनी आभार मानले.

## बार्शीत जुगार अड्ड्यावर छापा; दीड लाखांचा मुद्देमाल जप्त

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि.२ जून-**

बार्शी शहरातील दुधवाला चौक परिसरात सुरु असलेल्या कल्याण-मुंबई मटका जुगार अड्ड्यावर पोलिसांनी धडक कारवाई करत रोख रक्कम, दोन मोबाईल फोन व जुगाराचे साहित्य असा एकूण १ लाख ५६ हजार ६०० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

निर्भया पथकाने ही कारवाई केली. गोपनीय बातमीदारामार्फत मिळालेल्या खात्रीशीर माहितीनुसार दुधवाला चौक येथील शिवांश प्लास्टिक या दुकानामध्ये कल्याण-मुंबई मटका जुगार चालविला जात असल्याची माहिती पोलिसांना मिळाली होती. त्यानुसार पोहेकॉ बाबासाहेब घाडगे, पोकॉ हनुमंत पाडुळे, मपोकॉ नम्रता गटकुळ व चालक भाऊसाहेब महानोर यांनी पंचांसमक्ष सोमवार, दि. १ जून रोजी दुपारी सुमारे ४ वाजता छापा टाकला. यावेळी दुकानात एक व्यक्ती मटका जुगाराचा हिशेब करताना आढळून आली. पोलिसांनी ताब्यात घेतलेल्या व्यक्तीने आपले नाव सोमनाथ सुभाष कवठाळकर (वय ५२, रा. वाणी प्लॉट, आगळगाव रोड, बार्शी) असे सांगितले. त्याच्या झडतीत १६ हजार ३०० रुपये रोख रक्कम, सॅमसंग अल्ट्रा २६ व विवो व्ही-५० कंपनीचे दोन मोबाईल फोन, गणकयंत्र, पावती पुस्तके, आकडेमोड केलेल्या चिठ्या, पेन व इतर जुगार साहित्य मिळून आले. चौकशीदरम्यान ताब्यातील संशयित आरोपीने हा मटका जुगार लखन सुभाष विघ्ने (रा. खुरपे बोळ, बार्शी) याच्या सांगण्यावरुन चालवत असल्याची माहिती दिली. त्यानुसार सोमनाथ सुभाष कवठाळकर व लखन सुभाष विघ्ने या दोघांविरुद्ध बार्शी शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## 'त्या' शाळांची तक्रार आठ दिवसात निकाली काढणार

- आयुक्त सत्यजित बडे यांनी दिली ग्वाही
- जिल्हा दिव्यांग सक्षमीकरण विभागात आढावा बैठक

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२ जून-**

सोलापूर जिल्ह्यातील विविध तालुक्यात कार्यरत असणाऱ्या बोगस संस्था आणि कर्मचारी याची इत्यंभूत माहिती जिल्हा दिव्यांग सक्षमीकरण कार्यालयास द्या. त्या अनुषंगाने जिल्ह्यातील ज्या दिव्यांग शाळा केवळ कागदावर आहेत, त्या शाळांची पडताळणी करून तत्काळ आठ दिवसात चौकशी अंती निर्णय घेण्यात येईल. असा निवार्ळीचा इशारा दिव्यांग सक्षमीकरण विभागाचे आयुक्त सत्यजित बडे यांनी दिला आहे. सोलापूर जिल्ह्यातील दिव्यांग संस्थांना भेडसावणाऱ्या विविध प्रशासकीय आणि आर्थिक समस्यांवर तोडगा काढण्याच्या दृष्टीने जिल्हा दिव्यांग सक्षमीकरण विभागाच्या वतीने आयोजित आढावा बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीनंतर प्रसारमाध्यमांशी संवाद साधताना आयुक्त बडे यांनी हा महत्त्वपूर्ण इशारा जिल्ह्यातील संस्थांना तसेच आस्थापनांना दिला आहे.



सोलापूर जिल्हा परिषदेच्या यशवंतराव सभागृहात झालेल्या या बैठकीस दिव्यांग सक्षमीकरण विभागाचे आयुक्त सत्यजित बडे, उपआयुक्त एच.एस. गाडे-हापसे, सहाय्यक आयुक्त सुलभा वटारे यांच्यासह जिल्ह्यातील विशेष शाळा, कार्यशाळा, मतिमंद बालगृहांचे मुख्याध्यापक, संस्थाचालक, कर्मचारी आणि लिपिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. या जिल्ह्याच्या आढावा बैठकीत महत्त्वपूर्ण चर्चा झाली. संस्थांची नोंदणी, कर्मचाऱ्यांचे वेतन व निवृत्तीवेतन, विद्यार्थ्यांच्या प्रवेशाचे नियोजन तसेच बोगस संस्था आणि कर्मचाऱ्यांच्या चौकशीसारख्या संवेदनशील विषयांवर विचारमंथन करण्यात आले.

उपस्थित संस्थाचालकांनी दिव्यांग क्षेत्रातील अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेल्या प्रश्नांकडे प्रशासनाचे लक्ष वेधले. विशेषतः संस्थांच्या नोंदणी आणि नूतनीकरण प्रक्रियेतील अडचणी, समायोजनासंदर्भातील प्रश्न, कर्मचाऱ्यांच्या वेतन निश्चितीतील विलंब, निवृत्तीवेतन मंजुरीची प्रक्रिया, तसेच विद्यार्थ्यांच्या प्रवेशाबाबत निर्माण होणाऱ्या व्यावहारिक अडचणी यावर सविस्तर चर्चा करण्यात आली. यावेळी आयुक्त सत्यजित बडे यांनी उपस्थितांना मार्गदर्शन करताना दिव्यांग संस्थांच्या प्रश्नांकडे शासन सकारात्मक दृष्टीकोनातून पाहत असल्याचे स्पष्ट केले. कर्मचाऱ्यांच्या सेवा विषयक अडचणी आणि संस्थांच्या प्रशासकीय प्रश्नांवर कायदेशीर व उपयोजनात्मक मार्गाने तोडगा काढण्यासाठी विभाग प्रयत्नशील असल्याचे त्यांनी सांगितले.

विशेष म्हणजे जिल्ह्यातील काही कथित बोगस दिव्यांग कर्मचारी आणि संस्थांबाबत सुरू असलेल्या चौकशीवरही त्यांनी भाष्य केले. संबंधित प्रकरणांची पडताळणी अंतिम टप्प्यात असून येत्या आठ दिवसांत याबाबत महत्त्वपूर्ण निर्णय घेतला जाईल, असे त्यांनी स्पष्ट केले. त्यामुळे दिव्यांग क्षेत्रात पारदर्शकता आणि उत्तरदायित्व वाढण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

बैठकीत आणखी एक गंभीर मुद्दा समोर आला तो म्हणजे दिव्यांग सक्षमीकरण विभागातील मनुष्यबळाची कमतरता. विभागामध्ये नियमित भरती प्रक्रिया दीर्घकाळापासून झालेली नसल्याने अनेक अधिकारी आणि कर्मचारी प्रतिनियुक्तीवर कार्यरत आहेत. यामुळे कामकाजावर ताण निर्माण होत असून सेवा वितरणावरही परिणाम होत असल्याची बाब अधिकाऱ्यांनी निदर्शनास आणून दिली. या समस्येवर शासन स्तरावर सकारात्मक निर्णय घेण्यासाठी पाठपुरावा केला जाईल, अशी माहिती आयुक्तांनी दिली.

# आपला जिल्हा

**सोलापूर तरुण भारत**, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.


## टपाल विभागाच्या निवृत्तीवेतनधारकांसाठी १२ जूनला पेन्शन अदालत

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. २ जून-**

टपाल विभागाच्या निवृत्ती वेतनधारकांसाठी व कुटुंब निवृत्तीवेतनधारकांसाठी पंढरपूर येथे पोस्टल पेन्शन अदालतीचे दि. १२ जूनला सकाळी ११ वाजता अधीक्षक डाकघर यांचे कार्यालय, पंढरपूर विभाग येथे आयोजन करण्यात आले आहे.

निवृत्तवेतनधारकांच्या लाभाशी संबंधीत तक्रारी, जे टपाल विभागातून निवृत्त झाले आहेत व ज्यांचा सेवेत असताना मृत्यु झालेला आहे, पंढरपूर टपाल विभागा मधील निवृत्तीधारकांचे तीन महिन्यांच्या आत निपटान झालेले नाही अशा प्रकरणांचा डाक पेन्शन अदालतमध्ये विचार केला जाईल. पेन्शन अदालतमध्ये पूर्णपणे कायदेशीर मुद्दयासह प्रकरणे, ई. वारसा प्रमाणपत्र, कल्पित पेन्शन, टीबीओपी/एमएसीपी पदोन्नती, वेतनश्रेणी वाढविणे, अशा प्रकारणांचा डाक पेन्शन अदालतमध्ये विचार केला जाईल. तसेच धोरणात्मक बाबींसह शिस्तभंगाच्या आणि डी.पी.सी. च्या पुनरवलोकनासाठी प्रलंबित प्रकरणांचा विचार केला जाणार नाही.

निवृत्ती वेतनधारकांनी आपले अर्ज मुन्ना कुमार, अधीक्षक डाकघर, पंढरपूर विभाग ४१३३०४ येथे दि. ५ जुन २०२६ रोजी पर्यंत पाठवावेत. नंतर मिळालेल्या अर्जावर पेन्शन अदालतमध्ये विचार करण्यात येणार नाही. अधीक्षक डाकघर, पंढरपूर विभाग, पंढरपूर यांनी कळिवले आहे.



### महत्त्वाचे...



## अन्नछत्र मंडळाचे उपक्रम दिशा देणारे : सहकारमंत्री बाबासाहेब पाटील

**अक्कलकोट, दि. २ जून-**

श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचे संस्थापक अध्यक्ष जनमेजयराजे विजयसिंहराजे भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली व कार्यकारी अध्यक्ष अमोलराजे जनमेजयराजे भोसले यांच्या नेतृत्वाखाली धार्मिक क्षेत्रातील समृद्ध परंपरा, न्यास जपत असून, राबविण्यात येत असलेले उपक्रम हे दिशा देणारे आहे, असे मनोगत राज्याचे सहकारमंत्री बाबासाहेब पाटील यांनी व्यक्त केले. ते श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळ येथे आले असता न्यासाचे सचिव शामराव मोरे यांच्या हस्ते त्यांचा सत्कार करण्यात आला. याप्रसंगी ना. बाबासाहेब पाटील हे बोलत होते. त्यांच्या समवेत जिल्हा बँकेचे प्रशासक कुंदन भोळे, ना. पाटील यांचे स्वीयसहायक धनंजय जाधव, बाजार समिती सचिव एस. व्ही. कुंभार स्थावरमठ, कोंडीबा पडोळे, उत्तर पोलिस ठाण्याचे पोलीस निरीक्षक दीपक भीतडे, सहायक निबंधक राहुल ठोंबरे, दिलीप सिद्धे, वृद्रय्या स्वामी, अनिल मडके, अर्जुनराव खोडवे, सुधाकर पाटील, महेश स्वामी, नितीन मळे, संजय पाटील, शांतय्या स्वामी, पोलीस नाईक ढेंगळे उपस्थित होते. याप्रसंगी मुख्य पुरोहित अप्पू पुजारी, सौरभ मोरे, दत्ता माने, विजय माने, शुभम सावंत, लक्ष्मण बिराजदार, राजू पवार, रमेश हेगडे, तानाजी पाटील, अनिल बिराजदार, मल्लिकार्जुन गवळी, धनंजय निंबाळकर, समर्थ चव्हाण, विठ्ठल रेड्डी, राहुल इंडे उपस्थित होते.



## रमाई आवास योजनेचे प्रलंबित हप्ते मिळण्याची मागणी

**श्रीपूर, दि. २ जून-**

महाळुंग-श्रीपूर नगरपंचायतीच्या माध्यमातून रमाई आवास घरकुल योजनेतील सुमारे १३ लाभार्थ्यांचे प्रलंबीत असतेते हप्ते त्वरीत मिळावेत या लाभर्थ्यांनी नियमा प्रमाणे झलेल्या बांधकामाची सर्व कागदपत्रे नगरपंचायतीकडे सुपूर्त करून बराच कालावधी लोटला आहे. परंतु अद्यापपर्यंत या लाभार्थ्यांना प्रलंबित हप्ते मिळालेले नसल्यामुळे त्यांना पुढील बांधकाम करणे अशक्य झाले आहे. त्यामुळे या सर्व लाभार्थ्यांचे प्रलंबित हप्ते त्वरित देण्याची व्यवस्था करण्यात यावी अशा आशयाचे निवेदन महाळुंग आरपीआयच्या वतीने मुख्याधिकारी यांना देण्यात आले आहे. आरपीआयचे जिल्हा उपाध्यक्ष शामराव भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच युवा नेते सुधीर भोसले यांच्या नेतृत्वात हे निवेदन देण्यात आले. याप्रसंगी युवा नेते राजाभाऊ शिंदे, हनुमंत भोसले, आनंद केंगार, राहुल भोसले, शंकर चव्हाण, आनंद भोसले, भीमराव आठवले, कुलकर्णी काका, संजय चव्हाण, हरिदास सुतार, विठ्ठल चव्हाण, सनी सरतापे व लाभार्थी उपस्थित होते.

## प्रक्रिया व पॅकेजिंग युनिट स्थापनेस आर्थिक सहाय्य मिळणार : कृषी अधिकारी भोसले

**सोलापूर, दि.२ जून-**

२०२६-२७ च्या कडधान्य आत्मनिर्भरता अभियानांतर्गत शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढविण्यासाठी कडधान्य पिकांच्या मूल्यवर्धनास चालना देण्यात येणार आहे. या योजनेअंतर्गत काढणीनंतरची पायाभूत सुविधा बळकट करण्यासाठी प्रक्रिया व पॅकेजिंग युनिट स्थापनेस आर्थिक सहाय्य देण्यात येणार असून, प्रत्यक्ष बांधकाम खर्चाच्या ३३ टक्के किंवा २५ लाख रुपये (जे कमी असेल) इतके अनुदान मिळणार आहे. जिल्ह्यासाठी या योजनेअंतर्गत दोन लक्षांक प्राप्त झाले असून, शेतकरी उत्पादक संघ, शेतकरी उत्पादक कंपनी, प्राथमिक कृषि पतसंस्था तसेच वैयक्तिक अर्जदारांकडून अर्ज मागविण्यात येत आहेत. इच्छुकांनी आवश्यक कागदपत्रांसह संबंधित तालुका कृषी अधिकारी कार्यालयात दि. २० जून पर्यंत अर्ज सादर करावेत, असे आवाहन जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी शुक्राचार्य भोसले यांनी केले आहे. या योजनेसाठी अर्जदारांनी राष्ट्रीयकृत बँकेकडे प्रस्ताव सादर करणे आवश्यक आहे. बँकेने कर्ज मंजूर केल्यानंतरच लाभासाठी पात्रता. संघ/पतसंस्था/कंपनी मागील दोन वर्षांपासून विधिवत नोंदणीकृत व कार्यरत असणे आवश्यक. मागील दोन वर्षांचे ऑडिट अहवाल सादर करणे बंधनकारक. वैयक्तिक अर्जदारांच्या नावावर ७/१२ व ८-अ उतारा असणे आवश्यक. अर्जदाराचे वय किमान २१ वर्ष पूर्ण असावे. एका कुटुंबातील केवळ एका व्यक्तीस आर्थिक सहाय्य मंजूर. प्रकल्प खर्चाच्या किमान १५ टक्के रक्कम स्वतः उभारण्याची क्षमता असावी.

## दुचाकीवरून पडलेल्या महिलेचा मृत्यू

**सोलापूर, दि.२ जून-**

चालत्या दुचाकीवरून पडून जखमी झालेल्या वाणी मळा येथील एका ५५ वर्षीय महिलेचा उपचारादरम्यान येथील शासकीय रुग्णालयात आज मंगळवारी सकाळी साडेसहा वाजता मृत्यू झाला. उमा कालिदास गुजरे (वय ५५ वर्ष, रा. वाणी मळा , ता माळिशरस )असे त्या मयत महिलेचे नाव असून त्या २९ मे रोजी सायंकाळी अकलूज कडून माळिशरस कडे दुचाकीच्या मागे डबल सीट बसून निघाल्या असताना चक्कर येऊन खाली पडल्या होत्या. यात डोक्याला मार लागून त्या गंभीर जखमी झाल्या असता त्यांना एका खासगी दवाखान्यात प्रथम उपचार करून येथील शासकीय रुग्णालयात भाचा शितल याने बेशुद्ध अवस्थेत दाखल केले असता त्यांचा उपचारादरम्यान मृत्यू झाला.

# 'भूजलशक्ती अभियान' अंतर्गत पाण्याचा प्रत्येक थेंब अडवणार



कृत्रिम भूजल पुनर्भरणासाठी जिल्हास्तरीय समिती स्थापन; अंमलबजावणीसाठी दर महिन्याला बैठक

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २ जून-**

पावसाचे कमी होत चाललेले प्रमाण आणि पाण्याचे वाढत चाललेले दुर्भिक्ष्य कमी करण्यासाठी शासनाच्या मृद व जलसंधारण विभागाकडून आता 'जलशक्ती अभियान' ही योजना राबविण्यात येत आहे. यामध्ये पावसाळ्यात पडणारा पाण्याचा प्रत्येक थेंब सुरक्षित साठवून त्याचा पुनर्वापर करण्यासाठी कृत्रिम भूजल पुनर्भरण बृहत आराखडा तयार केला जाणार आहे. त्याच्या यशस्वी अंमलबजावणीसाठी आता शासनाने जिल्हास्तरीय समितीही स्थापन केली आहे. याची दर महिन्याला बैठक होणार आहे.

पावसाळ्यात पावसाच्या पाण्याचे योग्य नियोजन करण्यात येणार आहे. छतावर पडणारे पावसाचे पाणी साठवण्यासाठी रेन वॉटर हार्वेस्टिंग यंत्रणा उभी करणे, इमारतीच्या आवारात पाण्याची साठवणूक करणे, नवीन साठवण बंधारे, तलाव बांधणे, पारंपरिक पाणीसाठ्यांचे पुनरुज्जीवन करणे, पाणलोट क्षेत्रातील अतिक्रमणे दूर करणे, तलावातील गाळ काढणे, विहिरी, बोअरचे पुर्नभरण करणे, जिल्ह्यातील छोट्या नद्या, नाले, ओढ्यांचे पुरुज्जीवन करणे, पाणथळ जमिनीचे संरक्षण, पाण्याचा उद्भव आणि पाझरांचा विकास करणे अशी अनेक कामे यामध्ये हाती घेतली जाणार आहेत. तसेच जलसाठ्यांची गणना करणे, त्यांना जिओ टॅगिंगने नोंदणी करणे, जलसंधारणासाठी आराखडे बनवणे आणि त्यांची यशस्वी अंमलबजावणी करण्यासाठी जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली ही समिती काम करणार आहे. ग्रामीण भागात शेततळी, शेतबंधारे, कंटूर ट्रेंच, गाळ काढणे, जलत शिवारसारख्या उपक्रमांना गती देण्यात येणार आहे. यामुळे भूजल पातळी वाढण्यास मदत होईल आणि शेतीसाठी आवश्यक पाण्याची उपलब्धता सुधारेल. विशेषतः दुष्काळी पट्ट्यातील गावांना या अभियानाचा मोठा फायदा होण्याची अपेक्षा आहे.

### जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली होणार समिती

या योजनेच्या यशस्वी अंमलबजावणीसाठी जिल्हास्तरावर जि. प.चे मुख्य कार्यकारी अधिकारी, महापालिकेचे आयुक्त, कृषी अधिकारी, वन विभाग, कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, जलसंपदा, सार्वजनिक बांधकाम विभाग, रोजगार हमी योजना, शिक्षणाधिकारी, माध्यमिक, प्राथमिक, आरोग्य अधिकारी, वरिष्ठ भूवैज्ञानिक, जलसंधारण अधिकारी हे या समितीचे सदस्य सचिव असणार आहेत.

# वादळाने हिरावले आयुष्याचे अखेरचे क्षण

## पोमलवाडीत वृध्द दाम्पत्याचा हृदयद्रावक अंत

**तभा वृत्तसेवा,**
**जेऊर, दि.२ जून-**

पोमलवाडी (ता. करमाळा) येथील उजनी जलाशयाच्या काठावरील शेतातील घरात आयुष्याची संध्याकाळ शांतपणे व्यतीत करणाऱ्या वृद्ध दाम्पत्याचा वादळाच्या तडाख्यात अत्यंत दुर्दैवी आणि हृदय पिळवटून टाकणारा अंत झाला. जगन्नाथ मारुती नवले (वय ८०) आणि शालन जगन्नाथ नवले (वय ७५) यांच्यावर रात्री सुमारे ९.३० वाजण्याच्या सुमारास घराची सिमेंट कॉंक्रीटच्या विटांची भिंत कोसळली आणि क्षणार्धात त्यांच्या संसाराचा दिवा कायमचा विझला.

रात्रभर ही घटना कोणाच्याही लक्षात आली नाही. दूसऱ्या दिवशी सकाळी नातू अभिजित नवले करमाळा येथून आजोबा-आजींची भेट घेण्यासाठी पोमलवाडी येथे आला. मात्र घराजवळ पोहोचताच त्याला घराची भिंत कोसळलेली आणि सर्वत्र विटांचा ढिगारा पडलेला होता. अनर्थ घडल्याची जाणीव होताच



त्याने जवळील उजनी काठावरील मच्छिमारांना मदतीसाठी बोलावले. मच्छिमारांच्या मदतीने ढिगारा हटविण्याचे काम सुरू झाले. विटा बाजूला काढल्यानंतर ढिगाऱ्याखाली गाडले गेलेले आजी-आजोबांचे मृतदेह बाहेर काढण्यात आले. यावेळी शालन नवले यांच्या हातात जेवत असतानाचा घास तसाच असल्याचे दिसून आले. हे दृश्य पाहून उपस्थितांच्या डोळ्यांत अश्रू तरळले. जेवणासाठी बसलेल्या या वृद्ध दाम्पत्याला पुढच्याच क्षणी मृत्यूने गाठले असावे, असा अंदाज व्यक्त करण्यात येत आहे. दोन्ही मृत देह शवविच्छेदनासाठी करमाळा येथील शासकीय रुग्णालयात पाठविण्यात आले. या घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे.

> वाशिंबे, केतूर, पोमलवाडी, पारेवाडी परिसरातवादळी वाऱ्यामुळे केळी पिकांचे नुकसान झाले आहे. पोमलवाडी येथे भिंत कोसळून वृध्द दांपत्याचा दुर्दैवी मृत्यू झाल्याची घटना घडली आहे. महसूल प्रशासनाने तातडीने पंचनाम्याचे आदेश दिले असून पंचनामे सुरू करण्यात आले आहेत. नागरीकांनी आपत्ती व्यवस्थापन विभागाकडून दिलेल्या सूचनांचे पालन करावे. वादळी परिस्थितीत सुरक्षित ठिकाणी आश्रय घ्यावा, झाडाखाली थांबू नये, विजेच्या खांबांपासून व तारा पासून दूर राहावे, तसेच धोकादायक व जीर्ण भिंतींपासूनही सावधगिरी बाळगावी.
>
> - **शिल्पा ठोकडे,** तहसीलदार, करमाळा

# उमेदवारी मिळाली नाही म्हणून आपण नाराज नाही : परिचारक

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. २ जून-**



उमेदवारी मिळाली नाही म्हणून आपण नाराज नाही. पक्षाने जी भूमिका घेतली आहे त्याप्रमाणे आपण काम करणार आहोत अशी प्रतिक्रिया माजी आमदार प्रशांत परिचारक यांनी दिली.

विधानपरिषदेच्या सोलापूर जिल्हा स्थानिक स्वराज्यसंस्था मतदार संघातून उमेदवारी मिळावी यासाठी श्री.परिचारक यांनी प्रयत्न केलेलेहोते. मात्र भाजपाकडून त्यांना उमेदवारी मिळाली नाही. त्या पार्श्वभूमीवर येथील पत्रकारांनी माजी आमदार परिचारकांशी संवाद साधला. त्यावेळी पत्रकारांशी बोलताना परिचारकांनी दिलखुलासपणे संवाद साधत उमेदवारी मिळाली नाही म्हणून आपण नाराज नाही. पक्षाने जी भूमिका घेतली आहे त्याप्रमाणे आपण काम करणार आहोत असे सांगितले.

यावेळी बोलताना परिचारक म्हणाले, आपण २०१४ पासून भाजपचे काम करीत आहोत. भाजपची ताकद वाढविण्यासाठी निश्चितपणे प्रयत्न केले आहेत. या पार्श्वभूमीवर सन २०१९ साली माजी खासदार रणजितसिंह नाईक निंबाळकर व माजी आमदार राजेंद्र राऊत यांना भाजपमध्ये प्रवेश देण्यासाठी आपण प्रयत्न केला आहे. माझ्यामुळे दोघांचा भाजपमध्ये प्रवेश झाला अशी देखील आठवण आमदार प्रशांत परिचारक यांनी सांगितली. आपण निश्चितच जिल्ह्यात पक्ष वाढीसाठी काम केले होते. याची दखल घेऊन भाजपने २०१६ मध्ये मला विधान परिषदेवर उमेदवारी दिली होती. यामुळे या निवडणुकीत आपण विजयी झालो होतो. यानंतर २०१९ साली भाजपने पुन्हा आपणाला संधी दिली होती. यामुळे पक्ष संधी देत असतो; मात्र यासाठी धीर धरावा लागतो.

पक्षाची भूमिका ही आपल्याला मान्यआहे. काहीवेळा थांबावे लागते. सगळेच पदे मला असे चालत नाही हे राजकारण आहे. पक्षापुढे मोठ्या अडचणी असतात. त्यामुळे पक्षातील वरिष्ठ नेते भविष्यकाळ पाहून निर्णय घेत असतात. पुढील काळातही आपल्याला या पेक्षा चांगली संधी मिळेल असा विश्वास असल्देयाचे खील परिचारक यांनी सांगितले.

### आपल्यामुळेच निंबाळकर आणि राऊतांचा भाजपात प्रवेश

सातारा जिल्ह्यात भाजपची ताकद वाढविण्यासाठी २०१९ साली माजी खासदार रणजीतसिंह नाईक निंबाळकर तसेच २०१९ मध्ये बार्शीचे रार्जेद्र राऊत यांना भाजपमध्ये प्रवेश देण्यात आला होता. बार्शी येथे तत्कालीन मंत्री चंद्रकांत दादापाटील यांच्या उपस्थितीत राऊत यांना प्रवेश देण्यात आला. माझ्यामुळे निंबाळकर व रार्जेद्र राऊत यांचा भाजपमध्ये पक्ष प्रवेश झाला असल्याचे परिचारक यांनी सांगितले.

## श्रवण हार्डीकर यांची निवडणूक निरीक्षक म्हणून नियुक्ती

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २ जून-**

भारत निवडणूक आयोगाने दिनांक १८ मे २०२६ रोजी महाराष्ट्र विधान परिषद स्थानिक प्राधिकरण मतदार संघ द्विवार्षिक निवडणूक कार्यक्रम जाहीर केला आहे. या आयोगाने सोलापूर विधान परिषद स्थानिक प्राधिकरण मतदार संघासाठी श्रवण हार्डीकर यांची निवडणूक निरीक्षक म्हणून नियुक्ती केली आहे. तरी या मतदार संघातील नागरिकांना/मतदारांना निवडणूक कामकाजाविषयी काही अडचणी असतील तर हार्डीकर यांच्याशी ७०२८९०९२७३ या क्रमांकावर संपर्क साधावा, असे आवाहन सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी तथा निवासी उप जिल्हाधिकारी अभिजीत पाटील यांनी केले आहे.

# पिलीव परिसरात पालेभाज्यांचे दर कडाडले

**तभा वृत्तसेवा,**
**पिलीव, दि. २ जून-**



पिलीव परिसरात खरेतर आसपासच्या खेडेगावातून पिलीवच्या मोठ्या प्रमाणावर पालेभाज्या व इतर अनेक फळे याची मोठ्या प्रमाणावर विक्री होते. मोठ्या प्रमाणावर व्यापारी येत असल्यामुळे भाजीपाल्याचे दर फारसे नव्हते पण सध्या ऐन उन्हाळ्यात भाजीपाल्याची कमतरता असल्यामुळे भाजीपाल्याचे दर अक्षरश गगनाला भिडले आहेत. तर काही पालेभाज्या बाजारातून सध्या गायबच झाल्या आहेत.

सध्या मेथी, शेपू, चुका, पालक, कोथिंबीर या पालेभाज्याची उन्हाळ्यात आवकच कमी झाल्यामुळे दहा रुपयाला मिळणाऱ्या पेंडीचा दर २० ते २५ रुपयांपर्यंत पोहचला आहे. तर कोथिंबीरीचा भेळा तिस ते चाळीस रुपये टॉमॅटो ८० रुपये किलो, वांगी ८० रुपये किलो हिरवी मिरची ८० ते १०० रुपये किलो, गवार ८० रुपये किलो ,बटाटा ४० रुपये किलो, कांदे २० ते ३० रुपये किलो असे पालेभाज्या व इतर भाज्यांचे दर कडाडले आहेत.

यामुळे गृहीणीचे आर्थिक बजेट चांगलेच बिघडले आहे.ऐन उन्हाळ्यात दरवाढीचा सामना करावा लागत आहे. आता चांगला पाऊस झाल्यानंतर जवळपास दोन महिन्यांनी पालेभाज्या व इतर भाज्यांचे उत्पादन आल्याशिवाय दर कमी होणार नाही. साधारणत जुलै महिन्याच्या अखेरीस भाजीपाल्याचे दर स्थिर होतील तोपर्यंत दरवाढीचा सामना करावा लागणार आहे. गृहीणींना गॅस दरवाढ, किराणा मालाची, खाद्यतेल दरवाढीबरोबरच पालेभाज्या व इतर भाज्यांच्या दरवाढीचा सामना करावा लागत आहे. यामुळे सर्व सामान्यांचे चांगलेच हाल होत आहेत.

# कोळेगाव धरणातून सीना नदीत पाणी सोडण्यासाठी मोर्चा

## माढा तहसीलदारांना दिले निवेदन; शेतकऱ्यांचा विचार करून तात्काळ पाणी सोडण्याची मागणी

**तभा वृत्तसेवा,**
**माढा, दि. २ जून-**

सध्या राज्यात तापमानाचा पारा ४० ते ४५ अंश डिग्री तापमान असून या वाढत्या उष्णतेमुळे नदी ,नाले ,विहीरी, बोअरवेल कोरडी पडले आहेत. या परिस्थितीमुळे शेतकऱ्यांना पाणीटंचाईचा मोठा सामना करावा लागत आहे. अशीच स्थिती माढा तालुक्यातील सीना नदीकाठच्या शेतकऱ्यांची झाली आहे. सीना नदी कोरडी पडली असून शेतकऱ्यांची पिके जळू लागली आहेत. पिकांबरोबर जनावरांचे होत असलेले नुकसान टाळण्यासाठी शेतकऱ्यांचा सहानुभूतीपूर्वक विचार करून शासनाने कोळेगाव धरणातून सीना नदीत पाणी सोडावे, या मागणीसाठी सोमवारी शिवसेना शिंदे गटाचे नेते मनोज (मुन्ना) साठे यांच्या नेतृत्वाखाली माढा तहसील कार्यालयावर शेतकऱ्यांनी मोर्चा काढाला होता.

या मोर्चाला मोठ्या संख्येने शेतकरी बांधव उपस्थित होते. छत्रपती शिवाजी महाराज चौकातून सुरू झालेला मोर्चा तहसील कार्यालय येथे जाऊन त्या ठिकाणी तहसीलदारांना निवेदन देण्यात आले.




त्यावेळी शेतकऱ्यांनी आपल्या भावना व्यक्त करत असताना सांगितले की येत्या चार दिवसांत सीना नदीत पाणी सोडले नाही तर लोकप्रतिनिधींना जिल्ह्यात फिरू देणार नसल्याची तीव्र भावना ही यावेळी व्यक्त करण्यात आली. यावेळी संजय पाटील-घाटणेकर, राम मस्के, शंभू साठे, दत्तात्रय साठे, धर्मा मुकणे, संमित सावळे, उदय कदम, अजिनाथ परबत, विक्रम शिंदे, औदुंबर उबाळे, जीवन साळुंखे, सचिन कदम, महेश मोहोळे उपस्थित होते.

### शेतकऱ्यांच्या मागण्या

१) सीना कोळेगाव धरणातून सीना नदीत शेतीसाठी त्वरीत पाणी सोडण्यात यावे.

२) उजनी धरणातील पाण्याचे योग्य नियोजन करुन पाण्याचे समान वाटप करावे.

३) पुरग्रस्त शेतकऱ्यांना प्रलंबित नुकसान भरपाईची रक्कम त्वरीत देण्यात यावी.

४) २ हेक्टरपेक्षा जास्त जमिन असलेल्या शेतकऱ्यांना खरवडून गेलेल्या जमिनीची नुकसान भरपाई त्वरीत मिळावी.

५) सीना नदीवरील सर्व बंधारे दुरुस्त करुन नवीन दारे बसवण्यात यावीत.

६) ग्रामीण भागातील शेतकऱ्यांना शेतीसाठी पूर्ण क्षमतेने १२ तास वीज देण्यात यावी.